संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१ जानेवारी २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)



## ज्ञानपीठप्राप्त दामोदर मावजो
माधव बोरकार

## भारताचे निवडणूक आयुक्त



सुशील चंद्रा, मुख्य निवडणूक आयुक्त



राजीव कुमार, आयुक्त



अनुपचंद्रा पांडे, आयुक्त

# निवडणूक आयुक्तांनी त्या बैठकीला जाणे चूकच!

'या बैठकीमागे आमचा कोणताही गैरहेतू नव्हता,' अशा आशयाचे माफीचे पत्र पंतप्रधान कार्यालयाकडून यायला हवे. त्यात आपल्या कृतीचे स्पष्टीकरण त्यांनी द्यायला हवे. अन्यथा लोक अनेक तर्क-वितर्क करत राहतील. 'आम्ही या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांची चर्चा केली, इतर कोणतीही आक्षेपार्ह चर्चा तिथे झालेली नाही', असे सांगून पंतप्रधान कार्यालय आणि निवडणूक आयोग या दोहोंनीही लोकांना आश्वस्त केले पाहिजे. लोक त्यांच्या विधानावर विश्वास ठेवतील, न ठेवतील; पण माझ्या मते, असे स्पष्टीकरण देणे दोन्ही संस्थांचे कर्तव्य आहे. मौनसाधनेने हा प्रश्न सुटणार नाही.

**एस. वाय. कुरेशी** (माजी मुख्य निवडणूक आयुक्त)



पी.के. मिश्रा
मुख्य सचिव, पंतप्रधान कार्यालय



उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Retail Management
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बॅच !
नव्या वर्षात आजच प्रवेश घ्या डिजिटल करियरच्या जगात !
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा. 8956537496

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१ जानेवारी २०२२
वर्ष ७४ / अंक- १९

संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ **नवीन वर्षानिमित्त प्रकट चिंतन**
... संपादकीय

७ **निवडणूक आयुक्तांनी त्या बैठकीला जाणे चूकच!**
... एस. वाय. कुरेशी

१२ **ज्ञानपीठप्राप्त दामोदर मावजो**
... माधव बोरकार

१५ **महोत्सवामधले फील गुड सिनेमे**
... मीना कर्णिक

२० **प्राणिविश्वातले ठकसेन**
... स्वाती राजे

२५ **पाऊस**
... विभूतीभूषण बंद्योपाध्याय

२९ **शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'हेल्पलाईन'**
... विनायक हेगाणा

३३ **'परमेश्वराला रिटायर करा'ची कूळकथा आणि उत्तरकथा** (पूर्वार्ध)
... राम जगताप

३९ **भूमिगत रेडिओची कहाणी**
... संजीवनी खेर

संपादकीय

# नवीन वर्षानिमित्त प्रकट चिंतन

प्रत्येक नवीन वर्ष येते तेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या मनात आपल्या वाटचालीबद्दल काही विचार व भावना उफाळून वर येतात. बहुतांश वेळा त्या संमिश्र असतात. काहीसे समाधान, काहीसे असमाधान. त्याच वेळी आगामी वाटचालीचा विचारही मनात येतो. त्यात काही आव्हाने दिसतात, तर काही संधी. साहजिकच, काही निर्णय व निश्चय आकार घेतात, भावी नियोजनाला ते हातभार लावतात. व्यक्तीच्या आयुष्यात हे जेवढे खरे असते, तेवढेच किंबहुना अधिक खरे संस्थेच्या आयुष्याबाबत असते, असायला हवे. अन्यथा दीर्घकालीन व वर्धिष्णू अशी वाटचाल असंभव ठरते. साधनाच्या संदर्भातही असेच घडत आले आहे. अनेक लहान-थोरांनी कमी-अधिक योगदान देत साधनाला अमृतमहोत्सवाच्या उंबरठ्यापर्यंत आणले आहे. येत्या १५ ऑगस्टपासून साधनाचे ७५ वे वर्ष सुरू होणार आहे. म्हणजे २०२२ हे वर्ष एक विशेष महत्त्वाचा टप्पा साधनासाठी ठरणार आहे.

मात्र मागील दोन वर्षे संपूर्ण जग कोविड १९ च्या सावटाखाली राहिले आहे. त्याचे सर्वच क्षेत्रांवर चांगले कमी आणि वाईट जास्त असे परिणाम झाले आहेत. माध्यम जगताबाबत ते जास्तच खरे आहे. दोन वर्षांपूर्वीपर्यंत भारतात तरी प्रिंट आणि मुद्रित माध्यमांचाच विशेष बोलबाला होता, आणि प्रतिष्ठाही त्यांनाच होती. आता चित्र खूपच बदलले आहे, डिजिटल माध्यमाचा बोलबाला जास्त आहे आणि त्या माध्यमाची प्रतिष्ठाही हळूहळू वाढू लागली आहे, त्याला गांभीर्य प्राप्त होऊ लागले आहे. परिणामकारकता वाढू लागली आहे आणि प्रभावक्षेत्रही. आर्थिक बाबतीत स्वयंपूर्णता अद्याप दृष्टिपथात नाही, मात्र प्रिंट व इलेक्ट्रॉनिकच्या तुलनेत खर्च बरेच कमी आहेत आणि सुलभता व जलदता किती तरी जास्त आहे.

अशा पार्श्वभूमीवर योगायोग म्हणा किंवा काळाची पावले ओळखून दिलेला प्रतिसाद म्हणा, पण साधनाने तीन वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ च्या जानेवारीपासूनच डिजिटल विस्ताराला प्रारंभ केला होता. साप्ताहिकाचे डिजिटल आर्काइव्ह तयार करायला सुरुवात केली आणि आतापर्यंत १९७८ ते २०२१ या ४४ वर्षांचे आर्काइव्ह पूर्ण केले आहे. १९४८ ते ७७ या उर्वरित ३० वर्षांचे काम येत्या वर्षभरात पूर्ण झालेले असेल. साधना प्रकाशनाची सर्व पुस्तके इ-बुक स्वरूपात आणण्याचे काम दोन वर्षांपूर्वी हाती घेतले होते आणि सध्या उपलब्ध असलेली सर्व छापील पुस्तके इ-बुक स्वरूपात आणून किंडलवर उपलब्ध करून दिली आहेत. पूर्वप्रकाशित पण आऊट ऑफ प्रिंट असलेली पुस्तकेही आगामी वर्षभरात इ-बुक स्वरूपात उपलब्ध होणार आहेत. आणि ऑडिओ बुक्सचे काम वर्षभरापूर्वी हाती घेतले होते, त्यालाही आता चांगलाच आकार प्राप्त होतो आहे. आतापर्यंत वीसेक पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात आणून स्टोरीटेलवर उपलब्ध करून दिली आहेत, आगामी वर्षभरात आणखी एवढीच येतील. अर्थातच, इ-बुक्स व ऑडिओ बुक्स या दोन्ही बाबतीत आमच्या नियोजनात आणखी इतके काम शिल्लक आहे की, ते पूर्ण करायला पुढील चार-पाच वर्षे तरी लागणार आहेत.

कर्तव्य साधना हे डिजिटल पोर्टल अडीच वर्षांपूर्वी सुरू केले, त्यावर प्रामुख्याने मराठी लेख प्रसिद्ध

होत आहेत. मात्र इंग्रजी लेखांचा विभाग आणि ऑडिओ व व्हिडिओ स्वरूपातील मजकुराचेही विभाग आहेत. त्यामुळे साधना साप्ताहिक व साधना प्रकाशन यांच्यापेक्षा जास्त आशय-विषय हाताळण्याची व अधिक प्रभावी होण्याची क्षमता कर्तव्य साधनामध्ये आहे. तिथे काही चढ-उतार आले आहेत, पण दर्जा व ध्येय-धोरणे यात तडजोड होणार नाही, याची काळजी घेत आलो आहोत. तिथे अधिक वेळ, ऊर्जा, पैसा व मनुष्यबळ खर्च केले तर 'स्काय इज द लिमिट' अशी स्थिती येऊ शकते.

अर्थातच, सर्व प्रकारचे डिजिटल तंत्रज्ञान कमालीचे सुलभ व प्रचंड वेगवान करता येते. ते अंध व आक्रमक पद्धतीने वापरूनही खूप काही साधता येते, पण सर्जनशील व संयमित पद्धतीने वापरले तर चांगला परिणाम साधता येतो. तिथेही अंतिमतः 'कंटेंट इज द किंग' हेच खरे असल्याचा प्रत्यय पुन्हा पुन्हा येतो आहे. त्यासाठी अभ्यासू व व्यावसायिक वृत्तीची गरज असते आणि त्या आघाडीवर मात्र सुलभ व वेगवान अशा हालचाली करता येत नाहीत. कारण यंत्र व तंत्र आणि माणूस यात जमीन अस्मनाचा फरक आहे तो आहेच. यंत्र तंत्र बनवणे, घडवणे व विकसित करणे हे काम गतिमान असू शकते, त्यांच्या आवृत्त्यामागून आवृत्त्या काढता येतात. माणसांबाबत ते शक्यच नसते. तिथेही बदल होतच असतात, करता येतात; पण ती गती तुलनेने मंदच असते.

परिणामी, यंत्र आणि माणूस यांच्यातील तिढा अधिकाधिक तीव्र होत जाणार, अधिकाधिक व्यामिश्र होत जाणार हे उघड आहे. त्यातून मोठीच आव्हाने उभी होत राहणार. आज जगभरात सर्वच क्षेत्रांत कुशल मनुष्यबळाचा अभाव ही प्रमुख समस्या झाली आहे. इथे 'कुशल' म्हणताना सर्जनशील, कार्यक्षम आणि विश्वासार्ह हे तिन्ही आयाम अभिप्रेत आहेत. माध्यम जगतात तर ही समस्या अक्राळ-विक्राळ स्वरूपात आहे. उत्तम दर्जाच्या, अचूक व प्रवाही मजकुराची मागणी व त्याचा पुरवठा यात मोठी तफावत निर्माण होत आहे. चांगले लेखक व बातमीदार तर सोडाच चांगले अनुवाद करणारे, चांगले शब्दांकन करणारे, चांगले प्रूफ तपासणारे यांची मोठीच कमतरता आहे. ज्वलंत वा विशेष महत्त्वाचे विषय हाताळण्याची क्षमता असणारे तर आणखी कमी आहेत. संकलन, संपादन, अभ्यास, विवेचन, विश्लेषण, चिकित्सा या प्रत्येक पायरीवर अनेक माणसे उभी राहिली तरच माध्यमे समाधानकारक पद्धतीने काम करू शकणार आहेत. डिजिटल कल्लोळात टिकून राहण्यासाठी प्रिंट माध्यमांना याबाबत अधिक सजग राहावे लागणार आहे.

या पार्श्वभूमीवर, साधना साप्ताहिकाची आगामी वाटचाल कशी दिसते आहे? एका मर्यादेनंतर अंकाचा दर्जा हा व्यवस्थापन, वितरण, विपणन व अर्थकारण यावरच अवलंबून असतो. त्या दृष्टीने आव्हाने बरीच आहेत आणि संधीही खूप आहेत. मात्र तो अतिव्याप्त आणि स्वतंत्र लेखनाचा विषय आहे. म्हणून तो इथे केवळ अधोरेखित करून अंकाच्या आशय-विषयाबाबत कळीच्या ठरत असलेल्या काही मुद्यांचा ओझरता उल्लेख तेवढा करणे आवश्यक वाटते.

साधना साप्ताहिकातून प्रामुख्याने राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील लेखन प्रसिद्ध केले जाते; पण ती चौकट इतकी व्यापक आहे की, त्यात जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या लेखनाला जागा मिळून जाते. मात्र दिवसेंदिवस ठळक होत चाललेला भाग असा की, साधना अंकांतून गतकाळातील आशय व विषय जास्त येत आहेत. अर्थात, आपले लेखक असोत वा वाचक, गतकाळात जास्त रममाण होतात हे खरे असले तरी, आपल्या समाजमनावर इतिहासाचे ओझे तुलनेने जास्त आहे आणि सभोवतालातून तो इतिहास पुन:पुन्हा चुकीच्या पद्धतीने उगाळला जात असतो. त्याला प्रत्युत्तर जाणे आवश्यक असते, अन्यथा नव्या पिढीसमोर चुकीचा इतिहास रेखाटला जातो आणि प्रत्येक नव्या पिढीला इतिहासाचे भान आपोआप येत नसते; नव्यानेच तो शिकावा लागत असतो. शिवाय, 'आज' नीट समजून घेण्यासाठी व 'उद्या'साठी ठोस पावले टाकण्यासाठी ते आवश्यक असते. हे सर्व खरे असले तरी, साप्ताहिकाच्या भावी वाटचालीसाठी गतकाळाला उजाळा देणाऱ्या लेखनाचे प्रमाण कमी करत जाणे आवश्यक आहे. आता ते प्रमाण एकूण मजकुराच्या ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. हेच प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा कमी राहील असे नियोजन आम्ही करत आहोत.

यालाच जोडून दुसरा मुद्दा पुढे येतो तो असा की, दीर्घ लेख व गंभीर वैचारिक लेख हे साधनाचे वैशिष्ट्य पूर्वीपासून राहिले आहे, अलीकडच्या काही वर्षांत ते वाढले आहे. याचे कारण त्यासाठी तेवढी जागा देऊ शकणारी अन्य नियतकालिके फार नाहीत आणि तसा वाचकवर्ग असणारी नियतकालिकेही कमी आहेत. शिवाय, तशा लेखनाला जागा उपलब्ध करून

दिली तर अनेक विषय सखोल व विस्तृत स्वरूपात ठसवता येतात, किंबहुना किती तरी नवे विषय पुढे आणता येतात. साधनाचे हे वैशिष्ट्य निश्चितच जपायला हवे, पण विशेषांक त्यासाठी पुरेसे आहेत. कारण अलीकडच्या काही वर्षात साधनाचे आठ ते दहा विशेषांक दरवर्षी येत असतात. मात्र नियमित अंकांत दीर्घ लेख कमी राहतील असे नियोजन करीत आहोत. आज वृत्तपत्रांत मोठ्यात मोठा लेख १२०० ते १५०० शब्दांचा असतो. साधनातील लहानात लहान लेख तेवढ्या शब्दांचा असतो. त्यामुळे साधनाच्या नियमित अंकात मोठ्यात मोठा लेख २५०० शब्दांचा असेल याची काळजी घेणार आहोत. अर्थात, आशय व विषय तेवढे महत्त्वाचे असतील तर अपवाद निश्चित केले जातील. पण ते कमीत कमी असतील. अर्थातच, कितीही मोठा व गंभीर विषय कमी शब्दांत व अधिक वाचनीय करता येतो, जर लेखकाने पुनर्लेखन करण्याची आणि संपादकाने लेखकाच्या संहितेवर काम करण्याची तयारी ठेवली तर!

तिसरा मुद्दा असा की, कोणत्या प्रकारचे लेखन वाचकांना साधनाकडून जास्त अपेक्षित आहे किंवा वाचकांना द्यायला हवे असे आम्हाला वाटते? त्याचे उत्तर असे पुढे येते की, राज्यस्तरांवरील घटना घडामोडींच्या संदर्भातील लेखन साधनातून वाचण्यात वाचकांना फारसा रस नाही, त्याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडीवरील लेखनाची अपेक्षाही कमी आहे. मग जास्त अपेक्षा काय आहे तर, अन्य राज्यांत व राष्ट्रीय स्तरावर कळीच्या ठरत असलेल्या घटना घडामोडी व प्रश्न-समस्या यांवर विश्लेषणात्मक व कोंडी फोडणारे लेखन! मात्र त्यात अडचण अशी की, त्या प्रकारचे लेखन करणारे लोक मुळात मराठीत कमी आहेत, जे आहेत ते अतिरिक्त कामाच्या ओझ्याखाली असतात. तशा क्षमता असणारे पण वाचनीय लिहू न शकणारे असा एक वर्ग आहे तो वेगळाच. शिवाय, अन्य राज्यांत व प्रत्येक क्षेत्रांत सतत इतके काही बदल होत असतात की, ते पकडता येणे आणि उलगडून दाखवून त्यावर भाष्य करता येणे; हे काम राज्य स्तरावरच वावरणाऱ्यांना कठीण जाते. त्यामुळे, अशा विषयांवरील लेखन मिळवण्यासाठी अनुवाद, शब्दांकन, मुलाखती हे मार्ग जास्त प्रमाणात अवलंबावे लागतात. अर्थात, तसे केले तर कमी वेळात, कमी श्रमात व कमी खर्चात जास्त चांगले लेखन मिळवता येते. पण ते घडवून आणण्यासाठी अचूकता व परिपूर्णतेचा ध्यास आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती असणारे लोक आवश्यक असतात.

चौथा मुद्दा असा की, पारंपरिक विषयांवर व पारंपरिक पद्धतीने लेखन मिळवता येणे तुलनेने सोपे असते आणि तसे लेखनही बरेच येत असते. मात्र शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन प्रादेशिक भाषांमध्ये मिळवणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. वस्तुतः या प्रत्येक क्षेत्रांत नित्यनूतन असे सर्वेक्षण, संशोधन मोठ्या प्रमाणात चालू असते. त्यातील दर्जेदार म्हणावे असे कमी असते, पण जे असते त्यांचीही नीट दखल घेतली जात नाही. केंद्र सरकारचे विविध विभाग व देश-विदेशांतील संशोधन संस्था यांचे अहवाल हा उत्तम दस्तऐवज असतो. (राज्य सरकारे व विद्यापीठे इथले संशोधन मात्र खूपच कमी वेळा त्या दर्जाचे असते.) त्यांची चांगली ओळखसुद्धा त्या-त्या क्षेत्रांचे परिप्रेक्ष्य पाहण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, कृतिकार्यक्रम राबवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. पण त्यांची उकल करून दाखवण्याबाबत आपल्याकडे बौद्धिक आळस वा अनास्था इतकी जास्त आहे की, ते संशोधन करणाऱ्यांचे श्रम वाया घालवण्यासारखेच असते. अशा विषयांवर साधनाला ठोस व सातत्याने काही करता येईल असाही प्रयत्न राहणार आहे.

वरील चार प्रमुख मुद्दे केवळ ओझरते मांडले आहेत. त्यांच्या अंतर्गत उपघटक अनेक आहेत. त्या सर्वांचा उहापोह करण्याची इथे गरज नाही. मात्र ज्या प्रकारचे व ज्या दर्जाचे लेखन प्रसिद्ध करीत राहावे, त्या प्रकारचे व त्या दर्जाचे लेखन येत राहते ही वस्तुस्थिती एका बाजूला असते. आणि अधिक वेगळे व कष्टदायक प्रयत्न करायला जावे, तर त्यातून इतके कमी हाती लागते की, आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार या म्हणीचा प्रत्यय येतो. परिणामी, मनातले चिंतन आणि त्याचे प्रकटन, प्रत्यक्षातील कार्यवाही आणि तिची परिणामकारकता यांच्यात मोठ्याच गाळण्या लागत असतात. मात्र पुढे पाहिले तर बरीच वाटावळणे व चढण बाकी दिसते आणि मागे पाहिले तर बरीच वाटावळणे व चढण पार करून आलो आहोत असेही दिसते. त्यामुळे वाटते, पुढे तर जायलाच हवे. किंबहुना म्हणून तर काम करण्याची गरज आहे, म्हणून तर काम करण्यात मजा आहे!

**मुलाखत**

एस. वाय. कुरेशी

# निवडणूक आयुक्तांनी त्या बैठकीला जाणे चूकच!

**प्रश्न** – पंतप्रधान कार्यालयाने कायदा आणि न्याय मंत्रालयाकरवी एका पत्राच्या माध्यमातून मुख्य निवडणूक आयुक्तांना चर्चेसाठी आमंत्रित केले आणि मुख्य निवडणूक आयुक्तांनी ते आमंत्रण स्वीकारले. असा प्रकार स्वतंत्र भारतात पहिल्यांदाच घडला आहे, असे म्हटले जाते आहे. याविषयी आपले मत काय?

– हा प्रकार पहिल्यांदा घडला हे तर खरेच आहे. परंतु अशी वेळ का आली हा मुख्य प्रश्न आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या मुख्य सचिवांशी माझी व्यक्तिशः ओळख आहे. माझ्या आकलनानुसार ते जुन्या पठडीचे (old school) आणि अतिशय सभ्य गृहस्थ आहेत. आपल्या राज्यघटनेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या सांविधानिक संस्थांच्या स्वायत्ततेच्या तत्त्वाची जाणीव त्यांना नसेल, असे होऊच शकत नाही. पण घटनेशी संबंधित प्रश्नांमध्ये जे सरकारचे 'डोळे' आणि 'कान' म्हणून काम करते, त्या कायदा आणि न्याय मंत्रालयालाही हे तत्त्व ठाऊक नसावे याविषयी आश्चर्य वाटते. या प्रकारावर एक प्रतिक्रिया अशीही होती की, कायदा सचिवांनी घटनेचे वाचन करण्यासाठी काही दिवसांची सुट्टी घेतली पाहिजे. 'You are expected to meeting chaired by principal secretary of prime minister and officer' अशा आशयाचे वाक्य त्यांनी पत्रात लिहिले आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या सचिवाकडे कितीही अधिकार असले तरी शेवटी तो 'अधिकारी' (officer) आहे आणि दुसरीकडे निवडणूक आयोग ही स्वायत्त सांविधानिक संस्था आहे. अशा संस्थेच्या प्रमुखांना त्यांच्या सहकाऱ्यांसह भेटीसाठी बोलावणे गैर आहे. नुकताच मी 'इंडियन एक्स्प्रेस'साठी लिहिलेल्या एका लेखात हा मुद्दा मांडला आहे की, भारताच्या सरन्यायाधीशांना न्यायिक सुधारणांविषयी चर्चा करण्यासाठी पाचारण करण्याच्या प्रसंगामध्ये आणि आताच्या प्रसंगामध्ये मला साम्य दिसते. निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा खरे तर फार पूर्वीच करणे आवश्यक होते आणि अशी चर्चा करण्यासाठी अधिकारी पुरेसे असतात. न्यायिक सुधारणा किंवा निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांसाठी सबंध केंद्रीय अधिकारप्राप्त समितीला (CEC) किंवा निवडणूक आयोगाला चर्चेसाठी हजर राहण्याचा आदेश देणे हे उर्मट वर्तन आहे.

> याला तीन पक्ष जबाबदार आहेत. पहिला पक्ष पंतप्रधान कार्यालयाचा – ज्यांनी या बैठकीचे आयोजन केले आणि त्यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांना बैठकीला हजर राहण्याचा आदेश दिला. ही अपेक्षाच चुकीची, गैर न्यायिक आणि घटनाविरोधी होती. दुसरा पक्ष कायदा मंत्रालयाचा – ज्यांनी 'पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे आणि मुख्य निवडणूक आयुक्तांनी बैठकीला हजर राहणे अपेक्षित आहे,' असे पत्र लिहून आपल्या अडाणीपणाचा पुरावाच दिला. तिसरा पक्ष निवडणूक आयोगाचा – ज्यांनी याचे गांभीर्य सुरुवातीला ओळखले आणि नकारात्मक प्रतिक्रिया दिली. मात्र नंतर तथाकथित 'अनौपचारिक' बैठकीला हजर राहून कमकुवतपणा दाखवला.

**प्रश्न –** एका निवडणूक अधिकाऱ्यांनी 'ऑफ द रेकॉर्ड' असे सांगितले आहे की, यामध्ये राजशिष्टाचाराचा भंग करण्याचा हेतू नसून प्रशासन व्यवस्थेतील लालफितशाहीला मज्जाव करण्यासाठी आम्ही या बैठकीला उपस्थित राहिलो. कारण अनेक सुधारणा प्रलंबित होत्या. हे कितपत खरे आहे?

– हे तितकेसे खरे नाही. ज्या सुधारणा प्रलंबित होत्या त्या मार्गी लावण्यासाठी त्यांना निवडणूक आयोगाचे मत हवे होते की आयोगाने प्रत्यक्ष हजर राहणे अपेक्षित होते? आपले निवडणूक उपायुक्तांचे (deputy election commissioner) स्थान पंतप्रधान कार्यालयाच्या मुख्य सचिवांच्या बरोबरीचे आहे. तेच लोकसभेत जातात, तिथल्या समित्यांमध्ये काम पाहतात. त्यामुळे सुधारणांविषयी काही समजून घ्यायचेच होते तर तोही पर्याय होता.

**प्रश्न –** भारतातल्या मुख्य राज्यांमधल्या निवडणुका येऊ घातल्या आहेत आणि निवडणुकीच्या आधी अशा प्रकारची बैठक होणे संशयास्पद आहे. 'आता निवडणुका निःपक्षपातीपणे होतील हे आम्ही कसे मान्य करावे?' अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली आहे.

– कोणत्याही काळात अशा प्रकारची बैठक होणे गैरच होते. वीसेक वर्षांपासून प्रलंबित दोन-तीन सुधारणांबद्दल या बैठकीत चर्चा झाली, अशी बातमी आलेली आहे आणि मला विश्वास आहे की, निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांविषयी या बैठकीत चर्चा झाली असणार. पण दीर्घकालिक दुखणे आणि तातडीची शस्त्रक्रिया यांच्यामध्ये फरक असतो ना! आता एवढी तातडी कशाची होती? वीस-वीस वर्षे प्रलंबित अशा सुधारणा होत्या तर आणखी काही काळानेही त्यावर चर्चा करणेही शक्य होते. आणि तरीही जर तातडी होतीच तर मुख्य सचिव निवडणूक आयोगाच्या कार्यालयामध्ये स्वतः जाऊ शकले असते. पण त्यांच्याकडे अधिक सत्ता आहे असे त्यांना वाटत असावे. माझ्या आकलनानुसार, निवडणूक आयुक्तांना सचिव तर सोडाच खुद्द पंतप्रधानही बैठकीला बोलावू शकत नाहीत.

माझ्या बाबतीत घडलेला प्रसंग सांगतो. २७ जून २००६ मध्ये मला पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांचा यांचा फोन आला. त्यांनी मला विचारले की, कुरेशी, निवडणूक आयोगासाठी तुमच्या नावाचा विचार केला जातो आहे तर तुम्ही हा प्रस्ताव स्वीकाराल का? वास्तविक सरकार न विचारता कोणतीही प्रशासकीय नियुक्ती कुठेही करू शकते आणि ती नाकारण्याचा पर्याय नसतो. मग मला अशी विचारणा का झाली? कारण मी त्या वेळी सरकारचा सचिव होतो आणि 'आयएएस'मध्ये माझी एक वर्षाची सेवा उरलेली होती ती मला सोडावी लागणार होती. जेणेकरून सरकारशी असणारी माझी नाळ तुटेल आणि अंतर तयार होईल. मी राजीनामा दिल्यानंतर, कालपर्यंत ज्या पंतप्रधानांनी माझी नियुक्ती केली होती त्यांच्या-माझ्यामध्ये एक भिंत उभी राहिली. जे पंतप्रधान माझी प्रशासकीय पदावर नियुक्ती करू शकतात; परंतु नियुक्तीनंतर मला हटवू शकत नाहीत किंवा मी कोणत्या प्रकारे काम केले पाहिजे या बाबतीत हस्तक्षेप करू शकत नाहीत. तो काळही आम्ही पाहिलेला आहे. या भिंतीला तोडले जाऊ शकेल अशी शक्यताही तेव्हा नव्हती.

**प्रश्न –** मुख्य निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांनी सुरुवातीला औपचारिक बैठकीसाठी नकार दिलेला होता, त्याचप्रमाणे अनौपचारिक बैठकीलाही ते नकार देऊ शकले असते. तसे त्यांनी केले नाहीच; शिवाय इतर तीन आयुक्तांसोबत बैठकीला हजेरी लावली.

– मुख्य प्रश्न तोच आहे. ते भाबडेपणाने बैठकीला हजर राहिले, असे झालेले नाही. या पत्राला त्यांची पहिली प्रतिक्रिया योग्य होती. त्यांनी त्या पत्रातल्या भाषेबाबतही आक्षेप घेतला होता. त्यानंतर मात्र ते एकटेच नव्हे तर तीनही आयुक्त बैठकीसाठी गेले. या बैठकीला अनौपचारिक तरी कसे म्हणणार? पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांशी निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांची चर्चा होते आहे ही अनौपचारिक बैठक आहे काय? या अनौपचारिक बैठकीत काय चर्चा झाली? निवडणुकांच्या तारखांची चर्चा झाली की पंतप्रधानांच्या प्रचार दौऱ्यांची? यावर आता अनेक तर्कवितर्क होऊ शकतात आणि होतही आहेत. याला अनौपचारिक बैठक म्हणणं चूक आहे.

**प्रश्न –** आपल्या संविधानामध्ये, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमध्ये ही गोष्ट अनेकदा स्पष्ट केली गेली आहे की, निवडणूक आयोगाने कार्यकारिणीपासून जाणीवपूर्वक अंतर राखणे आवश्यक आहे. आता मात्र निवडणूक आयोगाला हवे तेव्हा अनौपचारिक बैठकीसाठी बोलावले जाऊ शकते असा पायंडा पाडला जातो आहे का?

– याला तीन पक्ष जबाबदार आहेत. पहिला पक्ष

पंतप्रधान कार्यालयाचा – ज्यांनी या बैठकीचे आयोजन केले आणि त्यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांना बैठकीला हजर राहण्याचा आदेश दिला. ही अपेक्षाच चुकीची, गैर न्यायिक आणि घटनाविरोधी होती. दुसरा पक्ष कायदा मंत्रालयाचा – ज्यांनी 'पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे आणि मुख्य निवडणूक आयुक्तांनी बैठकीला हजर राहणे अपेक्षित आहे,' असे पत्र लिहून आपल्या अडाणीपणाचा पुरावाच दिला. तिसरा पक्ष निवडणूक आयोगाचा – ज्यांनी याचे गांभीर्य सुरुवातीला ओळखले आणि नकारात्मक प्रतिक्रिया दिली. मात्र नंतर तथाकथित 'अनौपचारिक' बैठकीला हजर राहून कमकुवतपणा दाखवला.

**प्रश्न –** मागच्या निवडणुकीदरम्यान अशोक लवासा (तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त) प्रकरण घडले; याचसारख्या इतरही अनेक घटनांमुळे 'निवडणूक आयोगाशी समझोता होतो आहे,' अशी कुजबूज होत होती. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी या बैठकीबद्दल असे लिहिले की, असा समझोता झाला आहे याचा आणखी काय पुरावा हवा? म्हणजे आतापर्यंत ज्या गोष्टींची कुजबुज सुरू होती त्या आता स्पष्ट समोर येत आहेत. विरोधी पक्षाने सरकारवर केलेल्या आरोपांविषयी आपण काय सांगाल?

– विरोधी पक्षांनी या बैठकीला आक्षेप घेतलेच; शिवाय पाच माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनीही विरोधी प्रतिक्रिया दिल्या. एखादी व्यक्ती चूक असू शकते. पण पाच व्यक्ती चूक कशा असू शकतील? एका माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी मात्र असे सांगितले की, अशा तऱ्हेची बैठक घेण्यात काहीही आक्षेपार्ह नाही. वस्तुतः त्यांच्या स्वतःच्या कार्यकाळात निवडणूक आयोगातील एका आयुक्तांना पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांचा फोन आला होता, तेव्हा त्यांनी 'हे कसे घडू शकते' असा प्रश्न विचारून आकाशपाताळ एक केले होते. मात्र ती योग्य प्रतिक्रिया होती. आता अचानक त्यांना काय झाले माहीत नाही.

**प्रश्न –** तुमच्या कार्यकाळात तुम्हांला अशा तऱ्हेचे कोणते पत्र आले होते का?

– असे काही पत्र येण्याचा प्रश्नच नव्हता. निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांविषयी मी अतिशय उत्सुक होतो. त्या वेळी वीरप्पा मोईली कायदामंत्री होते. एके दिवशी त्यांचा मला फोन आला आणि ते मला म्हणाले की, तुम्ही नेहमी निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांविषयी बोलत असता; चहा



एस. वाय. कुरेशी (माजी मुख्य निवडणूक आयुक्त)

पिण्यासाठी उद्या माझ्या कार्यालयात या. माझ्याच प्रस्तावासंदर्भात माझ्याशी बोलणे व्हावे यासाठी मला नम्र आमंत्रण दिले जाते आहे यामुळे क्षणभर मला आनंद झाला. 'एके काळी २५ रुपयांच्या पुस्तकासाठी निवडणूक आयोगाने कायदा व न्याय मंत्रालयाकडे परवानगी मागितली होती,' असे शेषन साहेबांनी एके ठिकाणी लिहिले आहे. तो असा काळ होता जेव्हा निवडणूक आयोगाला तो कायदा मंत्रालयाचाच एक उपविभाग असल्यासारखे वागवले जात होते. मुख्य निवडणूक आयुक्त कायदामंत्र्यांना भेटण्यासाठी वाट पाहत असायचे. मोईली यांच्याशी बोलताना पहिल्या पाचच सेकंदांत मला जाणीव झाली की, मी जर या प्रस्तावाला होकार दिला तर तोच काळ पुन्हा अवतरल्यासारखे होईल. आणि मग मी त्यांना फोनवर म्हटले की, आपण मला आमंत्रित केले याबद्दल मी आपला आभारी आहे; परंतु तुम्ही आमच्या कार्यालयात भेटीसाठी येऊ शकलात तर अधिक चांगले होईल, जेणेकरून मी माझ्या इतर दोन सहकाऱ्यांशी आपला परिचयही करून देऊ शकेन. त्यांनीही अतिशय खिलाडू वृत्तीने माझा प्रस्ताव

स्वीकारला आणि दुसऱ्या दिवशी स्वतःच्या चार सहकाऱ्यांसह ते आयोगाच्या कार्यालयात आले. आम्हांला वाटले ही अनौपचारिक भेट असेल तर ती अर्ध्या–एक तासात संपेल. पण आमची बैठक जवळपास साडेतीन तास चालली. निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांबद्दल बैठकीत इत्यंभूत चर्चा झाली. चर्चेअंती ते म्हणाले की, 'निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांचा पट इतका मोठा आहे याची मला जाणीव नव्हती. आपण जर देशभर प्रादेशिक परिषदा घेतल्या तर त्यात तुम्ही आमच्या सोबत सहभागी व्हाल का? आपल्याला संयुक्तपणे अशा परिषदांचे आयोजन करता येईल का?' मी आनंदाने त्याला होकार दिला आणि आम्ही अशा सात परिषदा आयोजित केल्या. आठवी परिषद राष्ट्रीय पातळीवरची होती, त्या परिषदेसाठी पंतप्रधान उपस्थित असणार होते आणि त्यात काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार होते. सातव्या परिषदेनंतर मोईली स्वतः निवडणूक आयोगाच्या कार्यालयात भेटीला आले. (कारण 'पायंडा' पडलेला होता. याउलट सुरुवातीला मी त्यांच्याकडे गेलो असतो तर पुन्हा मलाच त्यांच्या भेटीसाठी जावे लागले असते.) आणि आम्ही राष्ट्रीय परिषदेच्या नियोजनाबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांची अचानक बदली झाली, तेव्हा मी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना फोन केला आणि मोईली यांच्या बदलीविषयी नापसंती दर्शवून त्यांना म्हटले की, इतक्या हिकमतीने आम्ही सुधारणांविषयी चर्चा करत होतो. मोईली साहेबांनी सगळी भूमी तयार केली होती आणि आता अगदी शेवटच्या क्षणी तुम्ही त्यांची बदली केली. त्या वेळी मनमोहन सिंग यांनी मला सांगितले की, आपण चिंता करू नका. सलमान खुर्शीद यांची त्या पदावर नव्याने नियुक्ती झाली आहे. ते या कामाला पुढे घेऊन जातील आणि मी त्यांना निवडणूक आयोगाच्या कार्यालयात येऊन तुमची भेट घेण्यास सांगेन. त्यानंतर आठवडाभरातच कायदामंत्री स्वतः माझ्याकडे आले आणि त्यांनी मला आश्वस्त केले. बदलत्या राजकीय गणितांमुळे त्या सुधारणा प्रत्यक्षात आल्या नाहीत. परंतु इथे सांगायचा मुद्दा असा की, त्या तीन–चार महिन्यांच्या काळात दोन कायदामंत्री तीन वेळा निवडणूक आयोगाच्या कार्यालयात आले. याहून चांगला कित्ता कोणता असू शकतो?

**प्रश्न –** स्वतः पंतप्रधान, पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी, निवडणूक आयुक्त या सर्वांना निवडणूक आयोगाच्या सांविधानिक स्वायत्ततेच्या गांभीर्याची जाणीव नसेल अशी शक्यताच नाही; मग या कृतीमागचा हेतू काय असेल? पूर्वी कधीही जे घडले नाही ते आता आम्ही करत आहोत अशा पद्धतीचा पायंडा ते पाडू इच्छितात का?

– त्यांच्या मनात नक्की काय होते याविषयी मला अंदाज नाही. गांभीर्याची जाणीव त्यांना नसणे शक्य नाही हे तर खरेच आहे. कदाचित आम्ही तुमच्याहून अधिक सत्तावान आहोत असे दाखवण्यासाठी त्यांनी हे केले असेल तर ते घटनाबाह्य आहे. सरकारने सगळ्या निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचे आदेश लागू केलेले असले तरी नियुक्तीपश्चात सरकार आणि त्यांच्या मध्ये भिंत उभी होते. त्यानंतरही सरकारने त्यांच्यावर हुकूमत गाजवणे हे असांविधानिक आहे. कारण, कार्यकारी मंडळाची इच्छा तर 'आहे त्याच पक्षाचे सरकार पुढे चालू राहावे' अशीच असणार. त्यामुळे निवडणूक पक्षनिरपेक्ष आणि न्याय्य व्हावी, सबंध देशाला आणि राजकीय पक्षांना निवडणूक प्रक्रियेविषयी विश्वास वाटावा यासाठी ही भिंत उभी केली गेलेली आहे. निवडणुकीच्या प्रक्रियेत एक कोटी दहा–वीस लाख सरकारी कर्मचारी वर्गाचा उपयोग आम्ही करून घेतो; परंतु आम्ही त्यांच्या निःपक्षपातीपणाची आधी परीक्षा घेतो. मुख्य सचिव, गृह सचिव, पोलिस महासंचालक यांसारख्या उच्च पदस्थांच्याही बदल्या आम्ही केल्या होत्या. कारण विरोधी पक्षांनी त्यांच्या निःपक्षपातीपणाबद्दल शंका उपस्थित केली होती. (तेव्हा विरोधी पक्षात 'भाजप' होता आणि त्यांच्या तक्रारींवर आम्ही तत्काळ कृती करत होतो.)

**प्रश्न –** या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांची चर्चा झाली, असे निवडणूक आयोगाने सांगितले असले तरी त्यामध्ये त्याव्यतिरिक्त इतरही गोष्टींची चर्चा झाली असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकांच्या मनातील हा संशय दूर करण्याच्या दृष्टीने आयोगाने काय करणे गरजेचे आहे?

– 'या बैठकीमागे आमचा कोणताही गैर हेतू नव्हता,' अशा आशयाचे माफीचे पत्र पंतप्रधान कार्यालयाकडून यायला हवे. त्यात आपल्या कृतीचे स्पष्टीकरण त्यांनी द्यायला हवे. अन्यथा लोक अनेक तर्कवितर्क करत राहतील. आम्ही या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांची चर्चा केली इतर कोणतीही आक्षेपार्ह चर्चा तिथे झालेली नाही, असे सांगून पंतप्रधान कार्यालय आणि निवडणूक आयोग या दोहोंनीही लोकांना आश्वस्त केले पाहिजे. लोक त्यांच्या विधानावर विश्वास ठेवतील न

ठेवतील; पण माझ्या मते, असे स्पष्टीकरण देणे दोन्ही संस्थांचे कर्तव्य आहे. मौनसाधनेने हा प्रश्न सुटणार नाही.

**प्रश्न –** आता यावर सरकार काय मार्ग काढते हे स्पष्ट झालेले नाही, मात्र मोदी सरकारने या प्रकारामुळे एक धोकादायक पायंडा पाडला आहे असे म्हणता येईल का?

– या बैठकीच्या आयोजनामुळे सरकार आणि निवडणूक आयोग यांना जी बोलणी खावी लागली आहेत ते पाहता असा काही प्रकार ते पुन्हा करू धजतील असे मला वाटत नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आणि पंतप्रधानानींही 'आम्ही संविधानाची प्रतिष्ठा कायम राखू,' अशी शपथ सेवेत रुजू होताना घेतलेली असते. मी निवडणूक आयुक्त असतानाही या विषयावर बोललो आहे की, भारतीय निवडणूक आयोग ही जगातील सगळ्यांत मोठी यंत्रणा आहे, मात्र तिथली आयुक्तांच्या नियुक्तीची प्रक्रिया ही जगातली सर्वांत सदोष प्रक्रिया आहे. केंद्र सरकार कोणत्याही क्षणी कोणाचीही नियुक्ती करू शकते. मीही याच पद्धतीने नियुक्त झालो होतो. पण माझ्या नियुक्तीवर विरोधी पक्षनेत्याची स्वाक्षरी असती तर मला अधिक आनंद झाला असता जेणेकरून याचा पुरावा मिळाला असता की, सर्वांना माझ्यावर विश्वास आहे. हा विश्वास निःपक्षपाती आणि न्याय्य निवडणुकीचा गाभा आहे, ज्याला संविधानाच्या मूलभूत चौकटीत सामील केले आहे. स्वायत्त संस्था आणि सरकार यांनी आपापसांत अंतर राखणे, सत्ताविभाजनाच्या तत्त्वाची जाणीव ठेवणे हा आम्ही घेतलेल्या शपथेचा भाग आहे.

**प्रश्न –** आपण आपल्या इंडियन एक्स्प्रेसमधील लेखात म्हटले आहे की, पंतप्रधानांनी सरन्यायाधीशांना चर्चेसाठी बोलावण्यात आणि या प्रकारात साम्य आहे. येत्या काळात पंतप्रधान कार्यालय किंवा कायदा आणि न्याय मंत्रालय यांनी आपल्या कृतीचे स्पष्टीकरण दिले नाही तर अशा प्रकारच्या अनौपचारिक बैठका हाच एक नियम बनेल, असे आपल्याला वाटत नाही का?

– असे होईल असे मला वाटत नाही. इतके निर्ढावलेपण या उच्च पदस्थांमध्ये असेल असे मला वाटत नाही. दोन–तीन वर्षांपूर्वी पंतप्रधान सर्वोच्च न्यायालयात गेले होते. रात्री साडेनऊ वाजता त्यांना सर्वोच्च न्यायालय पाहण्याची इच्छा होती. सरन्यायाधीश त्यांना न्यायालय दाखवण्यासाठी घेऊन गेले. या प्रकाराची चर्चा आजही होते. कदाचित असेही असेल की, जिथे देशाचे भविष्य ठरवणारे मोठमोठे निर्णय जिथे होतात असे सर्वोच्च न्यायालय जाऊन पाहणे, हा पंतप्रधानांच्या निरुपद्रवी कुतूहलाचा भाग असेल. पण मुद्दा हा होता की, ते एकट्याने सरन्यायाधीशांना भेटले आणि त्या भेटीची आजतागायत चर्चा होते. पुढच्या निकालावर त्या भेटीचे प्रतिबिंब पडलेले होते का याविषयी आजही तर्कवितर्क केले जातात. त्यामुळे 'आज मला आपल्या सोबत चहा पिण्यासाठी भेटायचे आहे,' या पातळीवरच्या या भेटी नसतात.

पंतप्रधान कार्यालय आणि निवडणूक आयुक्तांची बैठक हे संविधानाचे उल्लंघन आहे, राजशिष्टाचाराचे (protocol) उल्लंघन आहे, याविषयी अजिबात शंका नाही! त्यातही लहान–सहान अनेक मुद्दे आहेत. उदाहरणार्थ, राजशिष्टाचारामध्ये अग्रक्रमाचे अधिपत्र (warrant of precedence) अंतर्भूत असते. त्याअनुसार मुख्य निवडणूक आयुक्त नवव्या स्थानी असतात, तर पंतप्रधानांचे सचिव तेविसाव्या स्थानी असतात. तेविसाव्या स्थानावरचा अधिकारी नवव्या स्थानावरच्या अधिकाऱ्याला स्वतःच्या कार्यालयात भेटीसाठी बोलावतो (केवळ त्याच्याकडे पंतप्रधान कार्यालयाची सत्ता आहे म्हणून.) हे योग्य नाही.

**प्रश्न –** मला आपल्याला एक थेट प्रश्न विचारायचा आहे. पंतप्रधान कार्यालय निवडणूक आयोगासारख्या संस्थेची स्वायत्तता नष्ट करू पाहते आहे?

– या प्रश्नाचे उत्तर मला ठाऊक नाही. यावर केवळ तर्कच होऊ शकतो. सांविधानिक संस्थेची स्वायत्तता नष्ट करण्याची त्यांची इच्छा नसावी अशी सदिच्छा मी बाळगू शकतो. मात्र ते तसे करू इच्छित असतील तर ते देशाशी आणि संविधानाशी द्रोह करत आहेत.

(शब्दांकन व मराठी अनुवाद : **सुहास पाटील**)

(गेल्या आठवड्यात अशी बातमी आली की, केंद्रिय कायदा मंत्रालयाने भारताच्या तिन्ही निवडणूक आयुक्तांना पत्र पाठवले आणि पंतप्रधान कार्यालयाचे मुख्य सचिव पी.के.मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीसाठी बोलावले, नंतर त्याला अनौपचारिक बैठकीचे स्वरूप दिले गेले. भारताचा निवडणूक आयोग स्वायत्त आहे, इतका की निवडणूक आयुक्तांना बैठकीसाठी बोलावण्याचा अधिकार पंतप्रधानांनाही नाही; त्यामुळे त्या बैठकीवर भारताच्या पाच माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी टीका केली आहे. त्यातील एक असलेले, एस.वाय. कुरेशी यांची ऑडिओ व्हिडिओ मुलाखत **नीलू व्यास** यांनी **'सत्य हिंदी'** या डिजिटल माध्यमासाठी घेतली आहे. ही मुलाखत विशेष महत्त्वाची आहे, म्हणून तिचे शब्दांकन व अनुवाद करून येथे प्रसिद्ध करीत आहोत. ... संपादक)

माधव बोरकार

# ज्ञानपीठप्राप्त दामोदर मावजो

माजोर्डा हे प्रामुख्याने ख्रिश्चन लोकवस्तीचे प्राबल्य असलेले गाव. देशाच्या पर्यटन नकाशावर ते ठळकपणे दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे या गावाला लाभलेला समुद्र किनारा व तिथे उभी राहिलेली पंचतारांकीत रिसोर्टची संस्कृती. आशिया खंडात पावाची निर्मिती याच गावात झाली असा दावा केला जातो आणि तो खरा असेलही. आज पुन्हा एकदा हा माजोर्डा गाव दामोदर मावजो यांना २०२१ सालचे भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे देशाच्या साहित्यिक नकाशावर झळकला आहे.

१ ऑगष्ट १९४४ रोजी जन्म घेतलेल्या दामोदर मावजो यांना कसलीच साहित्यिक पार्श्वभूमी नव्हती. मात्र त्यांचे एक थोडे लांबचे कुटुंबीय रामनाथ नारायण मावजो हे नावाजलेले छायाचित्रकार होते. या रामनाथबाबांचे भाचे नामवंत चित्रकार लक्ष्मण पै होत. सिनेमोटोग्राफर के. वैकुंठ हे मावजो यांचे एक नावाजलेले शिष्य. असा हा दामोदर मावजो यांना लाभलेला कलेचा वारसा. गावांत त्यांच्या कुटुंबाचे भुसारी दुकान होते. हा व्यवसाय पुढे मावजो यांनी चालवला. अलिकडे आपले दुकान बंद करून पूर्णवेळ ते लिखाण करतात. लेखनासाठी लागणारी सगळी कच्ची सामुग्री आपल्याला या व्यवसायाने दिली असे ते सांगतात. इथेच त्यांना बहुचर्चित 'तेरेझालो घोव' या कथेतला पिटर व तेरेझा किंवा 'कार्मेलीन' या कादंबरीची नायिका कार्मेलीन भेटली.

शालांत परिक्षा झाल्यानंतर मावजो यांनी मुंबईच्या पोदार महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी घेतली. या महाविद्यालयीन जीवनात त्यांनी नाटकात रस घेतला. इथेच त्यांना त्यांची भावी पत्नी शैला आपटे भेटल्या. पदवी घेवून आपल्या गावी परतल्यावर वडिलांचा व्यवसाय त्यांनी पत्करला. 'पसरकार' (दुकानदार) हे आपल्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे अंग असे ते अभिमानाने सांगतात. त्यांच्या या पसऱ्याने त्यांचे कथाविश्व समृद्ध केले. अवतीभवती असलेल्या माणसांचे सामाजिक, आर्थिक व भावनिक प्रश्न जवळून जाणून घेण्याची संधी त्यांना या व्यवसायाने दिली.

मावजोना वाचनाची आवड त्यांच्या बालपणापासून

> दामोदर मावजो पूर्णपणे नास्तिक, निधर्मी व प्रागतिक विचारांचे आहेत. दक्षिणायन गोवाचे ते अध्यक्ष आहेत. मावजोंच्या ink of dissent ह्या पुस्तकात त्यांच्या प्रागतिक विचारांचे प्रतिबिंब पडले आहे. गोव्यातील एका सनातनी संस्थेवर प्रखर टीका केल्यावर त्यांना धमक्या येऊ लागल्या. त्यानंतर गोवा सरकारने त्यांना पोलिस संरक्षण दिले आहे. प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर मावजो यांनी कॅन्सरसारख्या दुर्धर रोगावर मात केली आहे. रवींद्र केळेकर यांच्यानंतर दामोदर मावजो यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे कोंकणी भाषा इतर भारतीय भाषांप्रमाणेच सशक्त आणि समृद्ध आहे हे वास्तव अधोरेखित झाले आहे.

होती. आईकडून ऐकलेल्या गोष्टी त्यांच्या भावविश्वात मोलाची भर घालणाऱ्या ठरल्या. वडिलही त्यांना गोष्टीची पुस्तके आणून द्यायचे. शाळेच्याही वाचनालयाचा त्यांनी लाभ घेतला. वाचनाला उद्युक्त करणारे चंद्रकांत केरकर सारखे शिक्षक त्यांना लाभले. या शिक्षकांनी त्यांच्यामध्ये असलेले लेखनाचे गुण हेरले व त्यांना लेखनाला प्रवृत्त केले.

मावजोनी कॉलेज जीवनात फारसे काही लिहिले नाही. पुन्हा आपल्या सृजनशील अभिव्यक्तीसाठी मराठी ऐवजी कोकणी भाषा का निवडली याचा विचार फार महत्वाचा वाटतो. ज्या काळात स्वकीयांकडून कोकणी भाषेला हिणवले जायचे त्या काळाचा विचार केला असता त्यांची ही निवड महत्वाची वाटते. कोकणी ही आपली स्वाभाविक अभिव्यक्तीची भाषा आहे याचा साक्षात्कार त्यांना महाविद्यालयीन काळात झाला.

साहित्याच्या वृद्धीसाठी सामाजिक व सांस्कृतिक वातावरण अनुकूल असावे लागते. मावजोनी लेखनास प्रारंभ केला तेव्हा या वातावरणाचा अभाव होता. गोव्याच्या मुक्ती नंतर 'नवें गोंय' हे वाङमयीन नियतकालीक प्रसिद्ध व्हायला लागले. या नियतकालीकातून अनेक लेखक लिहू लागले. मावजोच्या सुरवातीच्या कथा 'नवें गोंय' मधून प्रसिद्ध झाल्या. त्यात त्यांची 'मरण येना म्हूण' या बहुचर्चित कथेचा समावेश होतो. लांबीने छोटी तथापि अत्यंत आशयघन अशी ही कथा अनेक देशी व परदेशी भाषांतून अनुवादीत झाली आहे. या लेखकाने दीर्घ पल्ल्याच्या कथा फारशा लिहिलेल्या नाहीत. कथावस्तूचा अचूक वेध घेणे ते पसंत करतात. अनावश्यक तपशीलामुळे कथावस्तू हरवून जाते ही त्यांची धारणा.

लेखक म्हणून त्यांच्या जडणघडणीच्या काळात त्यांनी काही महत्वाचे मराठी कथाकार वाचले. मात्र कोणत्याही मराठी कथाकाराचा प्रभाव त्यांच्या कथेवर दिसून येत नाही. पुढे त्यांनी काफ्का, काम्यु, हेमिंग्वे यांचे साहित्य वाचले. 'गांथन' या संग्रहातील कथांवर थोडाफार हेमिंग्वेचा प्रभाव दिसून येतो. साधी, सोपी, ओघवती भाषा हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य त्यांनी सतत जपलेले आहे. त्यांची 'खंयचे कडेन कांय ना' सारखी कथा ॲब्सर्ड आशयाची वाटते. हा प्रवाह अ. ना. म्हांब्रो यांनी कोकणी कथेत रुढ केला. या काळात त्यांनी 'सदानंद' या कथेत परपीडेत आनंद घेणारे



ज्ञानपीठप्राप्त दामोदर मावजो

पात्र रंगवले. 'जागरणांह्' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह. कोकणी कथेला पुढे नेणाऱ्या या संग्रहात 'कोयसांवालीं गोरवां' सारखी अप्रतिम कथा वाचायला मिळते. जिवापाड प्रेम असलेल्या आपल्या गाईंना विकायचा प्रसंग कोयसांव आणि इनास यांच्यावर येतो. पण फेस्ताच्या गुरांच्या बाजाराला त्यांची गुरे विकली जात नाहीत. जिथे आपलंच पोट भरणं कठीण होत चाललेलं आहे तिथे या पाळीव प्राण्यांचे पोट कसे भरावे असे मोठे प्रश्नचिन्ह त्यांच्या पुढे उभे राहते. 'तो हांव न्हय' ही कथा जीवनातील नैतीक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करते. नवरा जहाजावर नोकरी करण्यासाठी गेल्यामुळे ऐन तारूण्यातली लुसी नवऱ्याच्या डॉक्टर मित्राला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करते. मावजोच्या अनेक कथांत ह्या शारीरिक तणावातून त्यांची पात्रे जातात. 'नवी केस' या कथेतील कुंतल हे अविवाहीत राहिल्यामुळे मानसिक व शारीरिक ताणातून जाताना दिसते. हाच ताण 'जीव दिवं काय च्या मारू' या कादंबरीतल्या पात्रांचा अनुभव आहे.

'कार्मेलीन' ही मावजो यांची बहुचर्चित कादंबरी. या

कादंबरीचे बीज त्यांना आपल्या पसऱ्यावर गवसले. कार्मेलीन आया म्हणून आखाती देशात जाते ती केवळ आपद्‌धर्म म्हणून. तिला दिनार मिळतात पण त्याच बरोबर तिला लैंगीक शोषणाला सामोरे जावे लागते. हा अनुभव आपल्या मुलीला येवू नये याची ती काळजी घेत असते. आखाती देशांच्या आकर्षणामुळे गोव्यातल्या गावांचा चेहरामोहरा बदलून गेला. 'भुरगीं म्हगेलीं तीं' व 'मिंगेलेलीं घरचीं' या दोन कथा माणसाच्या जीवनातल्या एकटेपणाचा वेध घेणाऱ्या आहेत. त्यांच्या काही कथा विक्षिप्त माणसांच्या आहेत. उदा. 'सिनीक' या कथेतले पात्र जगाकडे तुच्छतेने पाहते. प्रत्येक गोष्टीकडे तो सिनिकल नजेरेने पाहतो त्यामुळे त्याच्या कुटुंबाची परवड होते. पण त्याची त्याला अजिबात फिकीर नसते. त्याच्या छोट्या नातवाच्या अंत्यसंस्कारावेळी त्याला अनाहूतपणे हुंदका फुटतो. माणसाच्या मनात खोल कुठेतरी मायेचा ओलावा असतो. वरपांगी तो कितीही कठोर वाटला तरी, हेच लेखक सुचवतो. 'तिष्ठावणी' या कथासंग्रहाला अरुण खोपकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. मावजोंच्या कथेच्या तंत्रासबंधी लिहिताना ते म्हणतात : 'मावजोंच्या कथांत निवेदकाच्या निवडीतही अनेक प्रकार दिसून येतात. कधी सर्वज्ञ निवेदक कथा सांगतो. कधी उदा. 'म्हाका कित्याक पडलां' सारख्या कथेत ते निवेदकाचे नावही देत नाहीत. पण त्याला ज्याचा अभिमान आहे, अशा जानव्या सारखा एखादा तपशील ते देतात.' त्यांच्या कथेवर खोपकर यांनी केलेले हे मार्मीक भाष्य. कथेच्या तंत्रावर त्यांची जबरदस्त हुकुमत. 'तिष्ठावणी', 'यासीन, ऑस्टीन, यतीन', 'बर्गर' सारख्या कथा अनपेक्षित कलाटणीने संपतात. तेव्हा कथेचा वाचक बसलेल्या धक्क्यातून स्वतःला सावरायच्या प्रयत्नात असतो. अशा कथा सांकेतीक वाटल्या तरी 'जंटलमन चोर', 'पिशेपणा' किंवा अलिकडे प्रसिद्ध झालेली 'हें मडें कोणाचें?' सारख्या कथा आशय व तंत्राच्या दृष्टीने वेगळ्या आहेत.

मावजोनी कथेबरोबर कादंबऱ्याही लिहिल्या. 'कार्मेलीन' या कादंबरीला उदंड यश मिळाले. तिचे अनेक अनुवाद जवळपास बारा भारतीय भाषांतून झाले आहेत. विद्या पै यांनी केलेला इंग्रजी अनुवाद वाचकांना उपलब्ध आहे. सुनामीची पार्श्वभूमी असलेली 'सुनामी सायमन' या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झालेला असून तिला विचक्षण वाचक व समिक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळालेला आहे. 'जीव दिवं काय च्या मारूं' ही त्यांची अलिकडे प्रसिद्ध झालेली नवीन कादंबरी. या कादंबरीला अस्तित्ववादाची बैठक आहे. एका स्वार्थी, विचित्र आणि दुराचारी घराण्यात जन्माला आलेल्या बिपीन या मुलाची ही कथा आहे. असामान्य बुद्धी लाभलेला बिपीन विपरीत परिस्थितीशी संघर्ष करून आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. आपल्या सभोवतालच्या जगाकडे तिरकस दृष्टीने पाहणारा बिपीन तारूण्याच्या उंबरठ्यावर दोन मुलींच्या प्रेमात पडतो. एक हिंदू व दुसरी मुस्लीम. चित्रा ही उत्तम चित्रकार असते तर फातिमाला शेरशायरी यांची आवड असते. चित्रा ही समलिंगी असल्याचे कळल्यावर बिपीन हादरतो. सामाजिक बंधनामुळे बिपीन फातिमाशी आंतरधर्मीय लग्न करू शकत नाही. एक विलक्षण अनुभव कथन करणारी ही कादंबरी. मानसशास्त्र, समाजशास्त्र या दोन परिप्रेक्ष्यातून ही कादंबरी वाचली पाहिजे. ही कादंबरी वाचताना मार्खेज, जुझे सारामागो व क्लॅरीस लिस्पेक्टोर या लेखकांची आठवण होते. या कादंबरीचा कन्नड भाषेत झालेला अनुभव कन्नड वाचकांचे लक्ष वेधणारा ठरला आहे. त्याचप्रमाणे मराठी व इंग्रजी अनुवाद प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

दामोदर मावजो पूर्णपणे नास्तिक, निधर्मी व प्रागतिक विचारांचे आहेत. दक्षिणायन गोवाचे ते अध्यक्ष आहेत. मावजोंच्या ळपज्ञ ेष वळींशपीं ह्या पुस्तकात त्यांच्या प्रागतिक विचारांचे प्रतिबिंब पडले आहे.

गोव्यातील एका सनातनी संस्थेवर प्रखर टीका केल्यावर त्यांना धमक्या येऊ लागल्या. त्यानंतर गोवा सरकारने त्यांना पोलिस संरक्षण दिले आहे. प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर मावजो यांनी कॅन्सरसारख्या दुर्धर रोगावर मात केली आहे.

रवींद्र केळेकर यांच्या नंतर दामोदर मावजो यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे कोकणी भाषा इतर भारतीय भाषांप्रमाणेच सशक्त आणि समृद्ध आहे हे वास्तव अधोरेखित झाले आहे.

**माधव बोरकार**, गोवा
Mob. 9420222876

मीना कर्णिक

# महोत्सवामधले फील गुड सिनेमे

काही सिनेमे पाहून मन प्रसन्न होतं. ते खूप ग्रेट सिनेमे असतात असं नाही, पण त्यांच्यात काहीतरी गोडवा असतो. मात्र एक साधी-सोपी गोष्ट सांगतानाही दिग्दर्शक आपल्याला अधिक काहीतरी सांगू पाहत असतातच. अशा काही सिनेमांविषयी-

प्लंबिंग आणि इलेक्ट्रिशियनचं काम करणारे तिघे. अत्यंत सामान्य आयुष्य घालवणारे. आणि त्यांच्यावरही एक छान सिनेमा बनू शकतो हे सांगणारा स्पेनचा 'द ऑड - जॉब मेन' हा सिनेमा.

वीसेक वर्षांपासून काम न मिळालेली एक ऐंशी वर्षांची अभिनेत्री. आणि आयुष्यातला शेवटचा सिनेमा करण्यासाठी तिनं अर्जेंटिनामधून थेट पॅराग्वेपर्यंत घेतलेली रोड ट्रिप दाखवणारा 'शार्लोट' हा सिनेमा.

आणि हीसुद्धा एक रोड ट्रिपच. बारा-तेरा वर्षांच्या एका पॅराप्लेजिक मुलानं आपल्या मैत्रिणीबरोबर तिच्या वडिलांच्या शोधासाठी घेतलेली. 'ऑन व्हील्स'मधली.

'व्हील ऑफ फॉर्च्युन अँड फँटसी' या तिघांपेक्षा जरा वेगळा. तीन छोट्या छोट्या गोष्टींमधून आधुनिक जगातल्या तरुण मुलींच्या भावविश्वात डोकावणारा.

या चारही सिनेमांमध्ये वरवर पाहता 'फील गुड' असं काही असण्याची शक्यता वाटत नाही. पण तरीही या वर्षीच्या गोव्याच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामधे या सिनेमांनी छान सिनेमा पाहिला मिळाल्याचा दिलासा निश्चितच दिला.

'द ऑड - जॉब मेन'ची गोष्ट घडते बार्सिलोनामधे. व्हालेरो आणि पेप एका छोट्याशा प्लंबिंग कंपनीमधे काम करत असतात. ही कंपनी आहे व्हालेरोच्या बायकोची. पेपला आता निवृत्तीचे वेध लागले आहेत. त्याची जागा घेण्यासाठी व्हालेरोची बायको मोहा, म्हणजे मोहम्मद मेलाली नावाच्या मोरोक्कोहून बार्सिलोनामधे राहायला आलेल्या तरुण मुलाची निवड करते. एक आठवडा त्याची ट्रायल घेऊन ही नोकरी त्याला द्यायची की नाही ते ठरणार असतं. त्या एका आठवड्याचा हा सिनेमा.

मोहाविषयी पहिल्या क्षणापासून व्हालेरोच्या मनात अढी निर्माण होते. पण एकत्र काम करणं भाग असतंच. तो हर

ब्राझिलचा 'ऑन व्हील्स'हा म्हटलं तर रोड मुव्हीच आहे. बारा तेरा वर्षांच्या दोन मुलांची ही गोष्ट. यातला मुलगा, ल्युकास अपंग आहे. मात्र, त्याच्या वागण्याबोलण्यात कुठेही त्या अपंगत्वाचं अस्तित्त्व जाणवत नाही. त्याचे आईवडीलही त्याच्याशी वागताना तो नॉर्मल असल्यासारखे वागतात आणि शाळेतले शिक्षक आणि वर्गमित्रही. त्याच्या वडिलांनी खास त्याला चालवता येईल अशी मोटरसायकल बनवून घेतलीये. मुलगी, लाईस, आई आणि आजीबरोबर रहातेय. आपले वडील कोण होते किंवा आहेत या प्रश्नाने तिचा पिच्छा पुरवलाय. एक दिवस तुझे वडील कामासाठी म्हणून बाहेर गेले आणि परत आलेच नाहीत, इतकंच आईने तिला सांगितलंय. आईपाशी एक फोटो आहे. त्यातला वडिलांच्या चेहर्‍याचा भाग तिने फाडून टाकलाय. उरलेल्या फोटोत आईने कडेवर घेतलेली ही छोटी लाईस आणि एक लाल रंगाची गाडी तेवढी दिसतेय.

तऱ्हेनं मोहा या कामासाठी कसा लायक नाहीये हे बायकोला आणि पेपला पटवून देण्याचा प्रयत्न करतो. सुरुवातीला, आपल्या ग्राहकांना मोहासारखा दुसऱ्या देशातला विस्थापित घरात घुसलेला आवडणार नाही असं सांगू पाहतो. मग त्याला काम जमत नाही हे दाखवू पाहतो.

पण मुळात व्हालेरोच्या मनात मोहाविषयी इतका नकारात्मक भाव का असतो? वरवर पाहता तो निव्वळ परकीयांवरचा राग असल्याचं जाणवतं. पण थोडं खोलात शिरल्यावर लक्षात येतं, व्हालेरोनं आयुष्यात जे जे गमावलंय ते ते सगळं मोहापाशी आहे. मध्यमवयीन व्हालेरो आता स्थूल झालाय. एका लग्नासाठी जुना सूट फिट व्हायला हवा म्हणून डाएट करतोय. मोहा अर्थातच तरुण आहे, तंदुरुस्त आहे आणि आनंदी आहे. जगाकडं पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन आशावादी आहे. म्हणून तर दिवसभर नोकरी करून तो संध्याकाळी बार्सिलोनाची कॅटलन भाषा शिकण्यासाठी क्लासला जातोय. आणि आयुष्यभर आपण जे काम करत आलोय त्यात कसला आलाय आशावाद, असा व्हालेरोचा दृष्टिकोन आहे. मोहाच्या कामात फारशा चुका काढू न शकणारा व्हालेरो आपल्या मनात खदखदणारा राग स्वाभाविकपणे मोहाबरोबरच्या वागण्यातून व्यक्त करतोय. त्याच्याशी तुसडेपणानं वागतो, त्याला काम जमत नाही असं म्हणत राहतो.

गंमत म्हणजे, ज्या ग्राहकांना मोहा आवडणार नाही असं व्हालेरोला वाटतंय त्या सगळ्यांनी मोहाला सहज स्वीकारलंय. एक शंभर वर्षांचे आजोबा त्याला आपल्या तरुणाईचं रहस्य सांगतात. एक फोटोग्राफर त्याच्या तगड्या शरीरावर भाळून त्याला आपला मॉडेल बनवते. आणि एका घरातल्या दोन लहान जुळ्या बहिणी व्हालेरो आणि मोहाला त्यांच्या घराच्या बाल्कनीमधे अडकवून ठेवतात. वेगवेगळी माणसं, अनोळखी घरं आणि त्यांचे अनेकविध अनुभव.

''मी माझ्या शेजाऱ्यांना ओळखतही नाही. आमच्या दरम्यान एक भिंत आहे. पाणी, वीज, गॅस, टेलिफोन या सगळ्यांच्या वायर्सनी आम्ही एकमेकांना जोडलेलो आहोत तरीही. तीच गोष्ट या शहराची, इतर शहरांची. आणि तरीही आपण एकटे आहोत,'' मोहाच्या स्वगतानं सिनेमाची सुरुवात होते. आणि हळूहळू लक्षात येतं, की हसत खेळत पुढे सरकणाऱ्या या सिनेमाचा गाभाच मुळी तो आहे.

प्लंबर किंवा इलेक्ट्रिशियन ही माणसं आपल्या कुटुंबाचा एक भाग असतात याची जाणीवही आपल्याला कधी होत नाही. आपल्या घरातल्या कोणत्याही खोलीमधे शिरण्याची त्यांना मुभा असते. त्यांच्या कामाचं स्वरूपच तसं असतं. आपण मात्र त्यांची दखल घेतो ते आपल्याला त्यांची गरज लागते तेव्हाच. त्यांच्या एरवीच्या आयुष्यात त्यांचं काय चालतं याचं आपल्याला सोयरसुतकही नसतं. आपण त्यांच्याशी कोणत्याच पातळीवर जोडले गेलेलो नसतो.

हे असं जोडलेलं नसणं म्हणजे काय ते हा सिनेमा सांगू पाहतो. मोहा आणि व्हालेरोच्या निमित्तानं आपण दोन भिन्न भाषिकांमधलं, दोन संस्कृतींमधलं विभागलेपण दाखवतो. माझ्या देशात तू आलायस म्हणून तू माझ्याशी नम्रपणे वागायला हवं या अहंभावाशी सामना करू पाहतो. आणि प्लंबिंग आणि इलेक्ट्रिशियनच्या अत्यंत रूक्ष कामामधून प्रेक्षकांना जोडण्याचा प्रयत्न करू मागतो.

दिग्दर्शक नेएस बाल्यूचा हा तिसरा सिनेमा. आपल्या या सिनेमाचं वर्णन करताना ती म्हणते, ''ही एक प्रकारे हायब्रिड डॉक्युमेंटरी आहे. प्रत्यक्ष आयुष्य आणि कल्पना यांचं मिश्रण.'' या सिनेमातले तीनही मुख्य कलाकार प्रत्यक्ष आयुष्यात खरोखरंच प्लंबर आहेत. त्यांनी दिग्दर्शकाबरोबर तीन वर्षं प्रशिक्षण घेतलं. त्यांच्या कामातल्या अनुभवाचाही नेएसने उपयोग करून घेतला. त्यामुळं सिनेमातल्या घटना खूप खऱ्या वाटतात. त्यात फार काही घडतं असं नाही, पण माणसांच्या स्वभावाचे कंगोरे दिसतात आणि त्यातून गंमत निर्माण होते. या आपल्या ओळखीच्या जगाची मग नव्यानं ओळख होते.

0

ॲन्जेला मोलिना ही ६६ वर्षांची एक स्पॅनिश अभिनेत्री आहे. अनेक स्पॅनिश सिनेमांमधून तिनं काम केलेलं आहेच, पण बऱ्याच इटालिअन सिनेमांमधून आणि टेलिव्हिजन मालिकांमधूनही ती प्रेक्षकांसमोर आलेली आहे. १९७६पासून तिनं काम करायला सुरुवात केली आणि आजही नायिका म्हणून तिच्यासाठी सिनेमा लिहिला जातोय. 'शार्लोट'ची नायिका तीच आहे. मात्र, इथं ती जवळपास ८० वर्षांची आहे. गेली वीस वर्षं कामाशिवाय जगतेय. आपल्या जुन्या दिवसांची आठवण काढतेय.

सिनेमाचा टोन पहिल्या क्षणापासून आपल्या लक्षात येतो.

शार्लोट आपल्या मानसोपचार तज्ज्ञाकडं नेहमीच्या सेशनसाठी आलीये. इतर बऱ्याच गोष्टी बोलताना ती मधेच

त्याला विचारते, ‘‘जे घडलेलं नाही त्याच्या आठवणी येऊ लागल्या तर काय करायचं?’’

दरम्यान, मागं बसलेल्या तिच्या मानसोपचार तज्ज्ञाचा श्वास कोंडू लागलेला असतो. क्षणात तो खाली कोसळतो. शार्लोट त्याला तपासून पाहते आणि तो जिवंत नाही हे तिच्या लक्षात येतं. त्याच्या ड्रॉवरमधून आपल्याला हव्या असलेल्या औषधांच्या बचकभर गोळ्या ती पर्समधे टाकते आणि खोलीच्या बाहेर येते.

बाहेर बसलेली रिसेप्शनिस्ट तिला विचारते, ‘‘पुढची अपॉइंटमेंट हवीये का?’’

‘‘नको. आणि मला वाटतं तू आत जाऊन डॉक्टरांना पहावं. ही इज डेड.’’

मृत्यूचा प्रसंग विनोदी पद्धतीनं दाखवताना दिग्दर्शक सिमॉन फ्रॉन्को आपली ओळख स्वत:च्या विश्वात रमलेल्या, भूतकाळ विसरू न शकणाऱ्या एका स्वयंकेंद्रित अभिनेत्रीशी करून देतो. हळूहळू ही ओळख दाट होत जाते. तिचं एखाद्या भव्य वाड्यासारखं जुनं घर, तिच्या सेवेत चोवीस तास असणारा तरुण तैवानी मुलगा, त्या दोघांचं नातं आपल्या समोर उलगडत जातं.

ज्या दिग्दर्शकामुळं शार्लोटची कारकिर्द बहरलेली असते तो त्याच्या शेवटच्या सिनेमाचं शूटिंग पॅराग्वेमधे सुरू करणार असल्याची बातमी शार्लोटला कळते. या सिनेमाची पटकथा तिला माहीत असते. किंबहुना, त्यातली भूमिका तिच्यासाठीच लिहिलेली आहे हेही तिला ठाऊक असतं. आपली भूमिका दुसरं कोणी करूच शकत नाही, ती आपणच करायला हवी या हट्टानं ती पेटून उठते आणि आपलं मोडकळीला आलेलं घर भाड्यानं देऊन एक भली थोरली व्हॅन घेऊन पॅराग्वेच्या दिशेनं निघते. ड्रायव्हर अर्थातच तिचा तैवानी मदतनीस. संपूर्ण रात्र ती त्याला झोपू देत नाही. आणि दोन देशांमधली सीमा पार करायची वेळ येते तेव्हा सांगते, ‘‘माझ्यापाशी पासपोर्ट नाही. तो वीस वर्षांपूर्वीच एक्सपायर झालाय!’’

आपल्या दिग्दर्शक मित्राला भेटण्यासाठी तिनं केलेला आटापिटा म्हणजे हा सिनेमा आहे. पैसे संपल्यावर ती एका चेहऱ्याला तजेला आणणाऱ्या क्रीमच्या जाहिरातीमधे काम करायचं मान्य करते. आणि ‘‘तुमच्या क्रीमनं माझा चेहरा खराब झालाय,’’ असं सांगून संपूर्ण चेहरा कागदानं झाकून शूटिंग करायला नकारही देते.

भूतकाळ मुठीत पकडून ठेवणाऱ्या आणि तरीही भविष्याची स्वप्नं पाहणाऱ्या या विक्षिप्त पण गोड शार्लोटच्या आपण कधी प्रेमात पडतो ते आपल्यालाही कळत नाही.

दिग्दर्शक सिमॉन फ्रॉन्को गोव्याला आले होते. आपल्या या सिनेमाविषयी बोलताना त्यांनी सांगितलं, ‘‘आपण एके काळी कोण होतो आणि आता काय आहोत याचं शार्लोटला भान येतं आणि त्या क्षणापासून तिचा प्रवास सुरू होतो. पण हा प्रवास केवळ ती पार करत असलेलं अंतर नाही, तर तो मानसिक अधिक आहे. वैयक्तिक आहे.’’

शार्लोटचा मदतनीस तैवानी का आहे असा प्रश्न स्वाभाविकच विचारला गेला. त्यावर सिनेमाच्या निर्माती लेना फर्नांडेज म्हणाल्या, ‘‘पॅराग्वेमधे तैवानहून आलेल्या लोकांची संख्या मोठी आहे. आमच्या देशानं त्यांना मान्यता दिलेली आहे. आणि वेगवेगळ्या संस्कृतींच्या लोकांचं प्रतिबिंब सिनेमात पडावं असं आम्हांला वाटत होतं. त्यामुळं सिनेमाला आंतरराष्ट्रीय फ्लेवरही येतो.’’

या सिनेमाचा शेवटही खास आहे. शार्लोट चेहऱ्यावर तजेला आणणाऱ्या क्रीमची जाहिरात करण्याचं मान्य करते. जाहिरातीमध्ये तिचा मूळ म्हातारा चेहरा आधी दाखवला जातो. आणि मग क्रीम लावल्यानंतर पडद्यावर येणारा चेहरा अर्थातच फोटोशॉप करून तरुण दिसेल असं बघितलं जातं. त्यावरच्या सुरकुत्या सगळ्या काढून टाकल्या जातात. ही जाहिरात पाहून शार्लोट खूप चिडते. असं खोटं खोटं तरुण दिसणं तिला अजिबातच पसंत पडत नाही.

सिनेमा संपतो तेव्हा आपल्याला जाहिरातीचं दिग्दर्शन करणारी मुलगी दिसते. त्या क्रीमची तिची जाहिरात पाहण्यासाठी संबंधित अधिकारी बसलेले दिसतात. जाहिरात सुरू होते. आपल्याला शार्लोट दिसते. मग ती क्रीम वापरू लागते. आणि त्यानंतर दिसणारी शार्लोटही म्हातारीच आहे. पण तिच्या चेहऱ्यावर अधिक आत्मविश्वास आहे. आणि पडद्यावर ओळ उमटते–

‘वुई आर बॉर्न टु डाय.’

या सिनेमाचं सगळं सार या बदललेल्या जाहिरातीमधे आहे. त्यामुळे या साध्या-सोप्या गोड सिनेमालाही एक आगळं परिमाण मिळालंय. आणि तो नुसताच ‘फील गुड’ सिनेमा राहिलेला नाही.

अॅन्जेला मोलिना यांना या वर्षी इफ्फीमधे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळाला हे इथं आवर्जून सांगायला हवं.

0

ब्राझिलचा 'ऑन व्हील्स'हा म्हटलं तर रोड मुव्हीच आहे. बारा-तेरा वर्षांच्या दोन मुलांची ही गोष्ट. यातला मुलगा, ल्युकास अपंग आहे. मात्र, त्याच्या वागण्याबोलण्यात कुठेही त्या अपंगत्वाचं अस्तित्व जाणवत नाही. त्याचे आईवडीलही त्याच्याशी वागताना तो नॉर्मल असल्यासारखं वागतात आणि शाळेतले शिक्षक व वर्गमित्रही. त्याच्या वडिलांनी खास त्याला चालवता येईल अशी मोटारसायकल बनवून घेतलीये.

मुलगी- लाईस, आई आणि आजीबरोबर राहतेय. आपले वडील कोण होते किंवा आहेत या प्रश्नानं तिचा पिच्छा पुरवलाय. ''एक दिवस तुझे वडील कामासाठी म्हणून बाहेर गेले आणि परत आलेच नाहीत,'' इतकंच आईनं तिला सांगितलंय. आईपाशी एक फोटो आहे. त्यातला वडिलांच्या चेहऱ्याचा भाग तिनं फाडून टाकलाय. उरलेल्या फोटोत आईनं कडेवर घेतलेली ही छोटी लाईस आणि एक लाल रंगाची गाडी तेवढी दिसतेय.

कोणत्याही परिस्थितीत वडिलांना शोधून काढायचं हा ध्यास लाईसनं घेतलाय. एक दिवस यासाठी ती घरातून पळून जायचं ठरवते. ल्युकास तिचा मित्र असल्यामुळं त्यालाही बोलावते. आपल्या खास मोटारसायकलवरून ल्युकास आणि साध्या सायकलवरून लाईस यांचा प्रवास सुरू होतो.

या प्रवासात त्यांना भेटणारी माणसं, येणारे अनुभव, मित्र म्हणून त्यांचं अधिक जवळ येणं, आपल्या अपंगत्वाविषयी ल्युकासला वाटणारी खंत, त्यानं स्वीकारलेलं आपलं शरीर, लाईसला जाणवलेलं वडिलांविषयीचं सत्य... अशा छोट्यामोठ्या हेलकाव्यांमधून हा सिनेमा पुढे सरकतो आणि शेवटी जे आपल्या मुठीत आहे तेच खरं, जे नाही त्याच्या मागं का लागायचं, असं सांगून संपतो.

इथंही या दोन मुलांच्या प्रवासात खूप काही साहसी घडत नाही. नाही म्हणायला, एका म्हाताऱ्या बाईच्या घरी जेवण मिळतंय म्हणून ल्युकास आणि लाईस थांबतात. काळोखं घर, मिणमिणणारे दिवे, रहस्यमय वातावरण आणि म्हातारीच्या मेलेल्या नवऱ्याचं अस्तित्व काही काळ आपल्याला धस्स करतं खरं, या मुलांना आता कोणत्या परिस्थितीला सामोरं जावं लागणार या विचारानं आपण अस्वस्थ होतो. पण क्षणभरच. कारण ल्युकास आणि

व्हील ऑफ फॉर्च्युन अँड फँटसी



लाईसही काही क्षणांतच त्या घरातून बाहेर पडतात. कारण प्रेक्षकांना घाबरवणं किंवा त्यांच्यावर दडपण आणणं हा मुळी दिग्दर्शकाचा हेतूच नाही. या दोन मुलांना जगाचं भान येणं, आपल्या परिस्थितीचं भान येणं एवढंच त्याला दाखवायचंय. तेही फार गंभीरपणे नाही, हसतखेळत. म्हणून तर सिनेमा संपतो तेव्हा आपल्या चेहऱ्यावरही एक बारीकसं हसू उमटलेलं असतं. मन प्रसन्न झालेलं असतं. एखाद्या सिनेमानं एवढं केलं तरी खूप झालं की!

0

'व्हील ऑफ फॉर्च्युन अँड फँटसी'चं जपानी नाव आहे 'गुझेन तो सोझो' आणि त्याचा अर्थ दिलाय, 'योगायोग आणि कल्पनाविलास.' तीन छोट्या छोट्या गोष्टींचा मिळून हा सिनेमा आहे. तीन तरुण मुलींच्या गोष्टी हा यातला समान धागा.

पहिल्या गोष्टीचं नाव आहे, 'मॅजिक (ऑर समथिंग लेस अशुअरिंग)'. मिको आपल्या अतिशय जवळच्या मैत्रिणीबरोबर टॅक्सीतून प्रवास करत असते. मैत्रीण नव्यानं तिला भेटलेल्या एका मुलाविषयी भरभरून बोलत असते. आमच्यात काहीतरी बॉन्ड तयार झालाय, हे नातं पुढे जाऊ शकतं असं सांगत असते. आणि मिकोच्या लक्षात येतं की आपली ही मैत्रीण ज्याच्या प्रेमात पडतेय तो आपला माजी प्रियकर, काझुआकी आहे. मैत्रिणीच्या बोलण्यातून तिला हेही कळतं की तो अजून आपल्याला विसरलेला नाहीये. मैत्रिणीला घरी सोडून मिको टॅक्सी पुन्हा मागे वळवते आणि थेट काझुआकीच्या ऑफिसमधे जाते. आपल्या दोघांनाही अजून एकमेकांविषयी आकर्षण आहे याची जाणीव त्यांना होते. पण त्याचं काय करायचं हे मात्र समजत नाही. कारण दोघांच्याही आयुष्याकडून असलेल्या अपेक्षा वेगवेगळ्या असतात.

मग एक दिवस मिको आणि तिची मैत्रीण कॅफेमधे बसलेल्या असताना त्यांना काझुआकी भेटतो. तो ऑकवर्ड होतो. मिको काही बोलणार का? आपल्याविषयी काही सांगणार का? मिकोच्याही मनात द्वंद्व आहे. सांगून टाकावं का मैत्रिणीला सगळं? मोडावं का यांचं नव्यानं निर्माण होऊ लागलेलं नातं?

दुसऱ्या गोष्टीचं नाव आहे, 'डोअर वाईड ओपन', नाओ या मुलीची. नाओचं लग्न झालंय आणि सासाकी नावाच्या मित्राबरोबर निव्वळ सेक्स करण्यापुरतं तिचं नातं आहे. या सासाकीचा कॉलेजातल्या त्यांच्या सेगावा नावाच्या एका प्राध्यापकावर राग आहे. सेगावा यांना त्यांच्या एका पुस्तकासाठी मानाचा पुरस्कार मिळतो आणि त्यांची बदनामी करण्याच्या हेतूनं सासाकी नाओची मदत मागतो. नाओ प्राध्यापकांच्या ऑफिसमधे जाते. दरवाजा बंद करणार तोच ते तिला म्हणतात, ''दरवाजा उघडाच असू दे.'' मग नाओ त्यांच्याशी पुस्तकाविषयी, त्यातल्या काही वासना उद्दिपीत करणाऱ्या परिच्छेदांविषयी बोलू लागते. आणि त्यावरचं प्राध्यापकांचं म्हणणं रेकॉर्ड करते. ही क्लिप तिच्याकडून चुकीनं सेगावाला पाठवली जाते. प्राध्यापकांची बदनामी होते. आपल्यामुळे हे घडलं याची खंत आणि अपराधी जाणीव नाओला कायम कुरतडत राहते.

तिसरी गोष्ट आहे दोन बायकांची. नाव आहे 'वन्स अगेन'. आया आणि नात्सुकोची. अनेक वर्षांनी शाळेतले मित्रमैत्रिणी भेटायचं ठरवतात आणि आयाला आपल्या एका वर्गमैत्रिणीची तीव्रतेने आठवण येते. तिचं पहिलं प्रेम.

स्टेशनवर तिला ही मैत्रीण दिसते. दोघी एकमेकींकडं बघून हसतात. ती आयाला आपल्या घरी घेऊन येते आणि म्हणते, ''माफ कर, पण मला तुझं नाव किंवा चेहरा आठवतच नाहीये.'' अधिक तपशिलात बोलल्यावर दोघींच्याही लक्षात येतं की शाळेतल्या मैत्रिणी तर दूरच, आपण एकमेकींना ओळखतच नाही. पण आता ओळख तर झालेली असते. दोघी एकमेकींशी बोलू लागतात, मनातल्या भावना व्यक्त करू लागतात आणि एकमेकींच्या दु:खांवर फुंकरही घालतात.

अतिशय साध्या गोष्टी. दिग्दर्शक रुसुकी हामागुची यांनी तितक्याच साधेपणानं सांगितलेल्या. फारसं खोलात न शिरता. इथं जे दिसतं तेवढंच आहे याची जाणीव आपल्याला ताबडतोब होते. पण त्यातला हळुवारपणा भावतो. वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या आयुष्यातलं हे डोकावणं आपल्याला निश्चितच काहीतरी देऊन जातं. फार काळ या व्यक्तिरेखा आपल्याला गुंतवून ठेवत नाहीत. तरीही जोवर त्या पडद्यावर दिसत राहतात तोवर आपण त्यात रंगून जातो एवढं नक्की.

**मीना कर्णिक,** मुंबई
meenakarnik@gmail.com
Mob. 98197 67518

बालसाहित्याच्या नवलनगरीत

स्वाती राजे

# प्राणिविश्वातले ठकसेन

इसाप कथा, पंचतंत्र आणि त्या पूर्वीच्या जातक कथांनी घालून दिलेल्या पायवाटेवरून फेबल्स किंवा कल्पित कथा पुढे शतकानुशतके विविध परिवेषांत प्रवास करत राहिल्या. हा जगातला सर्वांत जुना कथाविषय. माणूस आणि प्राण्यांच्या या गूढरम्य नात्याला माणसाने आपल्या विचारांत, जगण्यात आणि अभिव्यक्तीत प्राचीन काळापासून स्थान दिलेलं दिसतं. अगदी ख्रिस्तपूर्व ११२० मधल्या इजिप्शिअन भित्तिचित्रात एक मांजर बदकांना हाकत असल्याचं दृश्य पाहायला मिळतं. आणि एटनाच्या ॲकेडियन दंतकथेत साप आणि गरुडाची कहाणी आपल्याला सापडते. आपल्याकडच्या मिथक कथा-पुराणकथांत नर-सिंह आढळतो. त्याचा उलटा प्रकार स्पिंक्स. माणसानं प्राणिजीवनाला फार निरनिराळ्या प्रकारांनी न्याहाळण्याचा, त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. आदिम काळात भक्ष्य म्हणून त्यांचा विचार करताना पुढं स्थिर कृषी जीवनातील एक महत्त्वाचा अवजार मानलं. जगण्याची गती आणि व्याप्ती वाढवण्यासाठी दळणवळणाचं साधन बनवलं. त्याची उपयुक्तता आणि उपकार जाणून कृतज्ञता व्यक्त करताना त्याला दैवत्व बहाल केलं. माणूस आणि प्राण्यांच्या सहजीवनाचं प्रतिबिंब घडवणाऱ्या या प्राणिकथा जगाच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. धर्मप्रसारानिमित्तानं, साम्राज्यविस्तारासाठी आणि व्यापारासाठी, अभ्यास-व्यासंग किंवा अन्य कारणानं सर्वदूर प्रवास करणाऱ्या पर्यटकांकडून या कथा संक्रमित होत राहिल्या. आपापल्या भौगोलिक सीमा ओलांडत गेल्या. इथून तिथं जाताना या गोष्टींनी त्या त्या हवेचे गंध वाहून नेले आणि जिथं त्या रुजल्या तिथल्या मातीचे रंग ल्यायल्या. लोकजीवनातून आलेल्या लोककथांचा संकर होत त्या त्या कहाण्या तिथं आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण रूपरंग-पोतांत सजत राहिल्या. पंचतंत्रातील करटक आणि दमनकांची कोल्हेकुई मध्य पूर्व आणि पश्चिमेकडच्या जगात सर्वदूरच्या कहाण्यांतून आपापल्या आवाजात उमटत राहिली. आपापल्या आवाजात आणि आपापल्या सोयीनुसार निरनिराळ्या रूपांत.

युरोपातली स्वतःची म्हणून लिहिलेली पहिली

कोणतीही गोष्ट पुढे वाहून नेण्यासाठी 'नायक' किंवा प्रोटॅगॉनिस्ट महत्त्वाचा असतोच. पण मग ''चोरावर मोर'' अशा प्राणिकथांत नायक कोण? ठकवणाऱ्या, थोड्या नकारात्मक छटा असणाऱ्या मंडळींना 'नायक' कसं म्हणावं? प्राणिकथांच्या विश्वात वाघ, सिंह, हत्ती अशा बलाढ्यांसमवेत आढळतात काही शारीरिक दृष्ट्या दुर्बळ प्राणी. प्राणिजीवनाच्या उतरंडीवर फार काही उच्च स्थानी नआढळणारे. मात्र त्यातल्या काहींनी प्राणिकथांच्या इतिहासात या बलाढ्य नायकांच्या बरोबरीनेच एक खास स्थान मिळवलेलं दिसतं. ते अक्कल हुषारीवर! प्राणी कथांतील हा एक लोकप्रिय 'मोटिफ' - कल्पनाबंध म्हणजे प्राणिजगतातील 'ठकसेन : ट्रिक्सटर!'

प्राणिकथा आढळते ती अकराव्या शतकात, 'एकबॅसिस कॅप्टिव्ही' : अनामिक कर्त्यानं लॅटिनमधे लिहिलेली. मध्ययुगीन युरोपातील ही पहिलीवहिली मानवीकरण केली गेलेली anthropomorphic नीतिकथा. तिचं उगमस्थान फ्रान्सच्या व्हास्जेस प्रदेशानजीक मानलं जाणारं. हेक्झामीटरमधे लिहिल्या गेलेल्या कवितेच्या रूपातील या कथेत सापडतात ते करटक आणि दमनकाचे नातेवाईक कोल्होबा! गोष्ट अशी की वनराज सिंह पडतात आजारी. त्यांना पाहायला येणारे सर्व प्राणी काही ना काही इलाज सुचवतात. फक्त कोल्होबा समाचाराला काही येत नाहीत. साहजिकच उपाय सुचवत नाहीत. तेव्हा संधिसाधू लांडगा कोल्होबाला फासावर लटकवायला सुचवतो! कोल्होबा येतात. आपण तीर्थयात्रेला गेल्याचा खुलासा करतात. आणि मग उपाय सुचवतात : लांडग्याचं ताजं सोललेलं कातडं गुंडाळलं की सिंह महाराज बरे होतील! लांडग्याच्या जिवावर जेव्हा बेततं त्या वेळी कोल्हा त्याचा मृत्युसंदेश लिहितो. इथून सुरू झालेलं, एकमेकांवर कुरघोडी करणाऱ्या कोल्हा व लांडग्याचं वैर पुढे कित्येक शतकं प्राणिकथांना कथाविषय म्हणून पुरलेलं दिसतं!

काळाच्या ओघात 'फेबल्स'चं, नीतिकथेचं रूप बदलत गेलं. केवळ नीतिमत्तेवर भर न देता, बोध करणं हेच उद्दिष्ट न ठेवता मनोरंजनासाठी रचलेल्या beast tales या छोटेखानी गोष्टी आणि beast epics या चांगल्या लांब-रुंद कथा-काव्याच्या फॉर्म्सचा उदय झाला. या दोन्हींमधे आढळतात एकमेकांवर चातुर्यानं मात करणाऱ्या प्राण्यांच्या अतिशय रोचक कथा!

**या कथांत सार्वत्रिकरीत्या सापडतो तो चतुर कोल्हा**

सन ११४८-४९ मधे रचल्या गेलेल्या येसेनग्रिमस या लॅटिन प्राणिकथा मालिकेत सुरुवातीला आयसेनग्रिन लांडग्याची सरशी होते तिथपर्यंतच. बाकी सगळीकडं रेनार्ट कोल्हा सतत लांडग्याला फसवत आणि चिडवत, सतावत राहतो. त्यातली एक गमतीची गोष्ट. रेनार्ट लांडग्याला बर्फात मासे पकडायला- 'आइस फिशिंग'ला घेऊन जातो. लांडग्याला आपली शेपटी माशांना भुलवायला गळ म्हणून वापरायची गळ घालतो. पुरेसा वेळ झाला की कोल्हा म्हणतो, ''हं, ऊठ आता!'' लांडगोबा उठायला पाहतो. पण उठू थोडाच शकतोय! लांडगोबाची शेपटी पूर्ण थिजून बर्फात अडकून गेलेली! लांडगोबा संतापानं, उद्वेगानं ओरडतो, ''खोटारड्या, तू काय बोलतोस हे तुलातरी कळतंय का? माझ्या बुडाशी अख्खा स्कॉटलंड लटकलाय!''... या अशा फसवाफसवीच्या गमतीदार कथांतून कधी लांडगा आणि कोल्हा ही रूपकं म्हणूनही वापरली गेली. लांडगा हा इतरांची पापापासून मुक्तता करण्याचा आव आणणारा ढोंगी धर्मगुरू आणि दुसरीकडं अक्कलहुशारीच्या बळावर सरशी मिळवणारा कोल्हा हा फारशी सत्ता हाती नसलेल्या दीनदुबळ्या सर्वसामान्य माणसाचं प्रतीक या रूपांत सामोरे येतात!

युरोपातल्या प्राणिकथांत हा कोल्हा जर्मनीपासून अनेक ठिकाणी गोष्टींतून फिरताना आढळतो. नावातल्या थोड्याफार फरकानं.

व्यापाऱ्याच्या मुख्य तिठ्यावर नसलेल्या आणि वसाहतवादाच्या स्पर्धेच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या रशियापर्यंत या प्राणिकथा पोचल्या त्या अनेक प्रवाहांच्या संगमातून. बायझेंटाइन, ग्रीको-स्लावोनिक सत्ता, बौद्ध धर्माचा प्रभाव असलेल्या काही भागातील मंगोल राजवटीनंतर आणि पुढच्या काळात झारनं पाश्चिमात्य संस्कृतीसाठी उघडलेल्या दारांतून. जरी या कथा परकीय परिवेष घेऊन रशियात प्रकटल्या तरी त्या कालांतरानं रशियन मातीचं रंगरूप घेत रुजल्या. आपले रेनार्ट कोल्होबा रशियाला चिकटलेल्या फिनलंड-स्कँडिनेव्हियन सीमेवरून तुरुतुरु पळत रशियन 'बीस्ट एपिक'मधे पोचले, पण रशियात पोचेपर्यंत त्यांनी अवतार बदलून 'कोल्हीणबाईचं' रूप घेतलं!

मनोरंजन हे मुख्य मूल्य जपलेल्या या कोल्हीणबाईच्या गोष्टी रशियन प्राणिकथांत आणि एपिकमधे मोठ्या प्रमाणावर आढळतात. पण स्थळ आणि काळ बदलला, तरी कोल्हा आणि लांडग्याचं नातं मात्र बदललेलं दिसत नाही. कोल्हा इथंही लांडग्याला ठकवतोच. कधी इतर प्राण्यांशी संगनमत साधून त्याला त्रास देतो. त्याला फसवून लांडग्याच्या पाठीवरून सैर करतो. चोरून मध खाल्ल्यावर 'बुडघागरी'सारखी फसगत होऊ नये म्हणून चांगलीच युक्ती लढवतो आणि लांडग्यालाच तोंडघशी पाडतो. आपल्याकडं कोंबडीच्या पिलाच्या पाठीवर पान पडल्यानंतर 'आभाळ पडलं' म्हणून घाबरून धावणाऱ्या प्राण्यांना घरात आश्रय देऊन गट्टम करणाऱ्या कोल्ह्याच्या धूर्तपणाच्या अनेक छटा कमी-अधिक प्रमाणात या कोल्हेकथांतून दिसतात. तो गरजेप्रमाणे कमी-जास्त दुष्ट,

चलाख, चाणाक्ष जरूर असतो!

कोणतीही गोष्ट पुढं वाहून नेण्यासाठी 'नायक' किंवा प्रोटॅगॉनिस्ट महत्त्वाचा असतोच. पण मग या अशा 'चोरावर मोर' प्राणिकथांत नायक कोण? ठकवणाऱ्या, थोड्या नकारात्मक छटा असणाऱ्या कोल्होबांना 'नायक' तरी कसं म्हणावं? प्राणिकथांच्या विश्वात वाघ, सिंह, हत्ती अशा बलाढ्यांसमवेत आढळतात काही शारीरिकदृष्ट्या दुर्बळ प्राणी. प्राणिविश्वाच्या उतरंडीवर फार उच्च स्थानी नसणारे. पण प्राणिकथांच्या इतिहासात त्यांनी या बलाढ्य नायकांच्या बरोबरीनंच, त्यांनी एक खास स्थान मिळवलेलं दिसतं.

प्राणिकथांतला हा लोकप्रिय 'मोटिफ'- कल्पनाबंध म्हणजे प्राणिजगतातील 'ठकसेन : ट्रिक्सटर!'

'ट्रिक्सटर!' ही प्राणिकथांतील खास जमात! आपल्या भाईबंदांना ठकवणं आणि त्यापासून आनंद घेणं हाच त्यांचा उद्योग! हा ठकसेन चतुर असतो आणि शारीरिक दुबळेपणाची कसर 'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ' या न्यायानं तो बुद्धीच्या, अक्कलहुशारीच्या बळावर भरून काढतो. मौखिक कथा-परंपरेतून विकसित झालेली ट्रिक्सटर ही फार गमतीची, गुंतागुंतीची व्यक्तिरेखा. हा बहुतांश वेळा मानवीकरण झालेला anthropomorphic प्राणी. तो राहतो प्राणिविश्वात. पण समोर आलेल्या परिस्थितीत तो प्राण्यांपेक्षाही माणसासारखा वागतो. त्याला बऱ्याचदा अतिमानवी, मर्यादित जादूई शक्तीही असतात. एखाद्यावर कुरघोडी करण्यासाठी साम-दाम-दंड-भेद अशा कशाचाही वापर करायला हा ठकसेन कचरत नाही. हा सर्वज्ञानी(!) महाउपद्व्यापी प्रकार कित्येकदा निर्व्याजपणातून मूर्खपणा करतानाही दिसतो. नको तिथं नाक खुपसण्याच्या सवयीतून, फाजील आत्मविश्वासातून अडचणीतही येतो. अगदी गंमत म्हणून प्राण्यांना त्रास देतो. जुनं वैर लक्षात ठेवून कधीकधी दुष्ट विध्वंसक रूपही धारण करतो. स्वतःचं महत्त्व येनकेन प्रकारेन वाढवणं त्याला आवडतं.

प्राणिकथांच्या लोकप्रियतेत आणि दूरवरच्या प्रसारात या 'ठकसेनां'चा वाटा फार मोठा. कारण त्यांना असलेलं खरंखुरं मानवी परिमाण.

रशियाच्या रेनॉर्ट कोल्ह्याशी अर्थाअर्थी तसा संबंध नसलेला पण त्याच्याच पंथाचा एक 'नमुना' म्हणजे 'अनान्सी'. हा मूळ पश्चिम आफ्रिकेचा राहणारा. घाना-लायबेरिया-नायजेरिया असं त्याचं वास्तव्य.

आपल्या प्राणिमित्रांना, आजूबाजूच्या माणसांना आणि पऱ्या-बिऱ्या अशा जादूई शक्तींना फसवणं हा त्याचा आवडता उद्योग. हा एक लबाड, चलाख, स्वार्थी आणि लोभी कोळी! सहा पायांचा, अंगात फारशी ताकद नसलेला लेचापेचाच म्हणावा असा प्राणी. पण आपल्या चलाखीनं असं काही जाळं या भवतालच्या मंडळींभवती विणण्यात वाकबकार, की ही मंडळी त्यात कधी, कशी अडकतात ते त्यांचं त्यांनाही कळू नये! हा यजमानाच्या डोळ्यांत धूळ फेकून, आमंत्रण नसलेल्या मेजवानीवर यथेच्छ ताव मारून येतो... ''तुझी लांबी मोजतो बरं का!'' असं सांगून भल्या मोठ्या अजगराची शेपटी झाडाला बांधून ठेवून त्याची खोड मोडतो. अजगरासारखाच तो चावऱ्या मधमाश्या आणि चपळ बिबट्यालासुद्धा अक्कलहुशारीने ठकवतो. हा प्राणी खरा कसा दिसतो ते कुणालाच माहीत नाही! त्याचं रूप दर गोष्टीनुसार बदलतं. कधी सहा पायांच्या कोळ्याच्या 'ओरिजिनल' रूपात तो दिसतो. तर कधी एक टक्कल पडलेलं बिलंदर व्यक्तिमत्त्व म्हणून तो सामोरा येतो. त्याचा शारीरिक दुबळेपणा सार्वत्रिक. पण त्याच्या दिसण्याच्या पंचायती करतो कोण! दिसण्यापेक्षा त्याचे उपद्व्याप निस्तरता निस्तरता शतकानुशतकं लोकांच्या नाकी नऊ आलेलं!

तर अनान्सी शेती करतो. फसवून मेजवान्या आणि सण-समारंभांना हजेरी लावतो. नाच करतो. शेती अवजारांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो. किनाऱ्यावरच्या मच्छीमारांकडून मासे मिळवतो. वसाहतवादपूर्व काळातलं पश्चिम आफ्रिकेचं जनजीवन अनान्सीच्या कहाण्यांतून प्रतिबिंबित होतं. पश्चिम आफ्रिकेच्या गुलामांच्या व्यापाराबरोबर तो कॅरिबियन बेटं आणि अमेरिकेत पोचला. हा हिकमती प्रकार तिथंही रुळला. हैतीमधे 'टी मलाइस' नावानं ओळखला जाऊ लागला आणि रेनॉर्ट कोल्हा जसा रशियात पोचताना कोल्हीणबाई बनला, तसा अनान्सी अमेरिकेच्या दक्षिण भागात 'आन्ट नॅन्सी' नावानं प्रसिद्धीला आला.

अनान्सी दुसऱ्या खंडातून समुद्र पार करून अमेरिकेत पोचलेला. पण त्याचा दुसरा भाईबंद थेट अमेरिकन मातीतच रुजलेला. त्याचं नाव कोयोटी. मूळ अमेरिकन इंडियन जमातीतल्या लोककथांमध्ये हा सुखेनैव वावरणारा. कोल्हा-लांडगा-कुत्रा अशा प्राण्यांचं मिश्रण असलेला हा



अमेरिकेचा खास स्वतःचा ठकसेन! वायव्य पॅसिफिक ते मेक्सिको अशा पट्ट्यातल्या प्राचीन कहाण्यांत त्याचं वसतिस्थान. अनान्सी जसा सगळीकडं 'हिरो' म्हणून वावरतो तसा स्वतःला नको इतका शहाणा समजणारा कोयोटी मात्र कितीही बिलंदर असला, तरी बऱ्याचदा 'मूर्ख' म्हणून सामोरा येतो. कोयोटी हुशार आहे. चतुर आहे. उत्सुक आहे. उत्साही आहे. पण मूर्खही आहे. त्याला प्रत्येक गोष्ट समजून घेण्यासाठी नाक खुपसण्याची सवय आहे. या खोडीपायी तो काही वेळा स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतो. त्याचा धूर्तपणा सफल होतो तेव्हा तो मस्त मौला असतो. पण आपल्या 'योजने'त अयशस्वी होतो तेव्हा मुळीच खंत न करता तो पुन्हा नव्या दमानं आपल्या फसवण्याच्या नव्या योजना आखायच्या मार्गी लागतो. अशा या अर्ध्या 'हिरो' आणि अर्ध्या 'झिरो' ठकसेनाच्या चपळाईची एक गोष्ट सर्वत्र परिचित आहे. आणि त्यासाठी समस्त प्राणिजात त्याच्या ऋणात आहे!

...तर त्या वेळी जगात माणूस आणि प्राण्यांकडे अग्नी नव्हता म्हणतात. कोयोटीची चपळाई लक्षात घेऊन तीन दुष्ट शक्तींकडून त्यांना चकवून अग्नी आणण्यासाठी त्याला पाठवलं गेलं. कोयोटीनं या शक्तींकडचं जळतं लाकूड पळवून आणण्याचं काम शिताफीनं तर पार पाडलं, पण त्याची शेपटी मात्र पाठलाग करणाऱ्या तिघा दुष्ट शक्तींच्या हातात येताच अटीतटीच्या वेळी त्यानं विलक्षण चपळाईनं प्रसंगावधान राखून ते जळतं लाकूड सिंहाकडं फेकलं. सिंहाकडून ते 'रिले' होत होत झाडावर पडलं. झाड धडाडून पेटलं. दुष्ट शक्तींना झाडापासून आग काढून घेणं अशक्य बनलं! पुढे कोयोटीनं लाकडावर लाकूड घासून आग पेटवण्याचं चोरून आणलेलं तंत्रही प्राणिजगताला शिकवलं!

कोयोटीच्या प्रसंगावधानानं प्राणिमात्रांकडं अग्नी पोचला, ही गोष्ट शतकानुशतकं अमेरिकन स्थानिक जमातींत जिव्हाळ्यानं सांगितली जाते. विस्तवाच्या शोधापासून, सभ्यतेच्या उगमाच्या काळापासून, ॲझटेक मिथक कथांपासून थेट औद्योगिक क्रांतिपूर्व संस्कृतीपर्यंतच्या कथांत कोयोटीचा वावर आढळतो आणि बऱ्याचदा विविध कालखंडांत हा 'अतिशहाणा बैल रिकामा' कोयोटी नवनव्या क्लृप्त्यांच्या शोधात भटकताना दिसतो.

अन्न शिजवण्यासाठी, उबेपासून रक्षण करण्यासाठी, उजेडासाठी आग आणून देण्याचं उत्क्रांतीच्या महत्त्वाच्या टप्प्यावरच्या कामाचं श्रेय ठकसेन कोयोटीला एकट्याला सहजासहजी मिळत नाही. तर काही प्राणिकथांत एक निराळाच ठकसेन ते श्रेय लाटताना दिसतो! आणि तोही अगदी परका! आफ्रिकेच्या सहारा परिसरामधला 'झोमो', 'सुंगरू', 'सुलवे' अशा नावांनी ओळखला जाणारा एक चतुर ससोबा!

अतिशय चलाख, चतुर, शहाणा, चपळ ससोबा! चांगलाच धिटुकला. आणि म्हणून व्रात्य, खोडकर. विनोद त्याच्या अंगात पुरेपूर भरलेला!

'मी आहे, मी आहे ससुल्या गडी
डुल डुल डुल डुल डुलक्या काढी
वाघोबाचे डोळेच फोडी!'

अशा बढाईतून वाघाला ठकवणाऱ्या आपल्याकडच्या ससोबात आणि याच्यात आश्चर्यकारक साधर्म्य!

एकदा हा आफ्रिकेतला ससा आणि बिबट्या चुकून एकाच ठिकाणी घर बांधतात, आणि 'आलिया भोगासी' न्यायानं एकत्र राहण्याचा प्रयत्न करतात. पण ते काही जमत नाही. मग मोठ्या ताकदवान बिबट्याला हुसकावून लावण्यासाठी ससा कारस्थान रचतो आणि बंद दाराआड

बायकोशी ‘बिबट्याचं मांस कसं आपल्या भाईबंदांना प्रिय आहे,’ याचं मोठ्यांदा वर्णन करत, भेदरलेल्या बिबट्याला पळवून लावण्यात चलाखीनं यशस्वी होतो!

हा ससोबाही गुलामांच्या जहाजावरून प्रवास करत अमेरिकेत पोचला. तिथल्या ‘चेरूकी’ जमातीतल्या आणखी ठकसेन कथांशी संकर होऊन पुढं ‘ब्रेर रॅबिट’ नावानं जगात सर्वत्र लोकप्रिय ठरला. ‘ब्रेर रॅबिट’ हा अमेरिकेतल्या ‘अंकल रेमुस’चा मानस पुत्र आणि अंकल रेमुस हा जोएल शँडलर हॅरिस या पत्रकार लेखकाचा मानस पुत्र. अंकल रेमुस हा मळ्यातला कृष्णवर्णीय गुलाम. आता तो मुक्त झालेला.

गोऱ्या मळेवाल्याच्या नातवाला तो गोष्टी सांगतो, त्या ब्रेर रॅबिटच्या. ‘ब्रेर रॅबिट’ हा ‘ब्रदर रॅबिट’चा बोलीभाषेतला अपभ्रंश. खरं तर, या स्थलांतरितांच्या जिभेवर रुळलेलाच उच्चार. आपल्यापेक्षा ताकदवान प्राण्यांना ब्रेर रॅबिट आपल्या बुद्धिचातुर्यानं फसवतो. चलाखीनं अडचणींतून सुटका करून घेतो. तो दुष्ट नाही. खोडकर आहे. बंडखोर नाही. उलट आपल्या वाट्याला आलेल्या परिस्थितीला सामोरं जाताना, अपरिहार्यतेवर चातुर्यानं मात करणारा आहे. ‘ब्रेर रॅबिट’ आणि ‘ब्रेर फॉक्स’ यांची ‘टार बेबी’ची गोष्ट याचं उदाहरण म्हणून सांगितली जाते. ब्रेर रॅबिटला अडकवण्यासाठी कोल्हा एक डांबरी चिकट बाहुली तयार करतो. पण तिला ससा चिकटूनही बसतो. पण युक्तीनं कोल्ह्याच्या तोंडातून निसटतो, अशी ही कथा. हा ‘चिकटण्याचा’ कल्पनाबंध भारतीय जातकांतही आढळून येतो. आणि महाराष्ट्रात रोज गूळ खाणाऱ्या कोल्ह्याला शेतकरी, फणसाच्या चिकाचं बाहुलं करून अडकवतो अशा गोष्टीचा उल्लेख लोकसाहित्याच्या अभ्यासक दुर्गा भागवत करताना आढळतात.

‘ब्रेर रॅबिट’ हा केवळ प्राणी नाही. तो मानवी सामाजिक सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. तो केवळ ट्रिक्सटर किंवा ठकसेन या कल्पनाबंधाच्या पलीकडे जाऊन पोचतो. दूरदेशी, हलाखीचं जिणं जगणाऱ्या कृष्णवर्णीय गुलामांच्या मन:स्थितीचा तो थेट उद्‌गार आहे. कोल्हा आणि सशाच्या या कथेसारख्या गोष्टी तत्कालीन कृष्णवर्णीय गुलामांच्या समाजजीवनाचं प्रतिबिंब सहज शोधता यावं इतक्या जिवंत. अन्यायाच्या, असाहाय्यतेच्या जिण्याला सकारात्मकतेनं सामोरं जाऊन विनोदाच्या अंगानं सुसह्य बनवणाऱ्या या अंकल रेमुसच्या ‘ब्रेर रॅबिट’ कथांना म्हणूनच फार मोठं सामाजिक मूल्य आहे. स्वातंत्र्य-युद्धोत्तर काळात कृष्णवर्णीय जीवनाचं चित्रण करणाऱ्या आणि स्थलांतरितांच्या बोलीभाषेची प्रतिष्ठा जपणाऱ्या कथा म्हणून शँडलरच्या या कथांचा उल्लेख गौरवानं केला जातो.

रेनॉर्ट कोल्हा, अनान्सी कोळी, कोयोटी कोल्हा-लांडगा आणि ब्रेर रॅबिट ससेभाऊ यांच्यासारखे असे अनेकानेक ठकसेन आपल्याला प्राणिकथांच्या प्रांगणात आढळतात. ॲमेझॉन खोऱ्यातलं जाबुटी कासव, चीनचं सुन वुकाँग माकड, इंडोनेशिया-मलेशियातलं कांचील हरण ही सारी निरनिराळ्या कथनसंस्कृतींत रुजलेल्या ठकसेनांची उदाहरणं. ठकसेन हा प्रत्येक समाजाचा अविभाज्य घटक. ठकसेनांचं प्रत्येक समाज-संस्कृतीत आपलं-आपलं एक खास स्थान. आपलं-आपलं एक खास कार्य. मुळातच असलेली हुशारी आणि नावीन्यांची धडपड, यांच्या बळावर कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढण्याची तयारी ही यांची वैशिष्ट्यं. हा व्यामिश्र कल्पनाबंध नायकांच्या गुणाबरोबर माणसातल्या खलनायकी वैशिष्ट्यांचंही दर्शन घडवणारा. हा कल्पनाबंध प्राणिकथांना मानवी जगण्याच्या फार जवळ आणणारा. मानवी मनाची स्वार्थी, कोती, गडद बाजू या व्यक्तिरेखांतून सामोरी येणारी. चोरावर मोर होण्याच्या मानवी वृत्तीचं चित्रण यातून घडतं. जगण्याच्या संघर्षाचं तरण्याच्या- किंबहुना न बुडण्याच्या आटोकाट प्रयत्नांचं दर्शन यातून प्रत्ययाला येतं. यात दरवेळी हा ठकसेन जिंकत नाही. ‘म्हातारे म्हातारे बोरं पिकली’ म्हणून तिला त्रास देणारा कोल्होबा म्हातारीच्या अनुभवजन्य शहाणपणातून स्वतःचं बूड भाजून घेतोच! प्रत्येकच ठकसेनाला महाठक भेटतोच. प्रसंगावधानाचा, चतुराईचा, अनाठायी उत्साहाला आवर घालण्याचा, कसं वागू नये, याचा आणि समाजातल्या धूर्त प्रवृत्तींचा सामना कसा करावा याचा संदेश अतिशय सोपेपणानं देणाऱ्या या कथा... देशोदेशी पांगलेल्या. पण मूळ गाभ्यात एकमेकींशी बांधलेल्या. गुंतागुंतीच्या जगण्यात टिकून तरून राहण्याचा वस्तुपाठ देणाऱ्या या सहजसुंदर ठकसेन कथा मौखिक साहित्य, लोकसाहित्य आणि नंतर बालसाहित्याच्या प्रांगणात न रुळत्या तर नवलच!

**स्वाती राजे**, पुणे
Mob. 98224 01876
swatijraje@gmail.com

## मुलांसाठी
## ‘पथेर पांचाली’

**विभूतीभूषण बंद्योपाध्याय**

# पाऊस

आणखी काही दिवसांनंतरची गोष्ट.

त्या दिवशी ‘पवित्र तळ्या’चा सण होता. या दिवशी बहिणी आपल्या भावांच्या सुखी जीवनासाठी परमेश्वराची आळवणी करतात. दुर्गा सकाळीच स्नान करून मागच्या अंगणात गेली होती. तेथे तिने एक चौकोन तयार करून त्यांत काही हरभरे, वाटाणे पेरले होते. आता तेथे लहान लहान रोपे उगवली होती. दुर्गाने त्यांच्याभोवती रांगोळी काढली होती आणि ती काहीतरी पुटपुटत होती. अपू म्हणाला,

‘‘हे काय करते आहेस दीदी?’’

‘‘चूप. बोलू नकोस. मला पूजा करू दे. मग आपण एका ठिकाणी जाऊ.’’

‘‘कोठे?’’

‘‘त्याच्याशी तुला काय करायचे आहे?’’

दुर्गा पुन्हा आपल्या पूजेकडे वळली. ती काहीतरी म्हणत होती. अपूला त्यांतील शेवटचे शब्दच कळाले. ‘माझा भाऊ पाठीराखा आहे आणि मी भाग्यवान आहे...’

ऐकताना अपूला हसू आले. दुर्गा म्हणाली, ‘‘का हसतो आहेस? ही हसायची गोष्ट नाही. तू स्वत:ला फार शहाणा समजतोस की काय? थांब, मी आईलाच सांगते.’’

अपू गप्प बसला. दुर्गाने शांतपणे पूजा आटोपली व ती त्याला म्हणाली, ‘‘चल, आपण तळ्यामधील शिंगाडे शोधायला जाऊ.’’

तेथे गेल्यावर दोघांना दिसले की तळ्यात शिंगाडे बरेच असले तरी ते पाण्यात, दूरवर होते. दुर्गा म्हणाली, ‘‘अपू, एखादी लांब काठी शोध बरे. शिंगाडे हाताला येत नाहीत.’’

अपू काठी शोधू लागला, तोपर्यंत दुर्गाला एक रानफळ दिसले. ती ते तोडून खाऊ लागली तेव्हा अपू म्हणाला, ‘‘दीदी, फेक, फेक ते. ते फळ माणसे खात नसतात, फक्त पक्षी खातात.’’

दुर्गा फळाचे बी काढून टाकून म्हणाली, ‘‘कोण म्हणते खात नसतात? तू खाऊ बघ किती गोड आहे ते! मी तर नेहमीच खाते.’’

अपूने एक तुकडा तोंडात टाकला व तोंड वेडेवाकडे

सुरुवातीला असलेला वाऱ्याचा जोर मंदावला होता. पण पावसाच्या धारा वाढल्या होत्या. ओल्या मातीवर पाउस पडून सुरेख असा सुगंध आसमंतात पसरला होता. थोडा वेळ अपूला मजा वाटली. पण पावसाचा जोर अधिकच वाढला व वाराही जोराने वाहू लागला तेव्हा तो घाबरला. दुर्गाच्या जवळ जाऊन तो तिला बिलगला. दुर्गा म्हणाली, ‘‘घाबरू नकोस. ये, माझ्या पदराखाली मी तुला घेते म्हणजे पाऊस लागणार नाही. हा पाऊस काही फार वेळ पडणार नाही. मी पावसाचे गाणे म्हणते, तूही माझ्याबरोबर म्हण. म्हणजे पाऊस थांबेल.’’
‘लिंबाच्या झाडावर करवंदे आलीत...
पावसा, पावसा, निघून जा, निघून जा...’
तेवढ्यात दूर कोठेतरी वीज चमकली आणि काळ्या आभाळात काही क्षण भक्क प्रकाश झाला. अपू अधिकच घाबरून दुर्गाला चिकटला. पावसाचे थेंब त्यांना भिजवीत होते.

करीत तो म्हणाला ''किती आंबट आहे!''

''थोडे आंबट आहे, पण चांगले लागते.''

मात्र खूप प्रयत्न करूनही त्यांना शिंगाडे मिळाले नाहीत.

परत येताना अपूला एका झाडाखाली काही तरी पडलेले दिसले. त्याने जवळ जाऊन पाहिले. तो कसलातरी चमकणारा पदार्थ होता. त्याने तो उचलून साफसूफ केला व दुर्गाला दाखवीत तो म्हणाला, ''दीदी, मला हे काय सापडले बघ.''

दुर्गाने ती गोल आकाराची, अनेक कंगोरे असणारी, पारदर्शक वस्तू हातात घेऊन पाहिली. तिने कुठेतरी अशाच एका वस्तूचे चित्र पाहिले होते. ते रत्नाचे चित्र होते. नक्कीच हे रत्नच असले पाहिजे. ती इकडेतिकडे पाहत हलक्या आवाजात अपूला म्हणाली, ''जोराने ओरडू नकोस. हा बहुतेक एखादा हिरा आहे.''

अपूने हिरा हा शब्द अनेक गोष्टींत ऐकला होता. त्याला आई ज्या गोष्टी सांगत असे तिच्यात जे राजे, राण्या, राजकन्या असत त्या हिऱ्याचे दागिने घालीत हे त्याला ठाऊक होते.

दोन्हीही मुले या शोधामुळे इतकी चकित झाली की काय करावे हे त्यांना सुचेना. शेवटी त्यांनी ती वस्तू घरी नेऊन आईला दाखविण्याचे ठरविले. घरी आल्यावर दुर्गाने आपल्या पदरात बांधलेली ती वस्तू काढली व आईला दाखविली. ''आई, बघ आम्हांला काय सापडले आहे!''

''मी ते प्रथम पाहिले.'' अपू म्हणाला. या शोधाचे श्रेय त्याला एकट्यालाच घ्यायचे होते. मात्र सर्वजयालाही रत्न किंवा हिऱ्याबद्दल काहीच माहिती नव्हती. तिने ती वस्तू निरखून पाहिली. सूर्याच्या प्रकाशात ती धरली असता तिच्यातून वेगवेगळ्या रंगांची किरणे निघत होती. नक्कीच ही साधी काच नव्हती. तिला वाटले, खरेच हा एखादा हिरा असेल तर? आपली ही हलाखीची परिस्थिती, आपले दैन्य, क्षणात दूर होऊन जाईल. आपण श्रीमंत होऊन जाऊ. तिच्या मनात एक सुंदर स्वप्न जन्मले. सुखी भविष्याच्या कल्पनेत ती गुंग होऊन गेली.

थोड्या वेळाने हरिहर घरी आला. आल्याबरोबर सर्वजयाने त्याला ती वस्तू दाखविली आणि म्हणाली, ''पहा, मुलांना काय सापडले आहे ते! हा एखादा हिरा असेल तर...''

हरिहर अनेक गावे फिरलेला सुशिक्षित ब्राह्मण होता. ही वस्तू हिरा असेल असे त्याला मुळीच वाटले नाही. मात्र काही वेळानंतर त्याच्या मनातही विचार आला, कुणी सांगावे? ही एखादी मौल्यवान वस्तू असेल तर? एके काळी त्या भागात मुजुमदारांचे श्रीमंत कुटुंब राहत होते. त्यांच्या जवळचा एखादा हिरा हरवला असेल व तो जमिनीत पुरला गेला असेल. असे म्हणतात की ज्याला धन सापडते, पण त्या धनाची किंमत कळत नाही तो खरा दुर्दैवी असतो. तो गावाच्या सोनाराकडे जाऊन आला. आल्यावर तो म्हणाला, ''मी काय म्हणत होतो? हा हिरा नाही, हा लोलक आहे. काचेच्या झुंबरात असे अनेक लोलक असतात. हिरे जर असे जमिनीवर सापडले असते तर कुणाला काही काम करायची गरजच नाही! तुम्ही सगळे वेडेच आहात.''

*

अपू आता आठ वर्षांचा झाला होता. मात्र अजून त्याला आईबरोबर लपाछपी खेळायला आवडे. तो अंगणात जाऊन लपून बसे व तेथून आईला आवाज देई,

''आई, मी कुठे आहे?''

खरे तर तो कुठे लपला आहे हे आंधळ्या माणसाला–देखील सहज कळले असते. पण त्याची आई तो दिसत नसल्याचे नाटक करी. दुसरीकडेच त्याला शोधत फिरे. अधूनमधून ती अपूला आवाज देई, ''अपू, कोठे आहेस तू?''

पण त्या दिवशी तिला अपूबरोबर खेळण्यास मुळीच वेळ नव्हता. त्यामुळे त्याने हाका मारण्यास सुरुवात केल्यावर ती ओरडून म्हणाली, ''ठीक आहे. मी तुला शोधत फिरते, आणि माझा स्वयंपाक तसाच राहू देते. भूक लागल्यावर मात्र माझ्या नावाने ओरडू नकोस.''

संध्याकाळी अचानक आभाळ भरून आले. क्षितिजापाशी काळे ढग जमा झाले आणि पाहता पाहता ते सगळीकडे पसरले. सोसाट्याचा वारा सुटला. इतका मोठा की त्याच्या वेगामुळे मोठमोठी झाडेदेखील वाकू लागली. वारा साऱ्या गावभर धिंगाणा घालू लागला. वाळलेली पानेफुले आणि धूळ त्याने सारीकडे उडवली. दुर्गाच्या ध्यानात आले की, या वादळामुळे आंब्यांच्या झाडावरील कितीतरी कैऱ्या खाली पडतील. त्या वेचण्यासाठी ती बाहेर पळाली. तिच्या मागोमाग अपूदेखील धावला.

थोडे दूर गेल्यावर त्यांना आमराई लागली. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे झाडांच्या खाली कैऱ्यांचा खच पडला होता. त्या पाहून अपूला तर किती वेचू किती नाही असे झाले.

‘‘दीदी, ती पहा तिकडे केवढी मोठी कैरी पडली आहे! ती पहा, आणखी एक पडली.’’ कैऱ्या वेचत वेचत ते बरेच दूर गेले. या नादात वादळ अधिक अधिक जोराने घोंघावत आहे हे त्यांना समजलेच नाही. दुर्गाने आपल्या साडीच्या ओच्यात आठनऊ कैऱ्या गुंडाळल्या. अपूला मात्र दोनतीनच घेता आल्या. पण इतक्या मोठ्या कैऱ्या पाहूनच त्याला खूप आनंद झाला होता.

मात्र तेवढ्यात त्यांना शेजारच्या मुखर्जी मावशींची पोरे येताना दिसली. ती मुलेसुद्धा आंबे वेचण्यासाठी आली होती. त्यांना पाहून मावशीचा मुलगा शोतू म्हणाला, ‘‘ही आमची आमराई आहे. तुम्ही कोणाला विचारून आमच्या बागेत घुसलात? पाहू, किती कैऱ्या घेतल्यात तुम्ही?’’

त्याची बहीण राणू फार समजदार होती. तिला अपू आवडत असे, आणि दुर्गा तर तिची मैत्रीण होती. ती म्हणाली, ‘‘त्यांनी चार कैऱ्या घेतल्या तर काय झाले? घेऊ दे.’’

पण शोतू हट्टाने म्हणाला, ‘‘त्यांना सवलत दिली तर ते सगळे आंबे घेऊन जातील. ते काही नाही. दुर्गा, आमच्या कैऱ्या देऊन टाक.’’

एरवी दुर्गा त्याला मुळीच घाबरली नसती. पण काही दिवसांपूर्वी आईने तिला दिलेला मार तिच्या चांगल्याच आठवणीत होता. त्यामुळे माघार घेत ती म्हणाली, ‘‘अपू, आपण त्या पलीकडल्या आमराईत जाऊ. तेथे आणखी मोठे आंबे आहेत.’’

सुमारे पंधरा मिनिटे चालल्यानंतर त्यांना आंब्याची व फणसाची बरीच झाडे दिसली. आंब्याच्या झाडांना खूप कैऱ्या होत्या. पण त्यांच्या बुंध्यापाशी असंख्य काटेरी झुडुपे उगवलेली होती. त्यांच्यापर्यंत जाणे फार कठीण होते. अनेक कैऱ्या वाऱ्याने पडल्या होत्या, पण खालच्या गवतात त्यांना शोधणे अवघड होते. तरी दुर्गाने साताठ कैऱ्या शोधून आपल्या ओच्यात भरून घेतल्याच.

काही वेळाने पावसाचे थेंब पडावयास सुरुवात झाली. लवकरच त्या थेंबांचा जोर आणि आकार वाढला. दुर्गा म्हणाली, ‘‘अपू, पाऊस सुरू झाला आहे. आपण त्या झाडाखाली जाऊन उभे राहू.’’

दुर्गा आणि अपू एक मोठे झाड पाहून त्याखाली जाऊन उभे राहिले. सुरुवातीला असलेला वाऱ्याचा जोर मंदावला होता. पण पावसाच्या धारा वाढल्या होत्या. ओल्या मातीवर पाउस पडून सुरेख असा सुगंध आसमंतात पसरला होता. थोडा वेळ अपूला मजा वाटली. पण पावसाचा जोर

चित्रकार : सत्यजित राय



अधिकच वाढला व वाराही जोराने वाहू लागला तेव्हा तो घाबरला. दुर्गाच्या जवळ जाऊन तो तिला बिलगला. दुर्गा म्हणाली, ‘‘घाबरू नकोस. ये, माझ्या पदराखाली मी तुला घेते म्हणजे पाऊस लागणार नाही. हा पाऊस काही फार वेळ पडणार नाही. मी पावसाचे गाणे म्हणते, तूही माझ्याबरोबर म्हण. म्हणजे पाऊस थांबेल.’’

‘लिंबाच्या झाडावर करवंदे आलीत...
पावसा, पावसा, निघून जा, निघून जा...’

तेवढ्यात दूर कोठेतरी वीज चमकली आणि काळ्या आभाळात काही क्षण भक्क प्रकाश झाला. अपू अधिकच घाबरून दुर्गाला चिकटला. पावसाचे थेंब फांद्यामधून, पानांतून खाली येऊन त्यांना भिजवीत होते.

त्यांचे डोके तर ओले झालेच होते, कपडेही भिजून अंगाला चिकटले होते. पुन्हा एकदा वीज चमकली. या वेळी तिने आकाशात केवढातरी मोठा आवाज केला. अपू तर घाबरलाच– पण दुर्गालादेखील भीती वाटू लागली. पण तिने तसे दाखविले नाही. ती अपूला धीर देत पुटपुटली,

‘लिंबाच्या झाडावर करवंदे आलीत...
पावसा, पावसा, निघून जा निघून जा...’

पावसाचा जोर वाढला तशा विजादेखील पुन्हा पुन्हा चमकू लागल्या. अपू घाबरून म्हणाला, ‘‘दीदी, पाऊस थांबलाच नाही तर?’’

दुर्गाजवळ या प्रश्नाचे उत्तर नव्हते. तिने त्याला अधिकच जवळ घेतले. आता काय करावे हे तिला सुचेना. ती पुन्हा पुन्हा ते गाणे म्हणू लागली.

‘लिंबाच्या झाडावर करवंदे आलीत...
पावसा, पावसा, निघून जा निघून जा...’

इकडे, घराच्या दारात उभी राहून सर्वजया दोघा मुलांची काळजी करीत होती. या पावसात, वादळवाऱ्यात मुले कोठे गेली असतील? कशी असतील? त्यांना कोठे आसरा मिळाला असेल का? अनेक प्रश्न तिच्या मनात उमटत होते. पण ती काय करू शकणार होती? त्यांना कोठे शोधणार होती?

तेवढ्यात तिला मागचे फाटक उघडल्याचा आवाज आला. तिने पाहिले, दुर्गा आणि अपू त्या फाटकातून आत येत होते. दोघेही नखशिखान्त भिजले होते.

‘‘अरे देवा!’’ ती म्हणाली. ‘‘किती भिजला आहात तुम्ही! इतक्या वेळ कोठे होतात?’’

तेवढ्यात तिला दुर्गाच्या हातात एक पिकलेले नारळ दिसले. ‘‘हे कोठून आणलेस?’’

‘‘मावशीच्या झाडाखाली पडले होते. आणि आम्हांला एक मोठी फांदीसुद्धा सापडली. तुला झाडू तयार करायचा होता ना?’’

अपू म्हणाला, ‘‘आई, किती दिवसांपासून तू नारळ आणायचा असे म्हणत होतीस. आज आम्हांला सापडला आहे तर याच्या वड्या कर. खूप दिवस झाले काही गोड खाल्लेच नाही.’’

‘‘बरे. पण आधी हे ओले कपडे बदलून टाका. डोके पुसा.’’

थोड्या वेळाने सर्वजया विहिरीतून पाणी आणण्यासाठी गेली तेव्हा तिने ऐकले, तिची शेजारीण मोठमोठ्याने ओरडून दुर्गा आणि अपूला शिव्याशाप देत होती. मुलांनी तिच्या बागेतले नारळ उचलल्याचे तिने पाहिले होते. ती म्हणत होती, ‘‘काय चोरटी मुले आहेत! माझ्या डोळ्यांसमोर त्यांनी एवढा मोठा नारळ उचलला आणि ती तो घेऊन पळाली. पोरे चोर आहेत आणि त्यांना आईची फूस आहे. ती तर त्यांच्याहून मोठी चोर आहे. देवाने त्यांना याबद्दल चांगली शिक्षा करायला हवी. मी या तिन्हीसांजेच्या वेळी त्यांना शाप देते. त्यांनी जर ते नारळ खाल्ले तर ते लगेच मरून जातील.’’

सर्वजया स्तंभित होऊन ते शिव्याशाप ऐकत होती. तिच्या अंगावर काटा आला. या बाईची जीभ एखाद्या सापासारखी आहे. ती मनाशी म्हणाली. ‘‘जर तिचे बोलणे खरे झाले तर? नको. तिचे शाप माझ्या लेकरांना लागायला नकोत.’’

ती घरी परत आली व दुर्गाला म्हणाली, ‘‘ते त्या बाईचे नारळ तिला परत करून ये.’’

‘‘आत्ता?’’

‘‘हो. ताबडतोब.’’

मुले नारळ घेऊन गेल्यावर सर्वजया देवाच्या फोटोला नमस्कार करून म्हणाली, ‘‘परमेश्वरा, माझ्या मुलांना क्षमा कर. त्यांच्यावर त्या बाईचा शाप पडू देऊ नकोस. देवा, तू क्षमाशील आहेस. त्यांच्यावर दया कर.’’

अनुवाद : **विजय पाडळकर**, पुणे
vvpadalkar@gmail.com
Mob. 9867598836

विनायक हेगाणा

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'हेल्पलाईन'



मागील सहा वर्षांपासून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'शिवार संसद युवा चळवळी'च्या माध्यमातून विनायक हेगाणा हा तरुण उस्मानाबाद जिल्ह्यात काम करत आहे. तो मूळचा कोल्हापूर जिल्ह्यातील अर्जुनवाड या गावचा. त्याची शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीची धडपड आणि सामाजिक बांधिलकी त्याला उस्मानाबादला घेऊन आली. त्याने विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती समजून घेतली. सततचा दुष्काळ, नापिकी, शेतीमालाला भाव नाही, सावकारी कर्ज, कौटुंबिक अडचणी इत्यादी कारणांमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. नैराश्यामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न आत्महत्येनंतरही सुटत नाहीत. परिणामी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी त्याने 'इन झिरो बजेट झिरो फार्मर्स सुसाइड'चे मिशन हाती घेतले. चहू बाजूंनी गाळात फसलेल्या शेतकरी कुटुंबाला उमेद देणाऱ्या या तरुणाच्या कामाची ओळख करून देणारी मुलाखत.

**प्रश्न –** शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी पूर्ण वेळ काम करण्याची प्रेरणा कशी मिळाली?

– २०१४ मध्ये मी कोल्हापूरच्या कृषी महाविद्यालयात बी.एस्सी. ॲग्रिकल्चरचं शिक्षण घेत होतो. त्याच वेळी स्पर्धा परीक्षेची तयारीही करत होतो. अधिकारी व्हायचे स्वप्न उराशी बाळगून होतो. घरात शेतीची पार्श्वभूमी होती. यादरम्यान माझी प्रा.डॉ.सुनीलकुमार लवटेसरांशी भेट झाली. त्या भेटीत त्यांनी मला प्रश्न विचारला, "तू शेतकऱ्याचा मुलगा, शेतीचं शिक्षण घेतोयस, तुला शेतीक्षेत्रासाठी काही करावंसं वाटत नाही का?" तो प्रश्न एका अर्थानं 'टर्निंग पॉइंट' ठरला. तोपर्यंत मला काहीतरी करायचं होतं, पण ते का करायचं याची विचारांच्या पातळीवर स्पष्टता आली नव्हती. पण लवटेसरांच्या त्या प्रश्नामुळं मी शेतीबद्दल विचार करू लागलो. २०१४-१५ या वर्षांत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं प्रमाण वाढत होतं. दररोज शेतकरी आत्महत्यांच्या बातम्या वर्तमानपत्रांत छापून येत होत्या. मी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीचा विचार घेऊन 'अवकाळ' नावाचा लघुपट तयार केला होता.

शेतकरी आत्महत्या होऊच नयेत, यासाठी काय करता येईल असा विचार करत होतो. आम्ही उस्मानाबाद जिल्ह्यातील ज्या गावात जायचो, तिथल्या शेतकऱ्यांशी सामूहिक पद्धतीनं संवाद साधायचो. आणि शेवटी त्यांना आमच्याशी संवाद साधायचा असेल तर एक मोबाइल नंबर द्यायचो. त्यामुळं व्हायचं असं की, जे शेतकरी आम्हांला तिथं चारचौघांमधे बोलत नव्हते ते नंतर आम्हांला कॉल करून अडचणी सांगत. त्यातून लक्षात आलं, कॉल करणारे नैराश्यात आहेत आणि ते आत्महत्या करू शकतात. मग कॉलवर आम्ही त्यांच्या समस्या ऐकून घ्यायचो. त्यांचं समुपदेशन करायचो. जवळपास अडीच वर्षे शेतकरी कॉल करत होते. मनातलं सगळं बोलत होते. या संवादाचा शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी फायदा होत होता. म्हणून आम्ही या कामाला तंत्रज्ञानाची जोड द्यायचं ठरवलं.

तो सरकारदरबारी पोचला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन लघुपटाचं विदर्भ-मराठवाड्यातील अनेक गावांत 'स्क्रिनिंग' घेतलं. अनेक शेतकऱ्यांनी तो लघुपट पाहिला. त्यामुळं शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आपण कृतिशील पद्धतीनं काही तरी केलं पाहिजे, असं वाटायला लागलं. आणि त्यातूनच प्रत्यक्षपणं काम करण्याची प्रेरणा मिळाली.

**प्रश्न** – लघुपटाचा काय परिणाम जाणवत होता? शेतकऱ्यांच्या काही प्रतिक्रिया येत होत्या का?

– लघुपट पाहिल्यानंतर अनेक शेतकरी स्थानिक अधिकाऱ्यांना भेटायला येत. मोकळेपणानं बोलत. अधिकाऱ्यांना म्हणत, ''आमच्या मनात अशीच नैराश्याची भावना येत राहते.'' शेतकरी आणि अधिकाऱ्यांमधे मानसिक आरोग्याबाबत संवाद सुरू झाला होता. याच काळात मी विदर्भ-मराठवाड्यातल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना भेटायला जाऊ लागलो. दुष्काळाची परिस्थिती जवळून पाहू लागलो. शेतीक्षेत्राशी संबंधित अधिकारी, संस्थांच्या संपर्कात येऊ लागलो. त्यातून शेतकरी आत्महत्या शून्य करण्याचं 'मिशन' हाती घेतलं. 'इन झिरो बजेट झिरो फार्मर्स सुसाइड' नावाचा प्रबंध लिहिला. राज्य सरकारला आत्महत्या रोखण्यासाठी वेगळं बजेट मांडण्याची गरज नाही, अशी मांडणी मी करत होतो. उपलब्ध यंत्रणेत अधिक प्रभावीपणं काम करून आपण शेतकरी आत्महत्या रोखू शकतो हे पटवून देत होतो. पुढं 'शिवार संसद युवा चळवळ' सुरू केली. हे सगळं त्या लघुपटामुळं घडून आलं, असं मला वाटतं.

**प्रश्न** – 'शिवार संसद युवा चळवळी'शी कितीजण जोडली गेली? कामासाठी आर्थिक साह्य मिळतं का?

–शिवार हेल्पलाईनसाठी एकूण तीन समुपदेशक पूर्णवेळ काम करतात. तालुकापातळीवर समन्वयक म्हणून एक व्यक्ती काम करते. तर गावपातळीवर शेतकरी मित्र म्हणून काही लोक काम करतात. यासाठी आम्ही शेतकऱ्यांना आणि शेतकऱ्यांच्या मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंसेवक म्हणून या कामाशी जोडून घेतलं आहे. त्याचबरोबर शासनाच्या व्यवस्थेसोबत आम्ही काम करतो. त्यामुळे कमीत-कमी निधीत जास्तीत जास्त काम आम्ही करू शकतो. आम्हाला या कामासाठी व्यक्तिगत काही फंड्स मिळतात. लोकवर्गणीतून काही निधी आम्ही उभा करतोय. मानसिक आरोग्यासाठी 'एमएचआय' ही संस्था आम्हाला साह्य करते.

**प्रश्न** – प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली, त्या वेळी काय अनुभव येत होते?

– मला मार्गदर्शन करायला कुणी नव्हतं. त्यामुळं अडचणी येत होत्या, पण विचारांवर ठाम होतो. माझ्याकडं सुरुवातीला कामाचं प्रारूप नव्हतं. भारतात ३३ लाख आणि महाराष्ट्रात ५ लाख सामाजिक संस्था आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या मिळून शेतकऱ्यांसाठीच्या १५७ सरकारी योजना आहेत. वैयक्तिक पातळीवर लाखो माणसं मदत करायला तयार आहेत. एकीकडं सामाजिक व्यवस्थेचं जाळं आहे, दुसरीकडे आत्महत्या करण्याच्या मानसिकतेत शेतकरी आहे. या दोन्ही घटकांना एकमेकांपर्यंत पोचता येत नव्हतं. ही दरी दूर करून जागृती करणं महत्त्वाचं होतं. त्यात मानसिक आरोग्य हा एक घटक होता. आमच्याकडं मानसिक आरोग्याचं कुठलंही शिक्षण नव्हतं. त्यामुळं आम्ही गावोगावी जायचो तेव्हा शाळेतल्या मुलांशी शेतकरी आत्महत्येवर बोलायचो. त्यातून जागृती घडून यायची. सामाजिक बांधिलकी जपत मानसिक आरोग्याच्या बाबतीत काम करत राहणं यासाठी सहा वर्षं लागली. म्हणून आज आम्ही शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावीपणे काम करू शकतोय.

**प्रश्न** – मराठवाड्यातील उस्मानाबादसारखा जिल्हा निवडून तिथल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आपण काम करावं असं का वाटलं?

– मराठवाडा-विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यांना भेटी देत होतो. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेटत होतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकार तिथं काय काम करतंय, जिल्हाधिकाऱ्यांनी काही उपाययोजना राबवल्यात का, याबद्दल जाणून घेत होतो. उस्मानाबादला गेलो, तेव्हा तिथली परिस्थिती खूपच भयानक असल्याचं लक्षात आलं. कारण महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या उस्मानाबाद जिल्ह्यात होत होत्या. आपल्याकडं शासकीय दृष्ट्या केली जाणारी मांडणी क्षेत्रफळानुसार होत नाही. यवतमाळ क्षेत्रफळाच्या दृष्टीनं मोठा जिल्हा आहे. म्हणून तिथलं आत्महत्यांचं प्रमाण वाढतं. मात्र यवतमाळच्या तुलनेत उस्मानाबादमधे दीडपट शेतकरी आत्महत्या होत होत्या. आणि तिथं कोणत्याही प्रकारचं काम होत नव्हतं. त्यामुळं तिथं काम करण्याची खरी गरज होती. उस्मानाबादमधे माझ्या ओळखीचं कुणीही नव्हतं. मी जेव्हा तिथं जायचो तेव्हा बसस्थानकात किंवा मंदिरात

राहायचो. असं आठ-नऊ महिने चाललं. तिथं गेल्यावर तिथं तालुका-गावनिहाय याद्या तयार केल्या. तालुक्यात, गावात किती शेतकरी आत्महत्या झाल्यात याची माहिती गोळा केली. त्यातून सर्वाधिक शेतकरी आत्महत्या केलेल्या गावांपासून कामाला सुरुवात केली. मग ज्या गावात जाणार आहे, तिथल्या अधिकाऱ्यांना संपर्क करणं, त्यांना विनंती करून त्यांना सोबत घेऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला भेटायला जायचो. भेटीदरम्यान लक्षात आलं की, शेतकऱ्यांनी ज्या कारणामुळं १० वर्षांपूर्वी आत्महत्या केली, त्या शेतकरी कुटुंबाचे प्रश्न अजूनही तसेच आहेत.

**प्रश्न –** शेतकरी आत्महत्यांमागं काय कारणं आहेत, असं तुम्हांला वाटतं?

– मराठवाडा-विदर्भातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा अभ्यास केला, तेव्हा शेतकरी आत्महत्येची एकूण १७ कारणं समोर आली. त्यावर आधारित 'शेतकरी आत्महत्या : कारणे आणि शाश्वत उपाय' नावाची पुस्तिका लिहिली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे त्या पुस्तिका विद्यार्थ्यांपर्यंत पोचल्या. त्यातून शेतकरी आत्महत्येवर चर्चा होऊ लागली. खरं तर या १७ कारणांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन विभाग होतात. प्रत्यक्ष कारणांमध्ये २ कारणं आहेत. आणि अप्रत्यक्ष कारणांमध्ये १५ कारणं आहेत. प्रत्यक्ष कारणांमध्ये कर्जबाजारीपणा आणि पाणी समस्या ही दोन कारणं आहेत. अप्रत्यक्ष कारणांमधे कोणत्याही सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात असतात अशीच कारणं आहेत. उदा. मुलांचं शिक्षण, मुलीचं लग्न इत्यादी. गंभीर बाब अशी की, अप्रत्यक्ष कारणांमुळं शेतकरी आत्महत्या झाल्याच्या घटना सर्वाधिक आहेत. शेतात काहीच पिकलं नाही तर शेतकरी नैराश्यात जातो आणि या अप्रत्यक्ष कारणांमुळं ताणतणाव निर्माण होतो. त्यातून शेतकरी आत्महत्या झाल्याच्या अनेक घटना आहेत. शासकीय पातळीवर या अप्रत्यक्ष कारणांची दखल घेतली जात नाही. शेतकरी व्यसनाधीनतेमुळं आत्महत्या करतो असं अनेकांना वाटतं. पण खरं तर एकूण शेतकरी आत्महत्यांमधे व्यसनाधीन शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण ५ टक्केच आहे. म्हणजे व्यसनाधीन असल्यामुळं शेतकरी आत्महत्या करत नाही, तर आधी ही सगळी कारणं त्याला व्यसनाधीनतेकडं घेऊन जातात. त्यातून तो निराश होतो आणि मग आत्महत्यासारखं टोकाचं पाऊल उचलतो, अशी परिस्थिती आहे.

**प्रश्न –** काम करताना काय स्वरूपाच्या अडचणी येत होत्या?

– आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे अनेक प्रश्न असतात. आपल्याकडं एखादं बाळ जन्माला आल्यापासून ते एखाद्या निधन झालेल्या व्यक्तीच्या तेराव्याच्या विधीपर्यंत सरकारच्या विविध योजना आहेत. पण त्यांबद्दल आपल्याकडं अनेकांना माहीत नाही. शेतकऱ्यांचं कर्ज थकीत झालं तर ते कर्ज 'रिसेटल' करण्याची योजना सरकारनं सुरू केली होती, पण त्याची जनजागृती झाली नव्हती. आम्ही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांना सोबत घेऊन ते कुटुंब कर्जमुक्त कसे होईल यासाठी समुपदेशन केलं. आम्हांला या कुटुंबातील लोकांना एक रुपयाची मदत करून थांबायचं नव्हतं. तर या कुटुंबांना आपल्या जवळच्या एक रुपयाचे दहा रुपये कसे करता येतील यासाठी एक प्रारूप तयार करायचं होतं. कारण बाराशे रुपयांसाठी आत्महत्या करणारे शेतकरी आम्ही पाहिले होते. त्यामुळं आम्ही शेतकऱ्यांना 'रिसोर्सेस' उपलब्ध करून देण्याचं ठरवलं. तसे काही प्रारूप तयार करून दिले. परिणामी ते आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब कर्जमुक्त झालं. पण हे सर्व आम्ही आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबासाठी करत होतो. आत्महत्या होऊच नये, यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असं आम्हांला वाटू लागलं. पण त्यात एक मुख्य अडचण होती की, आत्महत्या करणारा शेतकरी ओळखायचा कसा?

**प्रश्न –** तुम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी 'हेल्पलाइन' सुरू केली. त्यामागची संकल्पना नेमकी काय आहे?

– शेतकरी आत्महत्या होऊच नयेत, यासाठी काय करता येईल असा विचार करत होतो. आम्ही उस्मानाबाद जिल्ह्यातील ज्या गावात जायचो, तिथल्या शेतकऱ्यांशी सामूहिक पद्धतीनं संवाद साधायचो. आणि शेवटी त्यांना आमच्याशी संवाद साधायचा असेल तर एक मोबाइल नंबर द्यायचो. त्यामुळं व्हायचं असं की, जे शेतकरी आम्हांला तिथं चारचौघांमधे बोलत नव्हते ते नंतर आम्हांला कॉल करून अडचणी सांगत. त्यातून लक्षात आलं, कॉल करणारे नैराश्यात आहेत आणि ते आत्महत्या करू शकतात. मग कॉलवर आम्ही त्यांच्या समस्या ऐकून घ्यायचो. त्याचं समुपदेशन करायचो. जवळपास अडीच वर्षे शेतकरी कॉल करत होते. मनातलं सगळं बोलत होते. या संवादाचा

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी फायदा होत होता. म्हणून आम्ही या कामाला तंत्रज्ञानाची जोड द्यायचं ठरवलं. त्यातून आम्ही भारतातील शेतकरी आत्महत्या रोखणारी पहिली हेल्पलाइन 'शिवार हेल्पलाइन'ची- 8955771115 सुरुवात केली. आजवर उस्मानाबाद जिल्ह्यातील १३४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या आम्ही रोखल्या आहेत. हेल्पलाइनच्या माध्यमातून दिवसाला कमीतकमी १५ आणि जास्तीतजास्त ९०० नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचे कॉल झाल्याच्या नोंदी आहेत. आम्ही नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचं बोलणं ऐकून घेऊन तो सामाजिक, मानसिक पातळीवर किती खचला आहे हे जाणून घेतो. त्यातून त्यासाठीच्या उपाययोजना करतो. त्यात गृहभेट घेण्यापासून त्याच्या समस्या सोडवणारी व्यवस्था उभी करण्यापर्यंत काम करतो. म्हणून आम्ही या प्रक्रियेला 'ॲग्रो सायको सोशल इंटर्व्हेशन' असं म्हणतो.

**प्रश्न –** मराठवाडा आणि विदर्भात शेतकरी आत्महत्यांचं प्रमाण खूपच आहे. अशा भागात काम करताना काय आव्हानं आहेत?

– शिवार हेल्पलाइनचं मॉडेल मोठ्या पातळीवर चालवण्यासाठी टेक्निकल टीम आमच्याकडं नाही. गावस्तरावर आम्हांला स्वयंसेवक तयार करणं कठीण आहे. आणि यासाठी लागणारी संसाधने आमच्याकडं नाहीत. कारण शेतकरी आत्महत्या रोखण्याचं काम इतर सामाजिक कामांसारखं दिसणारं काम नाही. त्यामुळं सामाजिक पातळीवर यात संसाधनांचा अभाव आहे. परिणामी ज्या प्रभावीपणं काम करणं अपेक्षित आहे त्या पद्धतीनं काम करण्यावर मर्यादा येतात. तरीही आम्ही उपलब्ध संसाधनांच्या जोरावर जास्तीतजास्त काम करण्याचा प्रयत्न करत आहोत. संसाधनांच्या अभावामुळं उस्मानाबाद जिल्ह्यापुरतंच आमचं काम सीमित आहे. आम्हांला संपूर्ण मराठवाडा-विदर्भातील शेतकऱ्यांसाठी काम करण्यासाठी आर्थिक स्तरावरचं मोठं आव्हान आहे.

**प्रश्न –** शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीचं तुमचं 'पिरॅमिड मॉडेल' काय आहे? त्याचं स्वरूप काय?

– केवळ शेतकऱ्यांचं समुपदेशन करून त्याची आत्महत्या रोखता येत नाही. त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळच येऊ नये, यासाठी शाश्वत उपाय शोधला पाहिजे, या उद्देशाने आम्ही 'पिरॅमिड मॉडेल' तयार केलं. भारतातील अनेक भागात आज शेतकरी ज्ञानाला दूरदृष्टीची जोड देऊन फायदेशीर ठरतील असे शेतीचे आधुनिक मॉडेल उभे करत आहेत. अशाच पद्धतीने उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी त्याच्याच मातीतलं एखादं मॉडेल उभं करता येऊ शकतं, त्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. त्यामधे शेतकरी आत्महत्या करूच नये म्हणून 'शिवार हेल्पलाइन', शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांसाठी 'उस्मानाबादी शेळी शाश्वत उद्योग प्रकल्प' आणि आत्महत्या करू शकतात अशा शेतकऱ्यांसाठी 'शेतीचं मॉडेल' या पद्धतीचं हे मॉडेल आहे. उस्मानाबादी शेळीच्या दुधापासून साबण बनवण्याचा प्रकल्प आम्ही सुरू केला. नोव्हेंबर २०१९ मधे त्याचं लाँचिंग केलं. आता आम्ही शेळीच्या दुधापासून १३५ प्रॉडक्ट्स 'आर अँड डी' केले आहेत. 'युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्रॅम'नं टॉप २५ सोशल इनोव्हेशनमधे याची दखल घेतली आहे. यातून २५० कुटुंबं आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाली आहेत. शेतकऱ्याला फायदेशीर ठरेल असं हे शेतकरी आत्महत्या रोखण्याचं पिरॅमिड मॉडेल विकसित केलं आहे. आम्ही 'शिवार इंटिग्रेटेड फार्मिंग सिस्टीम'चं एक मॉडेल विकसित केलं आहे. २०१८ मधे त्याला इंडियन ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूटने मान्यता दिलेली आहे. पण त्यासाठी आम्हांला आता १६ एकर जमीन आणि ७ कोटी निधीची आवश्यकता आहे.

**प्रश्न –** शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात कामाचा विस्तार करणं आवश्यक आहे. याकडं तुम्ही कसं बघता?

– कोविड-१९ आल्यानंतर जसे टास्क फोर्स निर्माण झाले. कृषिप्रधान भारतात अजूनही शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीची हेल्पलाइन नाही, ही प्रचंड लाजिरवाणी बाब आहे. सरकारी बाबू म्हणतात ही हेल्पलाइन आहे. पण ती हेल्पलाइन खतं-बियाण्यांच्या शिवाय इतर कोणतंही समुपदेशन करत नाही. याचा अर्थ एवढ्या मोठ्या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याला सरकार नजरेआड करतं, असाच होतो. सरकारला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करायचं असेल तर सरकारनं आत्महत्या रोखण्यासाठी एक शाश्वत मॉडेल उभं केलं पाहिजे, असं मला वाटतं.

(मुलाखत : **धनंजय सानप**)

**विनायक हेगाणा,** उस्मानाबाद
Mob. 7378799711

मागोवा

राम जगताप

# ‘परमेश्वराला रिटायर करा’ची कूळकथा आणि उत्तरकथा

## पूर्वार्ध

१.

आज रंगकर्मी, सिनेअभिनेते डॉ. श्रीराम लागू यांचा दुसरा स्मृतिदिन. मराठी नाटक, मराठी व हिंदी सिनेमा यांतील डॉक्टरांच्या योगदानाविषयी त्यांच्या हयातीत आणि निधनानंतरही बरंच लिहिलं गेलं आहे. ‘आम्हांला भेटलेले डॉ. श्रीराम लागू’ (२००२) या त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त प्रकाशित झालेल्या ग्रंथातून आणि ‘लमाण’ (२००४) या त्यांच्या आत्मचरित्रातून त्याविषयीचे तपशील आजही जाणून घेता येतात. त्याचबरोबर डॉक्टरांनी महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रातही मोलाचं कृतिशील योगदान दिलं आहे. ‘अंधश्रद्धा निर्मूलन समिती’ या डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या संस्थेमधे सुरुवातीपासूनच ते सक्रियपणे सहभागी होते. अंनिसच्या कामासाठी त्यांनी महिन्यातले दोन दिवस कित्येक वर्षं राखीव ठेवलेले असायचे.

पण त्याचबरोबर डॉक्टरांनी महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वातही उलथापालथ घडवून आणण्याचा प्रयत्न जवळपास ३० वर्षं सातत्यानं केलेला दिसतो. तो म्हणजे त्यांनी ‘परमेश्वराला रिटायर करा’ अशी थेट, स्पष्ट, प्रवाहाविरुद्ध जाणारी नि:संदिग्ध भूमिका घेतली आणि पुढं आयुष्यभर त्याचा पाठपुरावा केला. देव-धर्म या मुळात अतिशय संवेदनशील आणि स्वभावत:च स्फोटक संकल्पना आहेत. देव-धर्माविषयीच्या अंधश्रद्धेनं माणसांची मनं पिढ्यान्‌पिढ्या इतकी भारून टाकली गेली आहेत की, डॉक्टरांची खणखणीत, सणसणीत आणि दणदणीत भूमिका महाराष्ट्राच्या पचनी पडणं शक्यच नव्हतं.

डॉक्टरांची भूमिका अतिशय धाडसी होती. त्यामुळं तिचा उपसर्ग होणं क्रमप्राप्तच होतं. तो डॉक्टरांना झालाही. पण कुठल्याही धर्मांध शक्तींपुढं झुकण्याचा डॉक्टरांचा स्वभावच नव्हता. नटानं 'Athlete philosopher' असलं पाहिजे, असं सांगणाऱ्या त्यांच्या भूमिकेशी ते सुसंगतच होतं. बुद्धिप्रामाण्यवादातून एकदा विचारपूर्वक स्वीकारलेल्या भूमिकेपासून डॉक्टर कधीही विचलित झाले नाहीत. सिने-नाट्य कलावंत म्हणून त्यांना जी समाजमान्यता मिळाली होती, तिचा वापर त्यांनी आपली भूमिका समाजासमोर मांडण्यासाठी केला. त्यासाठी लोकापवादाचा विचार केला नाही. त्यांच्यासारख्या कलावंतानं देवासारख्या अतिशय

> डॉक्टरांचा ‘परमेश्वराला रिटायर करा’ हा लेख २४ नोव्हेंबर १९९१ रोजी दै. ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ‘मैफल’ या रविवार पुरवणीत ‘कव्हर स्टोरी’ म्हणून प्रकाशित झाला. आणि तेव्हापासून हे विधान एखाद्या ‘मोस्ट कोटेबल कोट’सारखं त्यांच्या नावाशी निगडित झालं. आजही अनेक वेळा त्याचा दाखला दिला जातो. पण मुळात गोष्ट अशी आहे की, हे विधान डॉक्टरांचं नव्हतंच. त्यांनी ते केलेलं नव्हतं. त्यांनी जो लेख ‘म.टा.’मधे लिहिला, त्याचं शीर्षक त्यांनी दिलेलं नव्हतं. किंबहुना त्या लेखातही या विधानाचा कुठंही उल्लेख नव्हता. (पण त्यांची तीच भूमिका होती!) मुळात तो लेखच नव्हता. तो त्यांनी एका पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा संपादित अंश होता. त्याला शीर्षक देताना ‘म.टा.’च्या ‘मैफल’ पुरवणीचे तत्कालीन संपादक अशोक जैन यांनी ते शीर्षक दिलं होतं.

संवेदनशील विषयावर समाजाशी भांडण उभं केलं होतं.

डॉक्टरांची ही भूमिका हा त्यांच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा 'टर्निंग पॉइंट' आहे. त्याची सुरुवात, त्यानंतर त्याचे त्यांच्यावर, अंनिसवर आणि महाराष्ट्रीय समाजमनावर झालेले परिणाम, याचा मागोवा घेण्यासाठी हा लेखनप्रपंच.

डॉक्टरांचा 'परमेश्वराला रिटायर करा' हा लेख २४ नोव्हेंबर १९९१ रोजी दै. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मैफल' या रविवार पुरवणीत 'कव्हर स्टोरी' म्हणून प्रकाशित झाला. आणि तेव्हापासून हे विधान एखाद्या 'मोस्ट कोटेबल कोट'सारखं त्यांच्या नावाशी निगडित झालं. आजही अनेक वेळा त्याचा दाखला दिला जातो.

पण मुळात गोष्ट अशी आहे की, हे विधान डॉक्टरांचं नव्हतंच. त्यांनी ते केलेलं नव्हतं. त्यांनी जो लेख 'म.टा.'मधे लिहिला, त्याचं शीर्षक त्यांनी दिलेलं नव्हतं. किंबहुना त्या लेखातही या विधानाचा कुठंही उल्लेख नव्हता. (पण त्यांची तीच भूमिका होती!) मुळात तो लेखच नव्हता. तो त्यांनी एका पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा संपादित अंश होता. त्याला शीर्षक देताना 'म.टा.'च्या 'मैफल' पुरवणीचे तत्कालीन संपादक अशोक जैन यांनी ते शीर्षक दिलं होतं.

त्याचा खुलासा जैनांनी नंतरच्या काळात दोन वेळा केला. २००२ मधे डॉक्टरांच्या पंचाहत्तरीनिमित्त 'आम्हांला भेटलेले डॉ. श्रीराम लागू' हे प्राध्यापक व नाट्यसमीक्षक पुष्पा भावे यांनी संपादित केलेलं पुस्तक रोहन प्रकाशनाकडून प्रकाशित झालं. त्यात जैनांचा एक लेख आहे. त्यात त्यांनी म्हटलंय की, स्वत:चा किंवा स्वत:वरचा लेख वगैरे छापा, असं सांगणाऱ्या महाभागांपैकी डॉक्टर नव्हते. पण एकदाच त्यांनी 'माझा एक लेख छापशील का?' अशी विनंती केली. त्याचा किस्सा मोठा रंजक आहे. नरेंद्र दाभोलकर प्रभृतींसमवेत अंधश्रद्धा निर्मूलनाचं काम डॉक्टर हिरीरीनं करत असतात हे सर्वश्रुत आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचं कार्य करणाऱ्यांचे अहर्णव असलेले डॉ. भोईर यांनी इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकाचा मराठी अनुवाद केला होता. त्याला प्रस्तावना लिहिण्याची प्रकाशकाची विनंती डॉक्टरांनी मान्य करून प्रस्तावना लिहून दिली होती. या प्रस्तावनेत आपली भूमिका, विचार आपण ठामपणं मांडले असून त्या प्रस्तावनेचा काही भाग लेखरूपानं 'महाराष्ट्र टाइम्स'मधे प्रसिद्ध झाला, तर जास्तीतजास्त लोकांपर्यंत तो पोचेल, असं डॉक्टरांना वाटत होतं व ते रास्तच होतं. पुस्तक परीक्षणाच्या पानावर आगामी पुस्तकातील एखादं प्रकरण, प्रस्तावना छापण्याची प्रथा आहे. मी 'पाहतो' असं म्हटलं. त्यांनी प्रस्तावनेच्या हस्तलिखिताची झेरॉक्स पाठवून दिली. त्या प्रस्तावनेतील विचारांची मांडणी सुस्पष्ट, सुबोध, तर्कसंगत होती. ती वाचून मी अत्यंत प्रभावित झालो. पण ती छापायची तर एक अडचण होती. पुस्तक प्रकाशित होण्याआधी वा त्या सुमारास प्रस्तावना वा त्यातील काही भाग प्रकाशित करण्याची रीत आहे. पुस्तक प्रकाशित झालं आहे किंवा नाही, याचा डॉक्टरांना काहीच थांगपत्ता नव्हता. तीन-चार महिन्यांपूर्वी प्रकाशक त्यांच्याकडून प्रस्तावना घेऊन गेले होते हे खरे, पण नंतर त्यांनी काही संपर्क साधला नव्हता वा प्रकाशित पुस्तकही अजून आणून दिलं नव्हतं. कामाच्या गडबडीत डॉक्टरांना त्या पुस्तकाचं वा प्रकाशकाचं नावही स्मरत नव्हतं. त्यामुळं पुस्तक प्रकाशित झालं आहे की नाही, याचा सुगावा लागणं सोपं नव्हतं, पण प्रस्तावना तर अप्रतिम होती. 'परमेश्वर या संकल्पनेला रिटायर करावं' असंच डॉक्टरांनी त्यात सुचवलं होतं. तसंच, 'त्याऐवजी विज्ञानाच्याही अति आहारी जाऊन त्याचाही परमेश्वर बनवू नका', असंही त्यांनी सुचवलं होतं. समजा-पुस्तक प्रकाशित झालं असेल तरीही प्रस्तावना छापायचीच, असा निर्णय मी घेतला. तिच्यातील आवश्यक वाटला तो भाग निवडला व त्याला ठसठशीत मथळा दिला, 'परमेश्वराला रिटायर करा'.

तो लेख प्रसिद्ध होताच एकच खळबळ उडाली. वृत्तपत्रांतून व जाहीर सभांतून त्यावर वादविवाद घडू लागले. मराठी विज्ञान परिषदेनं 'विज्ञान पत्रिका' या आपल्या नियतकालिकात हा लेख पुनर्मुद्रित केला. गंमत म्हणजे त्याखाली 'महाराष्ट्र टाइम्सवरून' असं त्यांनी नमूद केलं हों. खरं तर मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेतून असं म्हणायला हवं होतं. पण मूळ पुस्तक राहिलं बाजूलाच, 'महाराष्ट्र टाइम्स'मधे लेख प्रसिद्ध झाला व त्याचा काहीसा धक्का देणारा मथळा, यामुळे तो लाखो वाचकांपर्यंत पोचला व गाजला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रचारसभांत अनेक श्रोते डॉक्टरांना या लेखाबद्दल जाब विचारत, तेव्हा ''हा सारा आमच्या अशोक जैनचा फाजीलपणा,'' असं डॉक्टर मिस्किलपणानं उत्तर देत असत. ''खरं तर मी काहीच केलं नव्हतं. लेखाला नाव देणं (वा ठेवणं) हे संपादकाचं कर्तव्य असतं, ते मी बजावलं इतकंच.''

१८ जून २०१२ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स'ला ५० वर्षं पूर्ण

झाली. त्या निमित्तानं १७ जूनच्या 'संवाद' या रविवार पुरवणीत जैन यांनी 'मैफली'चे प्रसन्न पर्व!' या नावानं एक लेख लिहून त्यांच्या काळातील पुरवणी संपादनाच्या काही आठवणींना उजाळा दिला आहे. त्यात ते म्हणतात की,ह्णनावं ठेवण्यात मी पटाईत – म्हणजे लेखांची शीर्षकं वगैरे (उगीच गैरसमज नको). प्रख्यात अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे एक प्रणेते डॉ. कोवूर यांच्या इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवादास एक प्रस्तावना लिहिली होती. ती प्रस्तावना मराठी वाचकांपर्यंत पोचावी अशी त्यांची इच्छा होती. पण मराठी अनुवाद कोणी केला, पुस्तक प्रसिद्ध झालं की, नाही हे त्यांना काहीच ठाऊक नव्हतं. आगामी पुस्तकाचा काही भाग अथवा त्याची प्रस्तावना छापण्याची पद्धत आहे. पण त्यांना तर काहीच माहीत नव्हतं. प्रस्तावना तर फारच प्रभावी होती. 'परमेश्वराला रिटायर करा!' असं शीर्षक देऊन ती छापली गेली. खरं तर सबंध लेखात परमेश्वराला रिटायर करावं, असं एकही वाक्य नव्हतं. पण लेखाचा मध्यवर्ती आशय हाच होता. देवाची कर्मकांडे करत बसू नका, विज्ञानवादी व्हा, पण विज्ञानाचेदेखील स्तोम माजवू नका, त्याचा देव करू नका, असं त्यांनी म्हटलेलं होतं. तो लेख मी दिलेल्या शीर्षकासह अत्यंत गाजला. लागूंविरुद्ध टीकेचं मोहोळच उठलं. अजूनही या लेखाचा कुठं न कुठं उल्लेख होतोच.

जैनांच्या पहिल्या खुलाशात डॉ. भोईर हे नाव चुकून लिहिलं गेलं असावं किंवा ती मुद्रितशोधनातली चूक असावी. 'डॉक्टरांना त्या पुस्तकाचं वा प्रकाशकाचं नावही स्मरत नव्हतं' या विधानाचा अर्थ असा की, त्या पुस्तकाचं मराठी नाव त्यांना आठवत नव्हतं. कारण त्यांनी जो डॉक्टरांच्या प्रस्तावनेचा संपादित अंश 'म.टा.'मधे छापला, त्याच्या शेवटी 'डॉ.अब्राहम कोवूर यांच्या 'Gods, demons and Spirits' या पुस्तकाचा प्रा. सी. भा. दातार यांनी मराठीत अनुवाद केला असून तो लौकरच प्रसिद्ध होत आहे. त्या पुस्तकाला डॉ. श्रीराम लागू यांनी लिहिलेल्या चिकित्सक प्रस्तावनेतील हा काही भाग' अशी संपादकीय टीप आहे. अर्थात या दोन्ही चुका त्यांनी दुसऱ्या खुलाशात दुरुस्त केल्या आहेत.

डॉक्टरांनी ही प्रस्तावना 'म.टा.'कडं दिली, तेव्हा त्यांच्या हाताशी पुस्तकाची प्रत नव्हती. हा लेख प्रसिद्ध झाल्यावर तरी अनुवादक वा प्रकाशकांनी पुस्तकाच्या प्रती डॉक्टरांना दिल्या असाव्यात, असं गृहीत धरलं, तरी २००३-०६ दरम्यान पुण्यात झालेल्या एका कार्यक्रमातही डॉक्टरांनी 'हे पुस्तक प्रकाशित झालं की नाही, मला आजही माहीत नाही. लेखक वा प्रकाशकांनी त्याची प्रत मला दिली नाही', असं जाहीरपणं सांगितलं होतं. प्रत्यक्षात हा अनुवाद मनोविकास प्रकाशनाच्या अरविंद पाटकर यांनी प्रकाशित केला होता. या बाबत त्यांच्याशी मागच्या महिन्यात बोललो, तेव्हा त्यांनी सांगितलं की, तेव्हा डॉक्टर मुंबईत, वांद्रा इथं राहत असत. अनुवादक व मी आम्ही त्यांच्या घरी जाऊन त्यांना पुस्तकाच्या दोन प्रती दिल्या होत्या. म्हणजे इथं काहीतरी समजुतीचा घोटाळा झालेला दिसतो. त्यांनी खरोखरच प्रती दिल्या असतील, तर त्या डॉक्टरांच्या घरून गहाळ झाल्या असाव्यात. कारण या अनुवादावर पुस्तक प्रकाशनाची तारीख आहे १५ जून १९९०. अनेकदा पुस्तकावर ते कधीपर्यंत छापून येईल याचा साधारण अंदाज घेऊन तारीख टाकली जाते, पण ऐन वेळी काही तांत्रिक वा इतर अपरिहार्य कारणांमुळं पुस्तक छपाईला उशीर होतो. त्यामुळं पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर जवळपास दीड वर्षानं त्याची प्रस्तावना 'म.टा.'मधे छापून आली, असं गृहीत धरण्याचं काही कारण नाही. कदाचित पुस्तक वेळेत छापून आलं असावं आणि त्याच्या डॉक्टरांना दिलेल्या प्रती गहाळ झाल्या असाव्यात. पण त्यांना पुस्तकाचं वा प्रकाशकाचं नाव आठवत नसल्यानं त्यांनी प्रस्तावनेची हस्तलिखित प्रतच 'म.टा.'ला पाठवली असावी.

२.

डॉक्टर तसे लहानपणापासूनच बुद्धिप्रामाण्यवादी आणि नास्तिक होते. पुढच्या आयुष्यात त्यांच्यावर बर्ट्रांड रसेल यांच्या विचारांचा खूपच प्रभाव पडला. रसेल यांच्या 'मॅरेज अँड मॉरल्स' या पुस्तकानं आपण आतून हलून गेलो, असं त्यांनी अनेक वेळा जाहीरपणे सांगितलंही होतं. पण नाटक-सिनेमा या क्षेत्रात कार्यरत असल्यानं श्रद्धा-अंधश्रद्धा, देव-धर्म, कर्मकांड वगैरे गोष्टींबाबतची आपली मतं समाजासमोर जाहीरपणे मांडण्याची फारशी संधी त्यांना मिळत नव्हती. 'सामाजिक कृतज्ञता निधी' (१९८७) या उपक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉक्टरांनी काम सुरू केल्यानंतर आणि डॉ. नरेंद्र दाभोलकरांशी संपर्क आल्यानंतर त्यांच्या मनातील विचारांनी उसळी घेतली. त्याचं पहिलं प्रतिबिंब १९८९मधे प्रकाशित झालेल्या 'तिमिरभेद' या पुस्तकातल्या डॉक्टरांच्या मुलाखतीत दिसतं.

अंधश्रद्धांना तर्कसंगत उत्तरं देणारं हे पुस्तक डॉ. अंजली

सोमण यांनी संपादित (आणि मनोविकास प्रकाशनानं प्रकाशित) केलं आहे. त्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर व कृष्णराव लंके यांनी डॉक्टरांची 'मी बुद्धिप्रामाण्यवादी कसा झालो?' या विषयावर एक छोटीशी मुलाखत घेतली. त्यात त्यांनी रोखठोक व तर्कसंगत मतं मांडली आहेत. केवळ तेवढंच नाही तर ते दाभोलकरांना म्हणाले की, सवड मिळाली तर महाराष्ट्रभर ही मतं जाहीरपणं मांडण्याची माझी इच्छा आहे. त्यानंतर भरपूर शिव्या खाण्याची तयारी मी अर्थातच ठेवली आहे.

त्या वेळी डॉक्टर अंनिसच्या कार्यक्रमांमधे सहभागी होऊ लागले होते. त्यांच्या या सक्रियतेमुळं डॉ. अब्राहम कोवूर यांच्या मराठीत अनुवादित होत असलेल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणार का, म्हणून अनुवादक व प्रकाशक यांच्याकडून त्यांना विचारणा झाली असावी. बुद्धिवादाचे प्रखर वक्ते व प्रचारक डॉ. कोवूर यांच्या कामाबाबत डॉक्टरांना माहिती असल्यानं त्यांनी लगेच होकार दिला आणि तत्परतेनं प्रस्तावनाही लिहून दिली.

तेव्हा मनोविकास प्रकाशन ही संस्था फार नियमितपणं पुस्तक प्रकाशित करत नव्हती. त्यांची काही पुस्तकं प्रकाशित झालेली असली तरी तिचं फारसं नाव झालेलं नव्हतं. त्यामुळंच खरं तर ते डॉक्टरांच्या फार लक्षात राहिलं नसावं. पण छापील पुस्तकाबाबत नंतर त्यांना काहीच समजलं नाही आणि प्रस्तावनेचा विषय तर महत्त्वाचा होता. तो शक्य तितक्या लवकर लोकांसमोर यावा, असं डॉक्टरांना वाटल्यामुळं त्यांनी ती प्रस्तावना छापण्याबाबत 'म.टा.'च्या अशोक जैन यांच्याकडं विचारणा केली.

त्याचे परिणाम काय होणार, याची डॉक्टरांना आधीपासूनच कल्पना होती. किंबहुना त्यावर चर्चा-वादविवाद व्हावेत, असंच त्यांना वाटतं होतं. आणि त्यांच्या अपेक्षेनुसारच घडलं. त्यात ती कव्हर स्टोरी म्हणून छापताना तिला जे शीर्षक दिलं गेलं, त्यात चुकीचं काही नसलं, किंबहुना डॉक्टरांच्या म्हणण्याचाच तो सारांश असला, तरी ते केवळ शीर्षक म्हणून जरा लाउड, प्रक्षोभक झालं होतं. त्यामुळे अपेक्षेनुसार त्यावरून गदारोळ माजला. महाराष्ट्रात मोठीच खळबळ उडाली. त्यातही नाटक-सिनेमांतून मराठी माणसांना माहीत असलेल्या एका अभिनेत्यानं असं म्हणावं, हाही तसा धक्काच होता. त्यामुळं त्यावर हिरीरीनं चर्चा होऊ लागली. अनेक वाचकांनी त्या लेखावरच्या आपल्या प्रतिक्रिया 'म.टा.'ला पाठवल्या. त्या १५१ प्रतिक्रियांमधल्या निवडक प्रतिक्रिया 'म.टा.'नं ९ फेब्रुवारी १९९२ रोजी 'परमेश्वराला रिटायर करा : ईश्वरी वादंग, काही प्रतिक्रिया' या नावानं छापल्या.

डॉक्टर हे काही वादग्रस्त विधानं करणारे कलावंत नव्हते. पण तरीही त्यांनी अतिशय समतोल आणि बुद्धिवादी दृष्टिकोनातून लिहिलेल्या या लेखावरही उलटसुलट, बऱ्याचशा टोकाच्या प्रतिक्रिया वाचकांनी कळवल्या होत्या. काहींनी डॉक्टरांवर वैयक्तिक आरोप करायलाही मागंपुढं पाहिलं नाही.

लोकांच्या श्रद्धा वा भावनेविरोधात भूमिका घेतल्यानंतर त्यावर येणाऱ्या प्रतिक्रियांमधे समतोल फारच कमी असतात. इथं तर डॉक्टरांनी हा प्रकार दुसऱ्यांदा केला होता. सत्तरच्या दशकात पुणेकरांना घाबरून सोडलेल्या, खळबळजनक आणि गाजलेल्या जोशी-अभ्यंकर हत्याकांडातील पाच तरुणांना २८ सप्टेंबर १९७८ रोजी सत्र न्यायालयानं फाशीची शिक्षा सुनावली. त्यावर या तरुणांनी उच्च न्यायालयाकडं अपील केलं, तेही फेटाळलं गेलं. नंतर या तरुणांनी राष्ट्रपतींकडं दयेचा अर्ज केला. अर्थात तोही नंतर फेटाळला गेला. (अखेर या पाचही तरुणांना २५ ऑक्टोबर १९८३ रोजी फाशी दिली गेली.) पण या सगळ्यांत पाचेक वर्षांचा काळ गेला. या दिरंगाईमुळं जनमत प्रक्षुब्ध होत चाललं होतं. त्याविषयीच्या उलटसुलट चर्चा प्रसार माध्यमांमधून होत होत्या. पुणेकरांचा तर धीरच सुटत चालला होता. याच काळात डॉक्टरांनी 'या लेकरांना क्षमा करा' या आशयाचं पत्र 'म.टा.'कडं पाठवलं होतं. ते छापून आल्यावर आगीत तेल ओतल्यासारखंच झालं. खरं तर डॉक्टरांचा विरोध फक्त फाशी देण्याला होता. आणि या मुलांना आतापर्यंत तुरुंगात राहिल्यामुळं पुरेशी शिक्षा मिळाली आहे, आता त्यांना मोठ्या मनानं माफ करावं, निदान फाशी देऊ नये, असं डॉक्टरांचं म्हणणं होतं. पण प्रक्षुब्ध झालेली मनं डॉक्टरांचं पत्र वाचून अजूनच भडकली. त्यानंतर पुढच्या तीन-चार दिवसांत शंभरपेक्षा जास्त पत्रं म.टा.मधून प्रकाशित झाली. बहुतेकांनी डॉक्टरांचं म्हणणं समजून न घेताच त्यांच्यावर खरपूस टीका केली होती. अनेकांनी त्यांच्यावर वैयक्तिक आरोपही केले होते. ती सगळी पत्रं वाचून डॉक्टरांनी त्यांना सविस्तर उत्तर देत आपली भूमिका अजून स्पष्ट करून सांगायची, असं ठरवलं होतं. पण शेवटच्या दिवशी म.टा.नं 'हा वाद आम्ही यापुढे संपवलेला आहे' अशी संपादकीय टीप टाकून एकतर्फीच

संपवला. मग डॉक्टरांनीही तो विषय तिथंच सोडून दिला.

आताही काहीसा तसाच प्रकार झाला होता. मात्र अशा प्रकारच्या प्रतिक्रियांची त्यांना आधीपासूनच कल्पना होती.

३.

या लेखावर महाराष्ट्रात वादंग माजलं असलं. त्यावर वाचकांच्या भरपूर प्रतिक्रिया 'म.टा.'कडं आल्या. त्यातल्या न छापल्या गेलेल्या प्रतिक्रियांची संख्या छापलेल्यांपैकी नक्कीच मोठी असणार. पण समाजमनाच्या दृष्टीनं संवेदनशील विषयावर जेव्हा तर्कसुसंगत पद्धतीनं प्रहार केला जातो, तेव्हा जी खळबळ माजते, त्याचे काही कवडसेच प्रसार माध्यमांतून प्रतिबिंबित होतात. त्यामुळं या लेखावर महाराष्ट्रात खाजगी व जाहीर स्वरूपात मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली. हळूहळू ती थंडावत गेली. दरम्यानच्या काळात डॉक्टरांचा अंनिसच्या कार्यक्रमांतला सक्रिय सहभाग बराच सातत्यपूर्ण झालेला होता. साधारणपणे १९९३ मधील गोष्ट. सोलापुरातल्या एका संस्थेनं देव आणि धर्म या विषयांवर एक परिसंवाद ठेवला होता. त्यात डॉक्टर व दाभोलकर यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा खूप प्रतिसाद मिळाला. पण परिसंवादात एकूण चार वक्ते होते. प्रत्येकाला पंधरा मिनिटं दिलेली होती. हा वेळ तसा अपुरा होता. त्यामुळं लोकांना आवडलेली ही चर्चा केवळ वेळेअभावी नीट होऊ शकली नाही, हे डॉक्टर व दाभोलकर यांना जाणवलं. म्हणून मग दाभोलकरांनी डॉक्टरांना विनंती केली की, या विषयावर जाहीर वादसंवादाचा कार्यक्रम आपण दोघं मिळून करू या. त्यासाठी तुम्ही मला दोन महिन्यांतून एक दिवस द्या. डॉक्टरांनी ते लगेच मान्य करून एका महिन्यातलेच दोन रविवार देण्याचे मान्य केलं. तोवर सिनेमातील कामं डॉक्टरांनी बरीचशी कमी करत आणली होती. त्यामुळं आपली बुद्धिप्रामाण्यवादाविषयीची भूमिका समाजासमोर जाहीरपणे मांडण्याची ही संधी त्यांना हवीच होती.

मग दाभोलकरांनी कार्यक्रमाची आखणी केली. त्याला नाव दिलं- 'विवेक जागराचा वाद-संवाद'.

१९९३ ते १९९७ या पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या ठिकाणी (खासकरून जिल्हे व तालुके) या कार्यक्रमाचे शंभरावर प्रयोग डॉक्टर व दाभोलकरांनी केले. ज्या ठिकाणी हा कार्यक्रम ठरत असे, तेथील अंनिसचे कार्यकर्ते याची पुढीलप्रमाणे जाहिरात करत.

**विवेक जागराचा एक वाद-संवाद**

सहभाग :

सिनेनाट्य क्षेत्रातील नामवंत बुद्धिवादी कलावंत

- डॉ. श्रीराम लागू

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रवक्ते

- डॉ. नरेंद्र दाभोलकर

परमेश्वराचे अस्तित्व हीच आद्य अंधश्रद्धा

परमेश्वराला रिटायर करा

परमेश्वराधिष्ठित धर्माची गरजच काय? हवा आहे मानवधर्म

प्रत्येक श्रद्धा ही अंधश्रद्धाच असते

- डॉ. श्रीराम लागू

श्रद्धा व अंधश्रद्धा यांत फरक आहे

देवधर्माच्या बाबतीत आम्ही तटस्थ आहोत

खरा प्रश्न आहे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कृतीचा

- डॉ. नरेंद्र दाभोलकर

देवाचे अस्तित्व, धर्माचे प्रयोजन, श्रद्धा-अंधश्रद्धा, धर्मांधता, धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा निर्मूलन या बहुचर्चित विषयावरील जुगलबंदी

आपले प्रश्न पुढील पत्त्यावर पाठवावेत

---

सर्वांना हार्दिक निमंत्रण.

हा कार्यक्रम ज्या ठिकाणी होत असे, तेथील स्थानिक वर्तमानपत्रांना दाभोलकर कधीकधी डॉक्टरांचा प्रस्तावना-लेख पुनर्मुद्रित करण्यासाठी देत. काही वेळा तो छापलाही जात असे. तेव्हा त्यावरही चर्चा होत असे आणि कार्यक्रमाला प्रसिद्धीही.

या कार्यक्रमात डॉक्टर 'देव हीच मूळ अंधश्रद्धा आहे आणि ती नष्ट केली तर बाकीच्या सर्व अंधश्रद्धा आपोआप नष्ट होतील,' अशी मांडणी करायचे; तर डॉ. नरेंद्र दाभोळकर 'अंनिस'ची देव आणि धर्म या बाबतची तटस्थ भूमिका मांडायचे. त्याचा सारांश असा असे की, अंनिसचा देव-धर्माला विरोध नाही. देव आणि धर्म मानणं वा न मानणं हा प्रत्येक व्यक्तीचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र आपल्या देवा-धर्माच्या संकल्पनेची आपण तटस्थपणे चिकित्सा केली पाहिजे आणि देवा-धर्माच्या नावावर होणाऱ्या शोषणाच्या विरोधात उभं राहिलं पाहिजे.

या कार्यक्रमात डॉक्टर अंनिसवरही टीका करायचे. म्हणायचे, ''तुम्ही फक्त वरवरची मलमपट्टी करत आहात, झाडाच्या फांद्या तोडून उपयोग नाही. त्याच्या मुळावरच घाव घातला पाहिजे.'' डॉक्टर ही भूमिका अंनिसच्या व्यासपीठावरूनच मांडायचे. त्यामुळं पुरोगामी विचारांच्या लोकांचं बळ मिळू लागलं आणि ते अंनिसच्या कामाकडं सहानुभूतीनं पाहू लागले. त्याचा चळवळ वाढवण्यासाठी अंनिसला फायदाच झाला. अर्थात काही धर्मांध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात येऊन डॉक्टरांशी वाद घालायचे. त्यातून काही वेळेला संघर्षाचेही प्रसंगही उद्भवायचे.

एका कार्यक्रमात तर त्यांच्यावर शारीरिक हल्लाही करण्यात आला. दाभोलकरांना मारहाणही करण्यात आली आणि डॉक्टरांनी जे म्हटलं नाही त्यावरून बराच गदारोळही माजवण्याचा प्रयत्न केला गेला. पण दोघांनी त्याच ठिकाणी पत्रकार परिषद घेऊन ''हल्लेबिल्ले झाले, म्हणून आमचे कार्यक्रम बंद होतील, अशा भ्रमात तुम्ही राहू नका. हे कार्यक्रम आम्ही करणारच!'' असं ठणकावून सांगितलं.

त्यानंतर चार महिन्यांनी कळवणचा कार्यक्रम होऊ देणार नाही, अशी धमकी देण्यात आली. त्याला न घाबरता डॉक्टर व दाभोलकर यांनी तो करायचाच असं ठरवलं. त्यामुळे अंनिस कार्यकर्त्यांनाही उत्साह येऊन त्यांनीही जोरदार तयारी करून तो कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

नांदेडच्या कार्यक्रमाला तर शिवसेनेनं होऊ देणार नाही, असा दम दिला होता. त्यामुळं कार्यक्रमाच्या आधी तेथील डीवायएसपीनं येऊन दाभोलकरांना ''देवा-धर्माबद्दल काही बोलू नका, फक्त अंधश्रद्धेबद्दलच बोला,'' असं सांगितलं. तोवर त्याला डॉक्टरही तिथं आहेत, याची कल्पना नव्हती. त्यांना पाहताच तो वरमला. डॉक्टरांनी त्याला बाणेदारपणे सांगितलं की, ''काय बोलायचं, हे मला चांगलं कळतं आणि काय करायचं ते तुम्हांला!''

यातून १९९६-९७मधे औरंगाबादच्या एका कार्यक्रमात डॉक्टरांना धक्काबुक्की करण्यात आली, त्यांच्या तोंडाला काळं फासण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि शिवीगाळही केली गेली. मात्र अशा प्रत्येक प्रसंगाला डॉक्टर अतिशय संयमानं आणि शांतपणे सामोरं जात.

अंनिसच्या इतरही कार्यक्रमांत डॉक्टर सहभागी होत. अंनिसतर्फे सत्यशोधकी लग्नसोहळे आयोजित केले जात. त्यालाही डॉक्टर जात. एकदा तर अंनिसच्या शनी शिंगणापूरच्या सत्याग्रहातही ते सहभागी झाले होते. तिथं सर्वांना अटक करून नगरच्या तुरुंगात टाकलं. पण डॉ. लागूंना अटक केलीय हे कळल्यावर जेलरच्याच बायकोनं त्यांना आपल्या घरी नाष्ट्याला बोलवायचा नवऱ्याकडं हट्ट धरला. जेलरचंही या स्त्रीहट्टापुढं काही चाललं नाही.

या सर्व कार्यक्रमांना दाभोलकर डॉक्टरांच्याच कारनं जात असत. अंनिसच्या स्थानिक शाखा त्यांना जमेल तसं मानधन, म्हणजे पेट्रोलचा खर्चही त्यांना देणं शक्य होत नसे. डॉक्टर मात्र कार्यकर्त्यांनी दिलेलं पाकिट उघडून न पाहता खिशात ठेवून देत.

हे सगळं दाभोलकरांनी त्यांच्या 'लढे अंधश्रद्धेचे' (साधना प्रकाशन, पुणे, १९९९) या पुस्तकातल्या 'वाद-संवाद : विवेक जागराचा' या लेखात सविस्तरपणं लिहिलं आहे.

अंनिसचे सांगलीचे कार्यकर्ते डॉ. प्रदीप पाटील यांनीही अशीच एक आठवण त्यांच्या एका लेखात सांगितली आहे. सांगलीच्या कार्यक्रमानंतर डॉक्टरांना लगेच मुंबईला परतायचं होतं. त्यामुळं ते रेल्वे स्टेशनवर आले, तेव्हा १५-२० जणांचं टोळकं 'जय भवानी जय शिवाजी' अशा घोषणा देत आणि डॉक्टरांना शिव्या देत तिथं हजर झालं. त्यांनी डॉक्टरांना शिव्या द्यायला सुरुवात केली. पण डॉक्टर शांत होते. ते जराही घाबरले नाहीत. त्यांच्यातला एक जण ओरडला, ''ए, लागू, चल 'जय श्रीराम' म्हण.'' डॉक्टरांनी मुठी आवळून, हात वर करून घोषणा दिली, 'जय श्रीराम लागू'. ते टोळकं हातघाईवर आलं. त्यातल्या एकानं डॉक्टरांना धक्काबुक्की केली. तेवढ्यात तिथं आर.आर. पाटील आले. त्यांच्या सोबत पोलिसांचा ताफा होता. डॉक्टरांना पाहून ते त्यांच्याकडं आले, तसं ते टोळकं पसार झालं. आणि पुढचा प्रसंग टळला. जातानाही ते घोषणा देत, ओरडतच गेले. डॉक्टर मात्र शांत होते. डॉक्टरांना सोडायला आलेल्या पण या प्रसंगानं बावरून गेलेल्या प्रदीप पाटील यांना डॉक्टर म्हणाले, ''प्रदीप, धर्मांधांना आयुष्यात कधीही भीक घालायची नाही, हे लक्षात ठेव. समाजसुधारणा ही रोज विस्तवावर चालूनच करावी लागते''.

(उत्तरार्ध पुढील अंकात)

**राम जगताप**, डोंबिवली, मुंबई
Mob. 81084 13720,
jagtap.ram@gmail.com

इंग्रजी पुस्तक

संजीवनी खेर

# भूमिगत रेडिओची कहाणी

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कितीतरी घटना व व्यक्ती अजूनही अज्ञात आहेत. आणि जसजसे दिवस जाताहेत त्या काळाचे साक्षीदारदेखील कमी कमी होत चालले आहेत. काहींनी आपल्या कामाचा गवगवा केला नाही. काही जण तो आपल्या कर्तव्याचा भाग होता, त्याच्याबद्दल काय टिमकी वाजवायची असे समजून गप्प बसले. त्याग, बलिदान, कर्तव्याप्रति असलेला सहज भाव ध्यानात घेता आणि गांधींसारख्या तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची पाठराखण असताना आपले काम हेच आपले श्रेय नि प्रेय आहे अशीच त्या कार्यकर्त्यांची भावना होती. त्यांनी आपले जीवित कार्य संपले असे जेव्हा वाटले तेव्हा अगदी 'इदं न मम' म्हणत कामातून निवृत्ती घेतली. तशी त्या वेळी माध्यमांवर इतकी दडपणे होती नि वृत्तपत्रांतून काही येत नव्हते. त्यामुळे तेव्हाही ह्या रोमांचक घटनेची सगळी माहिती लोकांना नव्हती. त्यातील एक झुंजार निडर नेत्या होत्या उषाबेन मेहता. सच्च्या गांधीवादी.

डॉ.उषा ठक्कर यांनी त्यांच्या नव्या पुस्तकात 'काँग्रेस रेडिओ, उषा मेहता अँड द अंडरग्राउंड रेडिओ १९४२' ह्या संशोधनात्मक ग्रंथात हा कमी ज्ञात, किंवा पुसट झालेला इतिहासाचा तुकडा अत्यंत रंजकपणे वाचकांसमोर ठेवला आहे. हा तो काळ होता जेव्हा स्वातंत्र्यलढ्याला जोर आलेला होता. सामान्य जनांची देशाला ब्रिटिशांच्या जुलमी तावडीतून मुक्तता मिळवायची कल्पना शिगेला पोहोचली होती. भले कितीही अन्याय घडो- गांधीजींचा सत्याग्रहाचा, अहिंसेचा मार्ग कुठेही ढळणार नाही, ह्या जिद्दीने कार्यकर्ते काम करत होते. ब्रिटिश सरकार नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना त्यांच्या हिंसक मार्गाने छळत होते. लाठीमार, अश्रुधूर, तुरुंगवास एक ना दोन- प्रमुख नेत्यांना डांबले जात होते. लोक कंटाळतील, हरतील, हतबल होतील नि हा जगावेगळ्या हत्याराने चाललेला संग्राम थंड होईल, बलाढ्य ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांची डाळ शिजणार नाही अशी सरकारची अटकळ होती. १९४२ला 'चले जाव'चे नारे बुलंद होऊ लागले होते. तरुणांचे तापलेले रक्त थंड करणे अवघड होते. ते कुठल्याही प्रकारे हिंसक मार्ग आत्मसात करणार नाहीत ह्यावर गांधीवादी नेत्यांचा कटाक्ष होता. एआयसीसीच्या सभांवर

स्वत:च्या घरीच त्याने त्याच्या तंत्रवर्गात सारे फिट केले आणि मित्रांना ट्रायलसाठी बोलावले. इतर काही मित्रांना रेडिओ सेटवर ४१.७८ ध्वनी लहरीवर सायं.७.४५ वाजता ऐकायला सांगितले. १९४२ मध्ये ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत काँग्रेस रेडिओ अनेक ठिकाणी ऐकू जाऊ लागला होता. चळवळीचा खऱ्या अर्थाने आवाज झाला. अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये काँग्रेस रेडिओ पोहोचत होता. बातम्या, नेत्यांचे संदेश, आदेश, सरकारचा खोटेपणा लोकांना कळू लागला होता. दुसऱ्या महायुद्धाचा काळ असल्याने ब्रिटिशांना या माध्यमाच्या मागे शत्रुराष्ट्र असल्याची शंका येत होती.

लाठीमार, अश्रुधूर झाला. प्रसिध्दीमाध्यमे सरकारचे मिंधे असल्यागत वागत होते. आपल्या सहकाऱ्यांच्या बातम्या जनतेला मिळत नव्हत्या. असत्य बातम्यांनी लोक रंजिस आले होते. नेत्यांचे संदेश कार्यकर्त्यांना मिळत नव्हते. काँग्रेसमधील नेत्यांनी लोकांचे नैतिक धैर्य टिकवण्यासाठी सभांचा आणि भाषणांचा झंझावात सोडला होता.




राम मनोहर लोहिया, अशोक मेहता, युसुफ मेहेर अली, अच्युतराव पटवर्धन, बी.जी.खेर, शंकरराव देव, नगिनदास टी. मास्टर अशा अनेकांनी लोकांना प्रेरित करायचे काम सुरू ठेवले होते. काळ असा होता की राजकीय विचारसरणी, मतभेद विसरून विविध पक्षांचे नेते ब्रिटिशांविरुद्ध रान पेटवत होते. देशभर ब्रिटिश सत्तेविरुद्धचा राग वाढत होता. मुंबईत मोठमोठ्या सभा होत होत्या. सरकारची बारीक नजर नेत्यांवर, लोकांच्या प्रतिसादावर होती. प्रांतिक सरकार स्थापन करण्याच्या निश्चयाने वातावरण भारलेले होते. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात मुंबईतील राजकीय वातावरण एका अभूतपूर्व भावनेने भारलेले होते. जमलेल्या प्रत्येकाच्या मनात देश स्वतंत्र होण्याविषयीची स्वप्ने तरळत होती. उत्सुकता, ताण शिगेला पोहोचला होता. नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल आझाद, गांधीजी ह्यांच्या उपस्थितीने जनता उत्सुकतेने नेत्यांच्या आदेशाची वाट होती. गांधींच्या 'करो या मरो' आदेशाने लोक कार्यप्रवृत्त झाले होते. देशभक्तीची ऊर्मी हवेत मावत नव्हती. ७-८ ऑगस्ट १९४२च्या मुंबईतल्या सभा अभूतपूर्व होत्या. बापुजींनी 'करो या मरो'चा नारा लोकांना दिला त्या सभेच्या वेळी अचानक संध्याकाळी सर्व टेलिफोन लाइन्स बंद पडल्या. महत्त्वाच्या नेत्यांना देशविरोधी कारवाया केल्याच्या आरोपाखाली अटक केले जाऊ लागले. हलकल्लोळ माजला. साहजिकच लोक संतापले. शांतपणे विरोध करायचा आपला अधिकारही सरकार हिसकावून घेत आहे. दगडफेक, सोडा वॉटरच्या बाटल्या फेकल्या जाऊ लागल्या. बसेस, ट्राम्स, कार्सना आगी लावण्यात आल्या, पोलिसांवर हल्ला होऊ लागला. व्हॉइसरॉयनी चर्चिल यांना पत्र लिहिले की सध्या इथली परिस्थिती स्फोटक झालीय. १८५७ नंतर देशभर अस्वस्थता दाटलीय. पण युध्दाच्या वातावरणात ही बातमी फारशी बाहेर पडू दिलेली नाही.

संपूर्ण स्वातंत्र्य ह्या कल्पनेने लोक उत्तेजित झाले होते. त्यात नेत्यांना अचानक धरपकड झाल्याने लोक चिडले होते. देशासाठी काहीही करायला तरुण सज्ज होते. त्यातील एक होती २०-२२ वर्षांची साधी-भोळी दिसणारी विल्सन कॉलेजची विद्यार्थिनी उषा मेहता. तिचा विदेशी क्रांत्यांचा अभ्यास होता. तिच्या डोक्यात रेडिओ स्टेशन सुरू करायचा विचार आला. समविचारी लोकांना कळत होते की ज्याला ते देशभक्ती समजत होते ते ब्रिटिश सत्तेविरुद्ध बेकायदेशीर पाऊल होते. पण देशप्रेम वरचढ ठरले. जुळवाजुळव सुरू झाली. मनात एक ज्वाला पेटली होती. हुरहुर होती, पण असीम उत्साह होता. एखाद्या रहस्यकथेत शोभेल असा थरारपट सुरू झाला. सतत पोलिसांना चुकवत जागा बदलत, रेडिओ स्टेशनचे सामान हलवणे, पैसे, तांत्रिक मदत, गुप्ततेकरिता करायच्या क्लृप्त्या, पाहता पाहता काहीही करायची सर्वांची तयारी होती. रेडिओवर काय प्रसारित करायचे, त्याचे वेळापत्रक लोकांपर्यंत कसे पोहोचवायचे, कोणकोण नेते लोकांना संबोधित करतील; स्वातंत्र्य चळवळीचे, ब्रिटिशांच्या अन्याय्य वागणुकीच्या घटनांचे वार्तापत्र कुणी कसे लिहायचे, कोणाच्या आवाजात प्रसारित करायचे, सगळेच गुप्तता सांभाळून करायचे. चळवळीची खरी माहिती देणे, सरकारच्या अपप्रचाराला उत्तर देणे, त्यातून स्वातंत्र्यप्रेमींना लढ्याचे स्वरूप समजावून सांगणे ही महत्त्वाची कामे हा अल्प काळ चाललेला रेडिओ प्रसारण सेवा प्रकल्प करीत होता. आपले काय होईल ह्याची पर्वा त्या जिगरबाजांना नव्हती.

तांत्रिक गोष्टींची माहिती असलेला नरिमन प्रिंटर, त्याला पैशाची गरज होती आणि तो धोका पत्करायला तयार होता. बाबूभाई कख्खर बाकी कामे पाहणार होता, जागेची, पैशाची इ.इ. प्रिंटर पैशासाठी अनेक उटपटांग गोष्टी करायला मागेपुढे पाहत नसे. महायुद्धाच्या अगोदर त्याने हौशी प्रसारणाचे लायसन्स काढले होते. तो तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रात असल्याने त्याला मशिन्सबद्दल माहिती होती. पण त्याचा परवाना महायुद्धाच्या काळात रद्द झाल्यावर त्याने यंत्र पोलिसांनी ताब्यात घेण्याअगोदर त्याचे सारे भाग सुटे

करून ठेवले नि ट्रान्समीटरचे काही भाग स्वत:जवळ ठेवून घेतले होते. रेडिओ स्टेशनची कल्पना प्रत्यक्षात आणायचे ठरल्यावर प्रिंटर जोमाने कामाला लागला.

स्वत:च्या घरीच त्याने त्याच्या तंत्रवर्गात सारे फिट केले आणि मित्रांना ट्रायलसाठी बोलावले. इतर काही मित्रांना रेडिओ सेटवर ४१.७८ ध्वनिलहरींवर सायं.७.४५ वाजता यायला सांगितले. ऑगस्टच्या १९४२च्या शेवटच्या आठवड्यापर्यंत काँग्रेस रेडिओ अनेक ठिकाणी ऐकू जाऊ लागला होता. चळवळीचा खऱ्या अर्थाने आवाज झाला. अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये काँग्रेस रेडिओ पोहोचत होता. बातम्या, नेत्यांचे संदेश, आदेश, सरकारचा खोटेपणा लोकांना कळू लागला होता. दुसऱ्या महायुद्धाचा काळ असल्याने ब्रिटिशांना ह्या माध्यमाच्या मागे शत्रुराष्ट्र असल्याची शंका येत होती.

काँग्रेस रेडिओ देशातील अज्ञात स्थळावरून प्रसारण करीत होता. बातम्या, देशभक्तीची गाणी, भाषणे, संभाषणे असे त्याचे रूप होते. सकाळ-संध्याकाळ ही प्रसारणे करता येत होती. पोलिसांनीदेखील ह्यातील प्रसारण केले होते. पण हे प्रसारण कुठून होते ह्याचा ठावठिकाणा त्यांना लागत नव्हता. लष्कराच्या शोधपथकाच्या परिमाणात हे प्रसारण कुठेतरी कच्छ वगैरे भागातून होत असावे असा कयास सांगितला. उषाबेन, बाबूभाई कख्खर, चंद्रकांत झवेरी यांच्यासह नरिमन प्रिंटर, मिर्झा असे अनेक जण प्रसारणात काम करत होते. ४१.७८ मीटर्स ते ४२.३४ मीटर्स ह्या ध्वनिलहरींमध्ये हे प्रसारण होत राहिले. मुंबईत जागा बदलत खेतवाडी, महालक्ष्मी, पारेखवाडी, वॉर्डन रोड येथील अनेक बिल्डिंग्जमधून हे प्रसारण होत होते. २७ ऑगस्ट १९४२ ते १२ नोव्हेंबर १९४२ दररोज ठरलेल्या वेळी प्रसारण होत होते. हा काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता. त्यामुळे बातम्या सेंसॉर होऊनच लोकांसमोर येत होत्या. अशा वेळी ह्या बातम्यांचे महत्त्व लोकांना जाणवत होते.

राम मनोहर लोहिया यांनी नंतर सांगितले की ह्या रेडिओ स्टेशनला पैसा एका मदत कमिटीद्वारे पुरवला जात होता. शिवाय लोकांना आवाहन करून पैसे गोळा केले जात होते. गुप्तता हे ह्या कामाचे वैशिष्ट्य होते. अच्युतराव पटवर्धन, सुचेता कृपलानी, होमी दस्तूर, के.ए.अब्बास हे ह्या


उत्तरायुष्यात सूतकताई करणाऱ्या उषा मेहता

सगळ्या कामाचे पाठीराखे होते. देशभरातून बातम्या गोळा करणे, नेत्यांची भाषणे आणि संवादांचे संपादन ही नेतेमंडळी करीत असत. सरकार आणि कार्यकर्ते ह्यांच्या लपंडावाच्या खेळात अनेक कॉलेज विद्यार्थी हिरीरीने मदत करत होते. त्यांना यात थ्रिल वाटत होते. पण हे काही दिवस खूप छान चालले. (९ ऑगस्ट १९४२ ते जून १९४५) ऐकणारे आणि रेडिओ चालवणारे लोक झपाटलेले होते. पण नंतर सरकारने आपले फास आवळायला सुरुवात केली. आणि एक दिवस प्रसारण सुरू असताना पारेखवाडी गिरगाव इथे पोलिसांनी धाड घालून सर्व सामग्री, रेकॉर्ड्स, कागदपत्रे जप्त केली. 'कॉलिंग फ्रॉम समव्हेअर' ह्या वाक्याने रेडिओ स्टेशनबद्दलचे गूढ अधिकच गहिरे होत जात असे. गांधीजींचे शब्द लोकांच्या मनावर जादू करीत होते. अन्याय सहन करायचा नाही. शत्रूपुढे नमायचे नाही. लढा सुरूच ठेवायचा, ह्या स्फूर्तिदायक शब्दांचा पुनरुच्चार रेडिओवरून होत असे. जरी रेडिओ अल्प काळच चालला तरी त्याचा परिणाम आणि रोमहर्षकता गहिरी होती. बऱ्याचदा सोशॅलिस्ट पक्षाच्या विचारांचे प्रतिबिंब प्रसारणातील वक्तव्यात असे. कलकत्त्यात असा एक अयशस्वी प्रयोग झाला. पुण्यातही असा शिरुभाऊ लिमये, वसंत बापट, एस.एम. जोशी ह्यांनी दोन महिने रेडिओ स्टेशन चालवल्याचा आणि बातम्या आणि साने गुरुजींची प्रेरक भाषणे प्रसारित केल्याचा उल्लेख सापडतो.

भूमिगत प्रसारण केल्याच्या आरोपाखाली सहा जणांवर खटला चालला. सारेच तरुण चळवळे होते. उषाबेनची रवानगी येरवडा तुरुंगात झाली. तेथील वास्तव्यात त्यांची प्रकृती खूपच खालावली. संपूर्ण खटल्याच्या जबानीत त्यांनी एकही शब्द उच्चारायला नकार दिला. त्या सरकारी यंत्रणेला दोष देत नव्हत्या. ''ते आपलं काम करत आहेत, आम्ही चले जाव चळवळीसाठी आणि गांधीजींच्या विचारांसाठी जे करायचे ते करत होतो. हा माझ्या आयुष्यात सर्वात अधिक रोमहर्षक काळ होता,'' असे त्या म्हणत होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. सरकारने त्यांना १९९८ मध्ये पद्मविभूषण दिले होते. अखेरपर्यंत गांधींच्या विचारांवर त्यांनी प्राध्यापक म्हणूण काम केले. प्रो. हॅरॉल्ड लास्की हा विचारवंत इतिहासकार म्हणाला, ''उषाबेन-सारखी तडफेची, शूर स्त्री रशिया वा स्पेनमध्ये असती तर ती महानायिका बनली असती.''

सुरतच्या एका छोट्याशा गावात जन्मलेल्या जज्जच्या ह्या मुलीने सर्व आयुष्य साधेपणाने घालवले. खादी स्वीकारली. अविवाहित राहून संपूर्ण आयुष्य गांधीजींच्या विचारांना अर्पण केले. लहानपणी त्यांनी मार्जार सेना स्थापन करून मुलींना एकत्र केले होते. ह्या लहान मुलींनी तिरंगा हातात घेऊन मोर्चा काढला तर पोलिसांनी लाठीहल्ला केला. पण मुलींनी झेंडा सोडला नाही. नंतर त्यांनी एक युक्ती केली. आपले कपडेच तिरंगी रंगाचे शिवून घेतले नि पदर फडकवत आपले ईप्सित साध्य केले. 'चलाओ लाठी, चलाओ डंडा, झुक न सकेगा अपना झंडा.' जेव्हा सत्याग्रह वा इतर चळवळी चालू नसत, तेव्हा बाकी खादी, अस्पृश्योद्धार, स्वच्छता इ. कामे सुरूच ठेवायची. पुढे उषाबेनने विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथील वातावरण वसाहतवादी सरकारच्या विरोधकांना मदत, सहानुभूतीचेच होते. बेकायदेशीर रेडिओ स्टेशन चालवून देशविरोधी कारवाया करण्याच्या आरोपाखाली त्यांना चार वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. ती त्यांनी आनंदाने सोसली. अर्थात जेलमधील अनुचित गोष्टींच्या विरोधात आवाज उठवण्यात कसूर केली नाही. तेथील वास्तव्यात त्यांनी आपला पीएचडीचा अभ्यास पूर्ण केला.

ह्या पुस्तकातील प्रत्येक वाक्याला पुरावे जोडत अथक प्रयासाने, अभ्यासाने , उषाबेन मेहतांच्या मुलाखती यांमधून डॉ.उषा ठक्कर ह्यांनी हा रसाळ ऐतिहासिक दस्तऐवज तयार केला आहे. स्वातंत्र्य समरातील हे रोमहर्षक पर्व वाचकाला एका धाडसी काळात घेऊन जाईल. त्यातील विविध धर्मांच्या, जातीच्या लोकांचे एकत्र येऊन स्वराज्य आणि चले जाव चळवळीला केलेले योगदान अमूल्य आहे. अशा एका पर्वावर चिकित्सक अभ्यासक दृष्टीने लिहिलेला हा ग्रंथ वाचकांना नवी दृष्टी देईल. लेखिका मणिभवन गांधी संग्रहालय, मुंबईच्या अध्यक्ष आहेत.

**संजीवनी खेर,** मुंबई
Mob. 98214 11472/ 022 356 39544

**काँग्रेस रेडिओ,**
**उषाबेन अँड द अंडरग्राउंड रेडिओ स्टेशन ऑफ १९४२**
लेखिका : डॉ. उषा ठक्कर,
पेंग्विन रँडम हाऊस इंडिया प्रा. लि.
चौथा मजला, कॅपिटल टॉवर १, एमजी रोड,
गुरुग्राम १२२ ००२, हरियाणा, इंडिया
पृष्ठे ३६०, मूल्य ६९९ रुपये.


Ring in the
Festive Spirit!
monginis
Let's Celebrate!
Gateaux, Pastries, Savouries, Chocolates,
Cookies and lots more
monginisgoa
monginis.goa
© alphacreative.in

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 27-12-2021/ Date of Publication : 27-12-2021

storytel

# साधना प्रकाशनाची पुस्तके आता **audio book** स्वरूपात **storytel** वर

अधिक माहितीसाठी संपर्क
**साधना प्रकाशन**
431, शनिवार पेठ, पुणे 411030
Ph : 02024451724
Mob : 70582 86753
sadhana.prakashan@gmail.com

**डिसेंबर २०२१ अखेर १५० तासांचे ऑडिओ उपलब्ध आहेत. २०२२ मध्ये प्रत्येक महिन्यात २० तासांचे नवीन ऑडिओ उपलब्ध होत राहतील.**

